



# जनमाध्यम


e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार २१ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ ८+४








## हनुमान मंदिराचा सभा मंडप कोसळला, 5 भाविक ठार, 17 जखमी



**परभणी** -जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरातील सभा मंडप कोसळून मोठी दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेत ५ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १७ जण जखमी झाले आहे. सभा मंडप कोसळल्याने या मलब्याखाली एकूण २३ जण दबल्याची माहिती मिळत होती. यातील ५ जणांचा मृत्यू झाला असून १ जण गंभीर आहे. या दुर्घटनेतील जखमींवर उपचार सुरु आहेत. दरम्यान, प्रशासनाकडून तत्काळ बचावकार्य सुरु करण्यात आली आहे.पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सर्व यंत्रणा घटनास्थळी पाठवली आहे. आज शनिवार असल्याने मोठ्या प्रमाणावर भाविक दर्शनाला येत असतात. अनेक ॲम्ब्युलन्स घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. जिल्हा प्रशासनाचे अधिकारी, पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरातील सभा मंडप कोसळून मोठी दुर्घटना घडली आहे. सभामंडप कोसळल्याने या मलब्याखाली ३० ते ४० जण अडकले होते. यातील ५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. प्रशासनाला माहितची मिळताच बचावकार्य (पान २ वर)

## गणपतीपुळे समुद्रात 8 जण बुडाले

**रत्नागिरी :** रत्नागिरीतील प्रसिद्ध गणपतीपुळे येथे एक अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. गणपतीपुळे येथे समुद्रात



उतरलेले छत्रपती संभाजीनगरमधील ८ पर्यटक समुद्राच्या पाण्याचा अंदाज न आल्यामुळे बुडाल्याची घटना घडली आहे. यातील ३ जणांना वाचवण्यात यश आले आहे. पण ५ जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती मिळाली आहे. आज (शनिवार) सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर येथून काही पर्यटक गणपतीपुळे येथे फिरण्यासाठी आले होते. यातील एकूण ८ जण सकाळी समुद्रात उतरले होते. मात्र, भरती आणि समुद्राच्या पाण्याचा योग्य अंदाज न आल्याने हे सर्वजण पाण्यात वाहून जाउ लागले.

समुद्रात पर्यटक बुडत असल्याचे लक्षात येताच स्थानिक जीवरक्षक आणि नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. ८ पैकी ३ पर्यटकांना सुखरूपपणे समुद्राबाहेर काढण्यात यश आले आहे. ३ जणांचे प्राण वाचले आहेत. मात्र, उर्वरित ५ जण अद्यापही बेपत्ता आहेत. घटनास्थळी पोलीस व स्थानिक प्रशासनाचे अधिकारी दाखल झाले असून शोधमोहीम सुरू आहे. या दुर्घटनेमुळे गणपतीपुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पर्यटकांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## 'जंतर-मंतर'वर पोलीस विरुद्ध आंदोलक! दिपकेचा मैदान सोडण्यास नकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट पेपरफुटीसह इतर परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकार प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी काक्रोच जनता पार्टीने केली आहे.



'जंतर-मंतर'वर अभिजीत दिपकेचा ठिय्या!

अभिजीत दिपकेच्या नेतृत्वाखाली दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर नव्याने आंदोलन सुरू असून, पोलिसांनी आंदोलन करण्यास अधिकची परवानगी नाकारत मैदान रिकामे करण्याची कारवाई सुरू केली. पण, अभिजीत दिपकेंनी मैदान रिकामे करण्यास नकार दिल्याने पोलीस आणि आंदोलक आमने-सामने आल्याची स्थिती निर्माण झाली. राजीनाम्याच्या मागणीसाठी काक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली जंतर-मंतर मैदानावर आंदोलन सुरू आहे. या आंदोलनासाठी परवानगी वाढवून द्यावी, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली होती; मात्र पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना हटवण्याची कारवाई सुरू केली. ताज्या माहितीनुसार, दिल्ली पोलीस दलाचे जवान जंतर-मैदानावर पोहोचले आहेत. मोठ्या संख्येने पोलीस बळ बोलवण्यात आले असून, पोलिसांनी मैदानावर जमलेल्या आंदोलकांना हटवण्याचे काम सुरू केले आहे. पोलिसांकडून सत्तीने मैदान (पान २ वर)

## बांगलादेशात हिंदूंचा आक्रोश!

### प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेची अवमानना

**ढाका** - बांगलादेशची राजधानी ढाका येथे प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचा कथित अवमान झाल्याच्या निषेधार्थ हजारो हिंदू नागरिक रस्त्यावर उतरले. या आंदोलकांनी मशाल मोर्चा, मानवी साखळी



आणि निदर्शने करत 'जय श्रीराम' च्या घोषणा दिल्या. या आंदोलनातून सरकारला ७२ तासांचा अल्टिमेटम देत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचा अवमान झाल्याने हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या आहेत असं आक्रमक आंदोलकांचे म्हणणे आहे. उत्तर बांगलादेशातील प्रस्तावित ८१ फूट उंच श्रीराम मूर्तीच्या बांधकामाला विरोध आणि धमक्यांमुळे काम थांबवण्यात आल्यामुळे हा तणाव निर्माण झाला आहे. हा प्रकल्प उभारणा-या श्री श्री राधा गोविंद मंदिर समितीच्या पदाधिका-यांना इस्लामी समुहाकडून धमक्या मिळत असल्याचा आरोप आहे. आंदोलात सरकारने ७२ तासांच्या आत दोषींना अटक करून धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली. अन्यथा देशभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही हिंदू संघटनांनी दिला आहे. (पान २ वर)



## पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड

# माजी गृहमंत्री डॉ.पद्मसिंह पाटीलसह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

**मुंबई/प्रतिनिधी :** तब्बल दोन दशकांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात आणि न्यायव्यवस्थेत चर्चेचा विषय ठरलेल्या पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा अखेर निर्णायक शेवट झाला आहे. सीबीआय विशेष न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आठ आरोपींची पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करत खटल्याला अनपेक्षित कलाटणी दिली. न्यायमूर्ती एस. आर. नावंदर यांनी दिलेल्या या निकालामुळे निंबाळकर कुटुंबाला मोठा धक्का बसला असून, राज्यातील राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना तोंड फुटले आहे.

**माफीच्या साक्षीदाराची साक्ष ठरली अविश्वसनीय**-या खटल्यातील सर्वात महत्त्वाचा आधार माफीचा साक्षीदार पारसमल जैन याची साक्ष होती. मात्र न्यायालयाने ही साक्षच अविश्वसनीय, विसंगत आणि संशयास्पद ठरवली. न्यायालयाच्या निरीक्षणानुसार, जैनला सप्टेंबर २००९ मध्ये अनधिकृतपणे ताब्यात ठेवण्यात आले होते. त्याला पंधरा दिवस बेकायदेशीररित्या डांबून ठेवून मारहाण करण्यात आल्याचा आणि दबावाखाली कबुलीजबाब घेतल्याचा उल्लेखही निकालपत्रात करण्यात आला. सरकारी पक्षाने ही बाब न्यायालयापासून लपविल्यामुळे संपूर्ण तपास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे न्यायालयाने नमूद केले. तसेच, जैनने केवळ ५० हजार रु पयांसाठी हत्या केल्याचा दावा केला होता. मात्र त्याच्याकडे मोठी मालमत्ता, व्यवसाय आणि सोन्याची संपत्ती असताना एवढ्या कमी रकमेसाठी तो अशा गंभीर कटात सहभागी झाला असावा, हा दावा न्यायालयाला विश्वासार्ह वाटला नाही. इतकेच नव्हे तर, हत्येच्या दिवशी तो मुंबईबाहेर कसा गेला याबाबत त्याने वेगवेगळ्या टप्प्यांवर चार भिन्न आणि परस्परविरोधी माहिती दिली होती. यामुळे त्याच्या संपूर्ण साक्षीवरच संशय निर्माण झाला.

निकालादरम्यान न्यायालयाने तपास यंत्रणांच्या कामकाजावरही कठोर टीका केली. या खटल्यातील एकाही आरोपीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला नव्हता किंवा त्यांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) गोळा करण्यात आले नव्हते. आरोपी परस्पर संपर्कात होते की नाही, हे सिद्ध करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले तांत्रिक पुरावेच सादर करण्यात आले नाहीत, असे न्यायालयाने नमूद केले. घटनाक्रमात अनेक दूरध्वनी संभाषणांचा उल्लेख असला, तरी पवनराजे निंबाळकर यांना आरोपींकडून थेट फोन आल्याचे कोणतेही ठोस पुरावे तपास यंत्रणांना सादर करता आले नाहीत. त्यामुळे कट सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेली पुराव्यांची साखळी अपुरी राहिल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले.

**जळालेल्या वाहनाबाबतही प्रश्नचिन्ह**

हत्येनंतर गुन्ह्यात वापरलेली कार जाळण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, पूर्णपणे जळून गेलेल्या वाहनाचा रंग पंचनाम्यात हिरवा कसा नमूद करण्यात आला, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. तपास अधिका-यांनी कागदपत्रांच्या आधारे रंगाची नोंद केल्याचे सांगितले असले तरी मूळ पुराव्यांच्या विश्वसनीयतेवर यामुळे प्रश्न निर्माण झाल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. याशिवाय घटनास्थळावरील वाहनाची स्थिती आणि प्रत्यक्षदर्शींच्या (पान २ वर)

### काय होते पवनराजे निंबाळकर हत्याकांड?

**३ जून २००६ रोजी पवनराजे निंबाळकर मुंबईहून पुण्याकडे जात असताना नवी मुंबईतील कळंबोली परिसरात त्यांच्या वाहनावर सशस्त्र हल्ला करण्यात आला होता. एक्सप्रेसवेवर कार अडवून करण्यात आलेल्या अंधाधुंद गोळीबारात पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांचा जागीच मृत्यू झाला होता. या प्रकरणात सीबीआयने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी २५ लाख रुपयांची सुपारी देउन हत्या घडवून आणल्याचा आरोप केला होता. त्यानंतर या खटल्याने राज्यातील राजकारण, न्यायालयीन प्रक्रिया आणि तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर अनेक प्रश्न उपस्थित केले होते.**


पद्मसिंह पाटील पवनराजे निंबाळकर

### 20 वर्षांच्या लढाईचा शेवट

मुंबईतील सीबीआय विशेष न्यायालयाच्या कोर्ट क्रमांक ५५ मध्ये शुक्रवारी (२० जून २०२६) हा बहुप्रतीक्षित निकाल जाहीर करण्यात आला. निकालाच्या दिवशी न्यायालय परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बिहारच्या तुरुंगातून आणण्यात आलेला मुख्य आरोपी आणि कथित शूटर पिंटू सिंग याला उशिरा न्यायालयात हजर करण्यात आल्याने काही काळ उत्सुकता आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, त्याच्या उपस्थितीपूर्वीच न्यायालयाने निकालवाचनास सुरुवात केली. निकाल जाहीर करताना न्यायमूर्ती नावंदर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, न्यायालय भावना किंवा संशयाच्या आधारावर नव्हे, तर केवळ कायदेशीरदृष्ट्या सिद्ध झालेल्या पुराव्यांच्या आधारे निर्णय देते. एका लोकनेत्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या होणे ही अत्यंत दुर्दैवी घटना असली, तरी दोष सिद्ध करण्यासाठी ठोस आणि निर्विवाद पुरावे आवश्यक असतात, असे त्यांनी नमूद केले.

### पद्मसिंह पाटील यांच्यावरील आरोपातून सुटका

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते म्हणून ओळखले जाणारे डॉ. पद्मसिंह पाटील हे धाराशिव जिल्ह्यातील प्रभावी राजकीय व्यक्तिमत्त्व मानले जातात. सात वेळा आमदार म्हणून निवडून आलेल्या पाटील यांनी राज्याच्या गृह, सिंचन आणि उर्जा खात्यांचे मंत्रीपदही भूषवले आहे. पवनराजे निंबाळकर हत्याकांडातील आरोपांमुळे गेली अनेक वर्षे त्यांच्यावर न्यायालयीन प्रक्रिया सुरू होती. अखेर सीबीआय विशेष न्यायालयाच्या निकालानंतर या प्रकरणातून त्यांची कायदेशीर सुटका झाली आहे.



## 'निकाल दुर्दैवी, मी अमित शाहांशी बोललो- एकनाथ शिंदे

खासदार ओमराजे निंबाळकर यांचे वडील पवनराजे निंबाळकर यांची आणि त्याच्या चालकाची हत्या करण्यात आली होती. २००६ मध्ये झालेल्या या हत्या प्रकरणाचा विशेष सीबीआयन्यायालयाने २० जून रोजी निकाल दिला. त्यात सर्व आरोपींना न्यायालयाने निर्दोष ठरवले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, 'पवनराजे निंबाळकर हत्येचा खटला २० वर्षापासून सीबीआय न्यायालयात सुरू होता आणि या हत्याकांडात पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे एक सहकारी अशा दोघांची हत्या झाली होती. हे खूपच गंभीर हत्याकांड होतं. २० वर्षांपासून हे प्रकरण सुरू होते."त्यांच्या कुटुंबाला आणि आम्हाला देखील असा विश्वास होता की, या खून खटल्यात आरोपींना शिक्षा होईल. दुर्दैवाने हे सर्व आरोपी निर्दोष सोडण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला आहे', असे भाष्य एकनाथ शिंदे यांनी केले. एकनाथ शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, 'मी स्वतः आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आम्ही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या (पान २ वर)

## आता शिंदे गट वगैरे काही नाही, हीच खरी शिवसेना

### शहांकडून शिंदेंचे कौतुक

***कोल्हापूर/ प्रतिनिधी-*** *देशभरातील बहुतांश राज्यांमध्ये भाजप मित्रपक्षांची सत्ता आहे. परंतु देशाला बंगालमध्ये काय होणार याची उत्सुकता होती. बंगालमध्येही आम्ही करून दाखवले. आता बंगालसहित देशवासियांना या कोल्हापूरच्या भूमीतून आश्वस्त करतो की देशातील एक एक घुसखोर शोधून काढल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, घुसखोरांचा व्होट बँक म्हणून वापर करू देणार नाही असा निर्धार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. तसेच अमित शहा यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला एकनाथ शिंदे यांचे कौतुक करताना याआधी आम्ही शिंदे गट म्हणत होतो. आता गट वगैरे काही राहिले नाही. आता हीच शिवसेना झाली आहे, असे विधान केले.येथील पोलिस मैदानावर झालेल्या महायुतीच्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्री, खासदार, आमदार उपस्थित होते.शहा म्हणाले, १२ वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आम्ही कामाला सुरुवात केली आणि आज विविध क्षेत्रांमध्ये भारत अग्रेसर बनला आहे. सांस्कृतिक पुनरुत्थानाचे काम आम्ही करत आहोत. याच भावनेतून अंबाबाई मंदिराच्या विकासाचे काम महाराष्ट्र सरकारने हाती घेतले याबद्दल मी फडणवीस आणि शिंदे यांना धन्यवाद देतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कोल्हापूरचे जावई असलेल्या अमित शहा यांचा आम्हाला अंबाबाई मंदिर परिसर विकासासाठी नेहमी आग्रह होता. आज त्यांच्याच हस्ते या कामाचा प्रारंभ झाल्याचा आम्हाला आनंद आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, देशातील नागरिकांच्या मनात विश्वास आणि शत्रुच्या पोटात गोळा निर्माण करण्याचे काम अमित शहा करत आहेत.*

## गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती



**कोल्हापूर, दि. २० (जिमाका):** केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन व कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा नामविस्तार करण्यात आला. यावेळी बँकेच्या प्रशासकीय इमारतीच्या परिसरात उभारण्यात आलेल्या कोनशिलेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.


कार्यक्रमास कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सांस्कृतिक कार्यमंत्री अड आशिष शेलार, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, खासदार धनंजय महाडिक, खासदार धैर्यशील माने, आमदार राजेंद्र यड्रावकर, आमदार डा. राहुल आवाडे, आमदार शिवाजी पाटील, आमदार रवींद्र चव्हाण, माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी वस्त्रोद्योग (पान २ वर)

# आज नीटची फेर परीक्षा

**नागपूर/प्रतिनिधी :** प्रश्नपत्रिका फुटीनंतरही नॅशनल टेस्टिंग एजन्सीचा कारभार सुधारला नसल्याचे समोर येत आहे. नीट पेपर लीकवरून वातावरण तापले. पालक, विद्यार्थ्यांनी परीक्षा एजन्सीविरोधात संताप व्यक्त केला. त्यानंतर देशभरात रविवारी २२ लाख विद्यार्थी नीटची फेर परीक्षा देणार आहेत.

देशभरातील ५५१ शहरांमध्ये आणि परदेशातील १४ शहरांमध्ये २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. शहर पातळीवरील व्यवस्थेवर देखरेख ठेवण्यासाठी ६७४ शहर समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली आहे, तर परीक्षा केंद्रांवर स्वतंत्र देखरेखीसाठी ६ हजार ६६९ पर्यवेक्षक तैनात करण्यात आले आहेत. फेरपरीक्षा सुरळीत आणि निष्पक्षपणे पार पडावी यासाठी पोलिस आणि जिल्हा प्रशासनाच्या अधिका-यांसह दोन लाखांहून अधिक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. ही पुनर्परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत लेखी स्वरूपात घेतली जाईल.

यापूर्वी पेपरफुटीमुळे त्यावेळी घेतलेली परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तर नगापूरमधील अब्दुल्ला मोहम्मद या विद्यार्थ्याला




जे परीक्षा प्रवेश पत्र देण्यात आले. त्यात संयुक्त अरब अमिरातमधील अबुधाबी हे परीक्षा केंद्र देण्यात आले. त्यामुळे राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या निष्काळजीपणावर संताप व्यक्त केल्या जात आहे. आता उद्या परीक्षा असताना आणि पासपोर्ट नसताना अबुधाबीच्या परीक्षा केंद्रावर कसं जाणार असा प्रश्न पालक आणि विद्यार्थ्याला पडला आहे. नीटच्या पुनर्परीक्षेसाठी (पान २ वर)

## नागपूरच्या विद्यार्थ्याला थेट अबुधाबीतील केंद्र

**नागपूरः** नीट परीक्षेतील गोंधळ संपता संपेनासा झाला आहे. नागपूरमधील विद्यार्थ्याच्या प्रवेश पत्रावर अबुधाबी परीक्षा केंद्र देण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांची भांबेरी उडाली. देशभरात रविवारी २२ लाख विद्यार्थी नीटची फेर परीक्षा देणार आहे. यापूर्वी पेपरफुटीमुळे घेतलेली परीक्षा रद्द करावी लागली होती. आता नगापूरमधील अब्दुल्ला मोहम्मद या विद्यार्थ्याला परीक्षेसाठी संयुक्त अरब अमिरातमधील अबुधाबी हे परीक्षा केंद्र देण्यात आले. त्यामुळे राष्ट्रीय परीक्षा एजन्सी पालकांचीच परीक्षा घेत निष्काळजीपणाचा कळस गाठत आहे. प्रश्नपत्रिका फुटीनंतरही नॅशनल टेस्टिंग एजन्सीचा कारभार सुधारला नसल्याचे समोर येत आहे. नीट पेपर लीकवरून वातावरण तापले आहे. पालक, विद्यार्थ्यांनी परीक्षा एजन्सीविरोधात संताप व्यक्त केला. त्यानंतर २१ जून रोजी आता री-नीट परीक्षा होत आहे. पण गोंधळ थांबलेला नाही. एजन्सीने नागपूरमधील अब्दुल्लाह नावाच्या विद्यार्थ्याला २१ जून रोजी होणा-या ग़क्क्ष पुनर्परिक्षेसाठी थेट संयुक्तअरब अमिरात या देशातील अबुधाबी येथील परीक्षा केंद्र दिले आहे. त्यामुळे देशातील विद्यार्थ्याला थेट (पान २ वर)

## अमरावतीत 4 हजार 648 विद्यार्थी देणार नीटची परीक्षा

अमरावती जिल्ह्यात जवळपास ४ हजार ६४८ विद्यार्थी देणार नीटची परीक्षा देतील. उद्या रविवारी २१ जून रोजी होणा-या नीट (यूजी) पुनर्परीक्षेसाठी अमरावती जिल्हा प्रशासन पूर्णपणे तयार आहेत. सकाळी ११ वाजता अमरावती शहरातील भारतीय स्टेट बँक कॅम्प शाखा येथून माक ड्रिलची सुरुवात होणार आहे गोपनीय परीक्षा साहित्याच्या सुरक्षित वाहतुकीची जबाबदारी जिल्हा प्रशासन, पोलीस दल आणि एस्कॉर्ट टीम्सवर सोपवण्यात आली आहे.


## होर्मुझ पुन्हा बंद, तेहरानचा कडक इशारा

### इराण-अमेरिका करार पूर्णपणे धोक्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ'बाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. इराण-अमेरिका करार धोक्यात आला आहे. इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने, संघर्ष संपवण्यासाठीच्या सामंजस्य कराराचे अमेरिकेने केलेले उल्लंघन, दक्षिण लेबनानमधून सैन्य मागे घेण्यास आलेले अपयश आणि इस्रायलकडून शस्त्रसंधीचे सतत होणारे उल्लंघन, ही कारणे देत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी जलवाहतूक बंद करण्याची घोषणा केली आहे. या घोषणेमुळे आता जागभरात पुन्हा खळबळ उडाली आहे.इराणने याला पहिले पाउल म्हटले असून, उल्लंघन सुरूच राहिल्यास पुढील पावले उचलली जातील असा इशारा दिला आहे. अमेरिका आणि इराणने या आठवड्यात एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली होती, यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्यात आली. या कराराला अजून एक आठवडाही पूर्ण झालेला नाही.दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्यात शस्त्रसंधी करार झाल्याची बातमी आल्यानंतर काही तासांतच, शनिवारी दक्षिण लेबनानमध्ये इस्रायलने केलेल्या हल्ल्यात दोन मुलांसह किमान सात जण ठार झाले.शांतता करार धोक्यात-इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीवर पुन्हा निर्बंध लादल्यामुळे कराराभोवतीचे संकट अधिकच गडद झाले आहे. दरम्यान, पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी शनिवारी इराणमध्ये दाखल झाले. वाशिंग्टन आणि तेहरान यांनी शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने एका करारावर स्वाक्षरी केल्यानंतर काही दिवसांतच त्यांचा हा दौरा होत आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या वाटाघाटींवर नक्वी देखरेख ठेवतील आहे.

## ममता यांना मोठा धक्का, टीएमसीची तीन बँक खाती गोठवली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बंडखोर तृणमूल



काँग्रेसच्या आमदारांच्या तक्रारींनंतर, पक्षाच्या तीन बँक खात्यांमधून पैसे काढण्यावर बंदी घालण्यात आली आहे, यामध्ये अंदाजे ४४० कोटी रुपये आहेत. या कारवाईमुळे निवडणुकीतील पराभवानंतर ममता बॅनर्जीच्या टीएमसीला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. बंडखोर पक्षाच्या आमदारांनी निधीच्या स्रोताची चौकशी करण्याची मागणी केली आहे. एका वरिष्ठ पोलीस अधिका-याने पीटीआयला (पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# खरी शिवसेना एकच, जे दोन-तीन राहिले आहेत त्यांच्यावर अधिकृत शिवसेनेने कारवाई करावी-पीयूष गोयल

**मुंबई :** महाराष्ट्रात खरी शिवसेना एकच असून ऊलट जे दोन-तीन राहिले आहेत त्यांच्यावर अधिकृत शिवसेनेने शिस्तभंगाची कारवाई करायला हवी, असा टोला केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींवर भाष्य करताना मारला.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या तपपूर्तीनिमित्त भाजप प्रदेश कार्यालयात शनिवारी दुपारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महाराष्ट्रात शिवसेना (ऊद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील ९ पैकी ६ खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत असून ते ऊपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील होणार असल्याची चर्चा रंगली आहे. दोन्ही शिवसेनेत सध्या सुरू असलेल्या या ऊलथापालथीविषयी भाजपने आतापर्यंत फारसे भाष्य केले नव्हते. मात्र गोयल यांनी, ऑपरेशन टायगरविषयी बोलताना केलेल्या या टिपण्णीमुळे शिवसेना निष्ठावंतांच्या जखमेवर मीठ चोळले गेले आहे. खरी शिवसेना एकच असल्याचे आधीच स्पष्ट झाले आहे. त्यामुळे खासदार पुन्हा आपल्या घरी येत असतील तर चांगलीच गोष्ट आहे. ऊलट अधिकृत शिवसेनेने जे दोन-तीन राहिले आहेत, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी, असा टोमणा गोयल यांनी विरोधकांना मारला.

**९५ टक्के जरी पाउस पडला काळजी नाही-**मान्सून लांबल्याने महाराष्ट्रासह देशभर दुष्काळाचे सावट आहे. त्याकरिता केंद्राने काय तयारी केली आहे, याविषयी विचारले असता गोयल म्हणाले की, एल निनोचा परिणाम जाणवणार आहे. हवामानातील बदलामुळे पावसाचे आगमन लांबेल असा अंदाज आहे. मात्र, ऊशीरा का होईना मान्सून गती घेईल, अशी अपेक्षा आहे. सरासरीच्या ९५ टक्के जरी पाउस पडला काळजी करण्याची गरज लागणार नाही. अर्थात या सर्व घडामोडींवर केंद्र सरकारचे लक्ष आहे.

**विदा केंद्रांतील गुंतवणूकीत महाराष्ट्र आघाडी घेईल**

महाराष्ट्र आणि त्यातही मुंबई विदा केंद्रांमधील गुंतवणुकीकरिता अनुकूल क्षेत्र आहे. कारण विदा केंद्राकरिता लागणा-या लँडिंग केबल (समुद्राच्या तळावरू न एक देश दुस-या देशाला जोडणा-या अति-हायस्पीड फायबर ऑप्टिक केबल्स) भारतात मुंबईसारख्या किनारपट्टी शहरांवरू न येतात. या विषयीचे राज्याचे धोरणही सकारात्मक आणि पुढारलेले आहे. भविष्यात या केंद्रांमधील गुंतवणुकरिता राज्यांमध्ये स्पर्धा असेल. परंतु, भौगोलिक अनुकूलता आणि सकारात्मक धोरण यांमुळे लाखो कोटींची गुंतवणूक होउन महाराष्ट्र आघाडी घेईल, असा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला.

# मोहन अटाळकर यांना अनिलकुमार स्मृती पत्रकारिता पुरस्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** नागपूरचे ज्येष्ठ कवी आणि विचारवंत स्व.अनिलकुमार यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा २०२५ चा 'अनिलकुमार स्मृती पत्रकारिता पुरस्कार' दैनिक लोकसत्ताचे विशेष प्रतिनिधी मोहन अटाळकर यांना जाहीर झाला आहे.

स्व. अनिलकुमार यांचा १३ सप्टेंबर हा स्मृतिदिवस! स्व. अनिलकुमार हे स्वातंत्र्यपूर्व काळातील ज्येष्ठ कवी, विचारवंत व पत्रकार म्हणून प्रसिद्ध होते. त्या काळात त्यांनी केलेले कार्य आजही लोकांच्या स्मरणात आहे. स्वातंत्र्य संग्रामात देखील त्यांचा सहभाग होता, स्व. अनिलकुमार यांच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघाच्या संयुक्त वतीने मागील चार दशकांपासून विदर्भातील



पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांचा 'स्वर्गीय अनिलकुमार पत्रकारिता पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव करण्यात येत असतो. प्रत्येकी रोख एकवीस हजार रुपये, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २०२५ चा पुरस्कार पत्रकारितेचा प्रदीर्घ अनुभव असलेले व दैनिक लोकसत्ता (विदर्भ विभाग) येथे विशेष प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेले मोहन अटाळकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्यासह दै. कॅलिफोर्निया टाईम्सचे मुख्य संपादक गिरीधर देशमुख यांना आणि लोकमतचे उपमुख्य संपादक नरेश डोंगरे यांना देखील हा पुरस्कार जाहीर झाला आहे. हे पुरस्कार स्व. अनिलकुमार यांच्या स्मृतिदिनी १३ सप्टेंबर, २०२६ रोजी प्रदान करण्यात येणार आहेत.

# वलगाव रोडवरील धर्मकाट्याजवळ युवकावर चाकू हल्ला

## गंभीर जखमीवर आयसीयूमध्ये उपचार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वलगाव रोडवरील धर्मकाट्याजवळ एका युवकावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची गंभीर घटना घडली. या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर इर्विन (जिल्हा सामान्य) रुग्णालयात अतिदक्षता विभागात (आयसीयू) उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शेख समीर शेख मुन्ना याच्यावर आरोपी तौसीफ याने धारदार चाकूने हल्ला केला. हल्ल्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. हल्ल्यात गंभीर दुखापत झाल्याने समीर याला तातडीने इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमीची प्रकृती गंभीर असून त्याला आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आहे. पुढील उपचारासाठी शस्त्रक्रिया करण्याची तयारी सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी



धाव घेत प्राथमिक तपास सुरू केला आहे. आरोपी तौसीफविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून हल्ल्यामागील कारणांचा शोध पोलीस घेत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# मारहाण करून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## फ्रेजरपुरा येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-**

अल्पवयीन मुलीला भेटण्यासाठी बोलून तिला आपल्या मित्राच्या खोलीवर घेऊन जात लैंगिक अत्याचार करण्यात आला. मुलीने विरोध केला असता आरोपीने तिला मारहाण केली. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी जय कडू विरुद्ध अत्याचार आणि पोक्सो कायद्या अन्वये गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार पिडित तरुणी आरोपी जय कडू ला ओळखत होती. आरोपीने फोन करून तिला फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या एका महाविद्यालयाजवळ भेटायला बोलावले. पिडिता त्याला भेटायला गेली असती आरोपीने तिला आपल्या मित्राच्या खोलीवर जाऊन बोलू असे म्हणून मित्राच्या घरी घेऊन गेला. तेथे आरोपी तिला वरच्या मजद्यावरील एका रूममध्ये घेऊन गेला. येथे त्याने तिला शिवीगाळ करून मारहाण केली आणि अत्याचार केला. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी जय कडू विरुद्ध कलम ६४(१),७८,११५(२),३५१(२),३५२ आणि पोक्सो कलम ४,८,१२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.

पान १ व १० वरून

## हनुमान मंदिराचा सभा मंडप

सुरु करण्यात आले आहे. प्रत्येक शनिवारी मोठ्या प्रमाणात या मंदिरात गर्दी होत असते. अशातच आज देखील या मंदिरात मोठी गर्दी झाली होती. अशा वेळीच सभामंडप कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेतील जखमींना बाहेर काढण्याचे काम सुरु आहे. या सभामंडपाचे काम सुरु आहे. अशातच ही दुर्घटना घडली आहे. प्रत्येक शनिवारी या हनुमान मंदिरात २५ ते ५० हजार भाविक दर्शनासाठी येतात. या ठिकाणच्या सभामंडपाचे काम जवळपास पूर्णत्वास आले होते. पण दगडाचा ज?ईंट नीट न झाल्यामुळं हा सभामंडप पडल्याची शक्यता असावी असी माहिती आमदार राजेश विटेकर यांनी दिली आहे. बचावकार्य सुरु करण्यात आले आहे. जखमींना रुग्णालयात नेण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. क्रेनच्या सहाय्याने तेथील दगड हटवण्याचे काम सुरु आहे. त्यानंतर याखाली किती भाविक अडकले याची माहिती मिळेल अशी माहिती विटेकर यांनी दिली. यशवाडी हनुमान मंदिर परिसरातील बचाव कार्य पूर्ण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार सर्व ३२ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. ३२ पैकी ७ जणांचा मृत्यू तर २५ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती. जिल्हाधिकारी संजय चव्हाण आणि ऊपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांनी दिली. बचावकार्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, अग्निशमन विभाग पाथरी, मानवत सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय पथक महापालिका परभणी, स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने पूर्ण करण्यात आले.परभणीच्या मानवत तालुक्यातील यशवाडी हे प्रसिद्ध हनुमान देवस्थान आहे. राज्यभरातून भाविक दर्शनासाठी दर शनिवारी येतात. यशवाडी हनुमान मंदिर परिसरात अनेक विकास कामे सुरू आहेत. मंदिरच्या सभा मंडपाचे काम हे राजस्थानी दगड आणून करण्यात आले होते. त्याचे काम सुरूच होते अनेक ठिकाणी त्याला सपोर्ट लावण्यात आला होता. दुपारी तीन वाजून २ मिनीटांनी अचानक हा सभा मंडप कोसळला. एकूण ३२ जण अडकले गेले होते. यामधील ७ जणांचा मृत्यू झाला आहे. सगळ्यांना बाहेर काढण्या तआलं आहे. जखमींवर ऊपचार सुरु आहेत. अडीच तासानंतर बचावकार्य पूर्ण झाले.

## दिपकेचा मैदान सोडण्यास

रिकामे करण्याचे काम सुरू असले, तरी कोणत्याही प्रकारचा बळाचा वापर केला गेला नाही. पोलिसांकडून गर्दी हटवण्याचे काम सुरू झाले असले, तरी अभिजीत दिपकेने मैदान सोडण्यास नकार दिला आहे. त्यामुळे इथे काहीसा तणाव निर्माण झाला आहे. अभिजीत दिपके आणि इतर विद्यार्थी संघटनांचे विद्यार्थी मैदानात ठाण मांडून बसले आहेत. पोलिसांकडून कारवाई सुरू करण्यापूर्वी अभिजीत दिपकेने आवाहन केले होते की, देशभरातून विद्यार्थी आले आहेत आणि त्यांच्या भविष्याचा विषय आहे. त्यामुळे पुढेही आंदोलन करण्याची परवानगी पोलिसांनी द्यावी. अभिजीत दिपके सरकारला इशारा म्हणाला की, 'चर्चेचा मार्ग खुला आहे, पण आमची एक अट आहे की, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यायला हवा. जर पोलिसांनी आम्हाला इथून बळजबरीने हटवण्यासाठी अटक केली, तर अटक होणारा मी पहिला व्यक्ती असेल.'

## बांगलादेशात हिंदूंचा आक्रोश!

या आंदोलनामुळे बांगलादेशातील धार्मिक अल्पसंख्याकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. गेल्या काही काळात धार्मिक तणावाच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचा दावा विविध हिंदू संघटनांनी केला असून सरकारने सर्व नागरिकांच्या धार्मिक स्वातंर्त्याचे संरक्षण करावे अशी मागणी त्यांनी केली आहे.

## माजी गृहमंत्री डॉ.पद्मसिंह पाटीलसह

जबाबांमध्येही तफावत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले.

**राजकीय वैमनस्य मान्य, पण पुरावे अपुरे**

न्यायालयाने आपल्या निरीक्षणात पवनराजे निंबाळकर आणि डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यातील राजकीय संघर्ष मान्य केला. तेरणा साखर कारखान्याच्या वादांपासून निवडणुकीतील संघर्षापर्यंत दोन्ही नेत्यांमध्ये मोठे मतभेद होते. पवनराजे यांनी आपल्या जीवाला धोका असल्याचे निवेदनही प्रशासनाला दिले होते. मात्र, केवळ राजकीय वैमनस्य अस्तित्वात आहे म्हणून एखाद्या व्यक्तीला दोषी ठरवता येत नाही. त्यासाठी ठोस, विश्वासार्ह आणि कायद्याच्या कसोटीवर टिकणारे पुरावे आवश्यक असतात, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या खटल्यात न्यायालयाने डॉ. पद्मसिंह पाटील, सतीश मंदाडे, मोहन शुक्ला, शशिकांत कुलकर्णी, कैलास यादव, दिनेश तिवारी, पिंटू सिंग आणि छोटे पांडे या सर्व आरोपींना संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्त केले.

**राजकीय आणि कायदेशीर परिणाम** वीस वर्षांहून अधिक काळ चर्चेत राहिलेल्या या प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर राज्यातील राजकीय वर्तुळात विविध प्रतिक्रिया ऊमटण्याची शक्यता आहे. एका बाजूला तपास यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न ऊपस्थित झाले आहेत, तर दुस-या बाजूला पुराव्यांच्या अभावामुळे इतक्या मोठ्या प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाल्याने न्यायव्यवस्थेतील तपासाच्या गुणवत्तेवरही चर्चा सुरू झाली आहे. पवनराजे निंबाळकर हत्याकांडाचा हा निकाल महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील सर्वात चर्चित आणि वादग्रस्त न्यायालयीन निर्णयांपैकी एक म्हणून नोंदला जाणार आहे.

## 'निकाल दुर्दैवी, मी अमित शाहांशी

कानावर ही घटना घातली आहे. त्यांनी तात्काळ सीबीआय या प्रकरणाला ऊच्च न्यायालयात आव्हान देईल असा विश्वास दिला आहे.'

'त्यांनी तसे निर्देश सीबीआयला देखील दिले आहेत. त्यामुळे ऊच्च न्यायालयात ही केस चालेल. त्या लोकांना न्याय मिळेल. अमित शाह यांच्याशी आम्ही दोघेही बोललो. या परिवाराला न्याय मिळाला पाहिजे, अशी भावना आम्ही व्यक्त केली आहे. कारण हे गाजलेले हत्याकांड फार गंभीर आहे. दुर्दैवाने न्यायालयाने त्यांना निर्दोष सोडले आहे. आता सीबीआय ऊच्च न्यायालयात त्याला आव्हान देणार आहे', अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली. दरम्यान, खासदार ओमराजे निंबाळकर या निकालानंतर काय राजकीय भूमिका घेणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागलेले आहे. न्यायालयाच्या निकालानंतर बोलताना ते म्हणाले, 'मी माझ्या मतदारसंघात जाउन जनतेशी चर्चा करू न पुढील राजकीय निर्णय घेईन. अद्याप मी कुठलाही निर्णय घेतलेला नाही."या खटल्याच्या निर्णयाचा आणि माझ्या राजकीय निर्णयाचा काही संबंध नाही. माझ्या मतदारसंघातील लोकांसोबत मला चर्चा करायची आहे. त्यांच्या भावना जाणून घ्यायच्या आहेत मग मला निर्णय घ्यायचा आहे. या खटल्याचा निकाल माझ्यासाठी महत्त्वाचा होता. गेल्या २० वर्षापासून वडिलांच्या हत्येतील आरोपींना शिक्षा मिळावी यासाठी न्यायालयीन लढा देत होतो. त्यामुळे आयुष्यातील हा सगळ्यात महत्त्वाचा निकाल होता', असे ओमराजे निंबाळकर यांनी म्हटले आहे.

## गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते

मंत्री प्रकाश आवाडे, जिल्हाधिकारी डा. विजय राठोड, इचलकरंजीचे महापौर ऊदय धातुंडे, इचलकरंजी महानगरपालिका आयुक्त पल्लवी पाटील, पोलीस अधीक्षक निलोत्पल, बँकेचे अध्यक्ष स्वप्निल आवाडे तसेच बँक व साखर कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, मान्यवर ऊपस्थित होते.

'महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणून ओळखल्या जाणा-या इचलकरंजीच्या औद्योगिक इतिहासाशी घट्ट नाते असलेली 'कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक ही सहकारी बँकिंग क्षेत्रातील एक अग्रगण्य संस्था आहे. या बँकेची स्थापना ५ नोव्हेंबर १९६२ रोजी झाली असून ७ फेब्रु वारी १९६३ रोजी प्रत्यक्ष कामकाजास सुरु वात झाली. या बँकेने मल्टी-स्टेट स्तरावर एक 'आर्थिक माडेल' म्हणून सिद्ध केले आहे. महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा आणि गुजरात राज्यात मिळून ५५ शाखा आहेत.

## आज नीटची फेर

अभूतपूर्व तयारी करण्यात आली आहे. आज देशभरात सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत माक ड्रिल होणार आहे. या परीक्षेसाठी देशभरात २२.७९ लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. तर त्यासाठी २ लाख कर्मचारी तैनात असतील. साडे ५ हजाराहून अधिक केंद्रांवर नीटची पुनर्परीक्षा होणार आहे. पण गोंधळ थांबलेला नाही. एजन्सीने नागपूरमधील अब्दुल्लाह नावाच्या एका विद्यार्थ्याला २१ जून रोजी होणा-या नीट पुनर्परिक्षेसाठी थेट संयुक्त अरब अमिरात या देशातील अबुधाबी येथील परीक्षा केंद्र दिले आहे. एनटीए परदेशातील विद्यार्थ्यांसाठी परदेशी केंद्र देते. पण देशातील विद्यार्थ्याला थेट परदेशातील परीक्षा केंद्र दिल्याने पालक आणि विद्यार्थ्याची भांबेरी ऊडाली आहे.

**विद्यार्थी-पालकांची एनटीएकडे तक्रार-**अब्दुल्ला मोहम्मद याने नागपूर, वर्धा आणि भंडारा असे परीक्षा केंद्र म्हणून पर्याय दिला होता. पण एनटीएने त्याला थेट युएईतील अबुधाबी हे परीक्षा केंद्र दिले होते. या गोंधळानंतर विद्यार्थ्याने एनटीएच्या हेल्पलाईनवर तक्रार केली. परीक्षा केंद्र बदलून देण्याची मागणी केली. एनटीएच्या अधिकाराने या तक्रारीची दखल घेतली आहे. त्यांनी चूक मान्य केली आहे. तर या विद्यार्थ्याला आता नागपूरमधील परीक्षा केंद्र मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पण ऐन परीक्षा तोंडावर अशी चूक केल्याने एनटीएवर संताप व्यक्त करण्यात येत आहे. जर आता लवकर परीक्षा केंद्राबाबत बदल झाला नाहीतर या विद्यार्थ्याला परीक्षेपासून वंचित राहावे लागू शकते. तर परीक्षा तोंडावर असताना परीक्षा केंद्रावरू न गोंधळ घालून या विद्यार्थ्यांला एनटीएने नाहक मनस्ताप दिल्याचे समोर येत आहे.

## नागपूरच्या विद्यार्थ्याला थेट

परदेशातील परीक्षा केंद्र दिल्याने पालक आणि विद्यार्थ्याची भांबेरी ऊडाली आहे. दरम्यान माजी शिक्षण मंत्री डॉ. अनीस अहमद यांनी याबाबत संताप नोंदवला. ते म्हणाले की, नीटसारख्या प्रतिष्ठित परीक्षेची थट्टा सुरू आहे. एनटीएने हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे आणि नागपूर किंवा जवळच्या शहरात केंद्र देउन विद्यार्थ्याला सुधारित प्रवेशपत्र जारी करावे. विद्यार्थ्याचे वडील, मोहम्मद तालिब म्हणाले, अबू धाबी केंद्र पाहून आम्हाला धक्का बसला आहे. आमच्याकडे पासपोर्टही नाही आणि पुरेसा वेळही नाही. त्यामुळे आम्ही मुलाला परीक्षेसाठी परदेशात पाठवू शकत नाही. ही आमच्या सहनशिलतेचीच परीक्षा आहे. या निष्काळजीपणामुळे मुलाची परीक्षा चुकण्याची शक्यता आहे. आम्ही एनटीएच्या हेल्पलाइनवर तक्रार केली आहे. त्यांनी चूक मान्य करत डताळणीनंतर शनिवारपर्यंत नवीन प्रवेशपत्र देण्याचे आश्वासन दिले. मात्र, जोपर्यंत आम्हाला नवीन प्रवेशपत्र मिळत नाही, तोपर्यंत आम्हाला मानसिक तणावाचा सामना करावा लागेल.

## ममता यांना मोठा धक्का,

सांगितले की, एका खासगी बँकेतील तीन खाती डेबिट फ्रीझ करण्यात आली आहेत. डेबिट फ्रीझ म्हणजे बँक खात्यातून पैसे काढणे, हस्तांतरण करणे किंवा पेमेंट करणे तात्पुरते थांबवणे.माजी मंत्री अरू प बिस्वास आणि विरोधी पक्षनेते ऋत्ब्रता बॅनर्जी यांच्या गटांमध्ये तृणमूल काँग्रेसच्या संघटनात्मक आणि आर्थिक नियंत्रणावरू न संघर्ष सुरू आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या पराभवानंतर हा वाद अधिकच वाढला आहे. बॅनर्जी यांना पाठिंबा देणा-या १० आमदारांच्या तक्रारींनंतर हे पाउल ऊचलण्यात आले आहे. त्यांनी बिधाननगर पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेल्या सायबर गुन्हे पोलीस ठाण्यात एफआयआर नोंदवून खात्यांची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

आपल्या तक्रारींमध्ये, आमदारांनी खात्यांमध्ये जमा झालेल्या पैशांच्या स्रोतावर प्रश्न ऊपस्थित केले आणि त्या खात्यांमार्फत झालेल्या व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी केली. तक्रारीच्या प्रतीनुसार, आमदारांनी तपास अधिका-यांना हे पैसे कायदेशीर स्त्रोतांकडून मिळवले आहेत की सार्वजनिक निधीचा गैरवापर आणि घोटाळे यांसारख्या कथित बेकायदेशीर कृत्यांतून कमावले आहेत, याचा शोध घेण्याचे आवाहन केले. माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी निष्ठा असलेल्या एका ज्येष्ठ आमदाराने सांगितले की, गटाला पोलीस कारवाईची माहिती देण्यात आली आहे, परंतु ते औपचारिक अधिसूचनेची वाट पाहत आहेत.

**तीन खाती गोठवली** -आमदार म्हणाले, 'तीन खाती गोठवण्यात आल्याचे आम्ही ऐकले आहे. आज संध्याकाळपर्यंत आम्हाला नेमकी माहिती मिळेल.' तृणमूल काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अरू प बिस्वास यांनी एका खासगी बँकेला पत्र लिहून पक्षाच्या खात्यांमधील व्यवहार तात्काळ थांबवण्याची मागणी केली होती. त्यांनी पक्षाच्या वैध नेतृत्वाबद्दलची अनिश्चितता आणि आमदार व खासदारांनी केलेला विद्रोह ही कारणे दिली होती.

## प्रा.बी.टी. देशमुख अनंतात

मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, विभागीय आयुक्त नयना मुंढे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पदवीधर आमदार धिरज लिंगाडे, शिक्षक आमदार किरण सरनाईक, माजी मंत्री डॉ. सुनिल देशमुख, माजी खासदार अनंत गुढे, माजी मंत्री डॉ. रणजित पाटील, जगदिश गुप्ता, माजी आमदार विरेंद्र जगताप, प्रदिप वडनेरे, माजी शिक्षक आमदार श्रीकांत देशपांडे, पोलीस आयुक्त राकेश ओला, कुलगुरु डॉ. मिलींद बाराहाते, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, माजी महापौर मिलींद चिमोटे, दै.हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास मराठे, कार्यकारी व्यवस्थापक विवेक मराठे, संपादक उल्हास मराठे यांच्यासह नुटा संघटनेचे पदाधिकारी, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी

सभासद व इतर सहकारी संस्था शेअर्सचे मूल्य वाढविण्याचा ठराव मंजूर केला होता. मात्र, हा प्रस्ताव विभागीय सहनिबंधकांनी फेटाळला होता. त्यानंतर सहकार मंत्र्यांनीही तो निर्णय कायम ठेवला होता. या निर्णयाला आव्हान देणारी याचिका न्यायालयात प्रलंबित असताना पुन्हा त्याच विषयाचा समावेश करत सर्वसाधारण सभेच्या विषयसूचीवर करण्यात आल्याचा आक्षेप याचिकाकर्त्यांनी घेतला.या बाबीची दखल घेत न्यायालयाने संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावून १ जुलै २०२६ रोजी पुढील सुनावणी निश्चित केली आहे. तसेच, विशेष सर्वसाधारण सभा नियोजित वेळेनुसार होऊ शकते, मात्र क्लास-बी शेअर्सचे मूल्य वाढविण्याबाबतच्या विषयपत्रिकेतील कलम ५(ब) वर कोणतीही चर्चा किंवा निर्णय घेता येणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. उच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील प्रस्तावित शेअर मूल्यवाढीच्या निर्णयाला तात्पुरता ब्रेक लागला असून, आता या प्रकरणाकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## महिलेचे मंगळसूत्र हिसकावणारा

आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल वर व दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## कारागृहातच शिपायाकडून

आला. तसेच एक स्मार्ट मोबाईल, सिमकार्ड, इयरफोन आणि अन्य साहित्यही जप्त करण्यात आले. हा मोबाईल कारागृहात नेण्यामागील उद्देश काय होता, याचा शोध आता तपास यंत्रणा घेत आहेत.सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जप्त मोबाईलमधील संपर्क आणि कॉल रेकॉर्डच्या आधारे काही महत्त्वाचे धागेदोरे मिळण्याची शक्यता आहे. संबंधित कर्मचारी काही कैदी किंवा त्यांच्या नातेवाईकांच्या संपर्कात होता का, याचाही तपास सुरू आहे.

मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांच्या तक्रारीवरून फेजरपुरा पोलिसांनी अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून त्याची चौकशी सुरू आहे.दरम्यान, या घटनेनंतर कारागृह प्रशासनाने सुरक्षा तपासणी अधिक कठोर केली असून अंतर्गत विभागीय चौकशीचे आदेश दिले आहेत. कारागृहात अमली पदार्थ व मोबाईल पोहोचविण्याचा कोणता साखळी प्रकार कार्यरत आहे का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रकरणामुळे कारागृह प्रशासनात खळबळ उडाली असून तपासातील निष्कर्षांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बनावट नंबर प्लेट, खोटी

चालकाची माहिती खरी असल्याचे भासविण्यात आले होते. मात्र सीसीटीव्ही फुटेज, टोलनाक्यांवरील नोंदी आणि तांत्रिक तपासातून पोलिसांना मोठा धागा मिळाला. तपासात वापरण्यात आलेला ट्रक क्रमांक बनावट असल्याचे स्पष्ट झाले, तर चालकाने दिलेली ओळखही खोटी निघाली. त्यानंतर पोलिसांनी नांदेड जिल्ह्यातील आरोपींचा शोध घेत कारवाई केली. चौकशीत आरोपींनी खोटी नंबर प्लेट लावून सोयाबीनचा माल परस्पर विक्री केल्याची कबुली दिली. पोलिसांनी विक्रीतून मिळालेली १२ लाख रुपयांची रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेला मूळ ट्रक जप्त केला. या कारवाईत एकूण २० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलिसांनी राज्यभरातील तत्सम गुन्ह्यांच्या नोंदींचाही अभ्यास केला. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही विश्लेषण आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा आर्थिक फसवणुकीचा गुन्हा उघड करण्यात यश आले.पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात डीबी पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

## दसरा मैदान परिसरात

क्षमतेच्या बॉबी संत्रा ब्रँडच्या ९० दारूच्या बाटल्या आढळून आल्या.त्यानंतर पोलिसांनी मद्यसाठा आणि वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली होंडा ॲक्टिव्हा (एमएच-२७-डीसी-४८०१) जप्त केली. जप्त दारूची किंमत सुमारे ४ हजार ५०० रुपये असून वाहनासह एकूण मुद्देमालाची किंमत ५४ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा नोंदवून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. शहरात अवैध मद्यविक्री आणि वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात राजापेठ पोलिसांच्या पथकाने केली.

## पावसाची प्रतिक्षा, शेतकऱ्यांची

जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. तर जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न भविष्यात गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.'पाऊस पडल्याशिवाय शेतीची चाके फिरणार नाहीत. आता सर्व आशा आकाशाकडेच लागल्या आहेत.हवामान विभागाकडून लवकरच पावसाला पोषक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत असली तरी प्रत्यक्ष पाऊस कधी बरसणार, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागून आहे. सध्या तरी 'पाऊस कधी येणार?' हा एकच प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात घोळत असून चांगल्या पावसाच्या प्रतिक्षेत तालुका आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.

## इन्स्टाग्रामवरून पळवलेल्या १६

आहे. सदर मुलीला सुखरूप पोलिसांनी आईच्या ताब्यात दिले आहे. विशेष म्हणजे पोलिसांच्या या सदर पथकाने एका दिवसात शोध लावून मुलीला सुखरूप अंजनगाव सुर्जी येथे परत आणले. सहा. पोलीस निरीक्षक अनिल चांदोरे यांनी सदर प्रकरण अतिशय समय सूचकतेने हाताळले. मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून समुपदेशनानंत तिला पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अंजनगाव सुर्जी पोलीस करीत आहे.'मुलांच्या सोशल मीडिया वापराबाबा जागरूक राहावे. अनोळखी व्यक्तींशी वैयक्तिक माहिती, फोटो शेअर करू नका. मुलांमध्ये कोणताही बदल जाणवल्यास तातडीने संवाद साधावा असे आवाहन अंजनगाव सुर्जी पोलिसांनी केले आहे.

## असोरिया पेट्रोल पंपाजवळ

काडतूस व एक जिवंत काडतूस जप्त केले. त्यामुळे गोळीबार झाल्याच्या चर्चेला पुष्टी मिळाली आहे.पोलिसांनी तातडीने कारवाई करत तीन संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज जप्त करण्यात आले असून हल्ल्यात सहभागी इतर आरोपींचा शोध घेतला जात आहे. जुन्या वैमनस्यातून ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला असून गोळीबाराचा नेमका उद्देश, वापरण्यात आलेले शस्त्र आणि हल्ल्यामागील संपूर्ण कट उघड करण्यासाठी तपास सुरू आहे. शहरातील गजबजलेल्या भागात झालेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.फायरिंग झाल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्रकरणाचे गांभीर्य पाहून डीसीपी श्याम घुगे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, अतुल वर पथकासह घटनास्थळी दाखल झाले आहे. त्यांनी संपूर्ण परिसराचे निरीक्षण करून आवश्यक दिशा निर्देश दिले आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, २१ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# ‘सीबीआय’चा बनाव करून २५ लाखांची लूट; १२ तासांत आरोपी जेरबंद

## एलसीबीची वेगवान कारवाई; संपूर्ण रक्कम व मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

*सीबीआय अधिकारी असल्याचे भासवून व्यापाऱ्याकडून तब्बल २५ लाख रुपयांची रोख रक्कम हिसकावून नेणाऱ्या दोन तोतया आरोपींना अवघ्या १२ तासांत अटक करत अकोला स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) वेगवान तपासाचे उदाहरण घालून दिले आहे. विशेष म्हणजे, आरोपींकडून लुटलेली संपूर्ण रक्कम, फिर्यादीचा मोबाईल आणि गुन्ह्यात वापरलेली वाहने असा एकूण २७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.*



या प्रकरणी बाळापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४६८/२०२६ दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खामगाव येथील एका व्यापाऱ्याला आरोपींनी स्वतःची ओळख सीबीआय अधिकारी म्हणून करून दिली. चौकशी आणि कारवाईची भीती दाखवत त्याच्याकडील २५ लाख रुपयांची रोख रक्कम ताब्यात घेतली आणि तेथून पसार झाले.

**गंभीर गुन्ह्याची दखल; तीन पथकांचा तपास**

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वाखाली तीन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली. या पथकांनी रात्रंदिवस तपास करत आरोपींचा माग काढला.

तपासादरम्यान खामगाव-बाळापूर मार्गावरील जवळपास ५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. तांत्रिक माहिती, मोबाईल विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींची ओळख पटविण्यात आली.

### रक्कमेचा तपास होणार

खामगाव येथील किराणा व्यापारी एवढ्या मोठ्या प्रमाणात लाखोंची रक्कम आपल्या नोकरामार्फत कुठे पाठवत होता? ही रोख रक्कम कोणत्या व्यवहाराची होती? तर किराणा व्यवसायाच्या नावाखाली मोठे हवाला नेटवर्क तर याठिकाणी सुरू नव्हते ? यांसह अनेक प्रश्न सध्यातरी अनुत्तरित असले तरी तपासातून सर्व काही मुद्दे स्पष्ट होणार आहेत.

### या पथकाची मोलाची भूमिका

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक आणि अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत एलसीबीचे प्रभारी पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक माजीद पठाण, तसेच शेख हसन, रवि खंडारे, अब्दुल माजीद, वसीमोद्दीन, महेंद्र मलिये, भास्कर धोत्रे, किशोर सोनुने, स्वप्नील खेडकर, मंगेश इंगळे, अमोल दिपके, श्रीकांत पातोंड, राज चंदेल, राहुल गायकवाड आणि चालक देवानंद खरात यांनी सहभाग घेतला. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास बाळापूर पोलीस करीत असून, आरोपींनी यापूर्वी अशा प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचाही शोध घेतला जात आहे.

### खामगावातून दोघांना अटक

तपास पथकाने खामगाव येथे छापा टाकून दोघांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये हार्दिक मनोजकुमार गुरबानी (२२), सिंधी कॉलनी, खामगाव साहिल नंदकिशोर नथ्थानी (२५), बीएचआर नगर, तलाव रोड, खामगाव यांचा समावेश आहे. चौकशीत दोघांचाही गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

### १०० टक्के रक्कम हस्तगत

पोलिसांनी आरोपींकडून २५ लाख रुपयांची रोख रक्कम, फिर्यादीचा मोबाईल, दोन दुचाकी वाहने आणि दोन मोबाईल फोन जप्त केले. यामध्ये रोख रक्कम २५ लाख रुपये, अँड्रॉइड मोबाईल १० हजार रुपये, दोन दुचाकी २ लाख रुपये, दोन मोबाईल ४० हजार रुपये असा एकूण २७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### उत्कृष्ट कामगिरीबद्दल बक्षीस

गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १२ तासांत आरोपींना अटक करून संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात यश आल्याने पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला २५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे.

# अधिकारी अनुपस्थित, उपस्थिती नोंदवही कुलूपबंद; मुख्यालय नियमांच्या पालनाबाबतही प्रश्नचिन्ह ?

## उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय कारंजाचा भोंगळ



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहर आणि परिसरातील गोरगरीब लोकांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करा तसेच आरोग्य वर्धिनी केंद्रा मार्फत कोणत्या सुविधा मिळतात याची सखोल माहिती देवून, येथील माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत गेली पाहिजे यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन गाडगे बाबा नगर मधील आरोग्य वर्धिनी केंद्रात आयोजित आशा, आरोग्य सेवक व स्थानिक सदस्य यांच्याशी बोलताना तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वैष्णवी खासबागे यांनी सांगितले आहे.

येथील गाडगे बाबा नगर मध्ये, आरोग्य वर्धिनी केंद्रात ता. १७ रोजी दुपारी १२ वा प्रमुख मार्गदर्शक म्हणून तालुका आरोग्य अधिकारी डॉ.वैष्णवी खासबागे, नगर सेवक संजराव बळी,केंद्रातील आरोग्य अधिकारी डॉ, मनिष बोरकर, डॉ.रेणुका कापुरे,जेष्ठ नागरिक प्रा.पी.एस.खिराडे, पत्रकार भास्करराव गुडदे प्रमुख म्हणून उपस्थित होते.

यावेळी डॉ वैष्णवी खासबागे यांनी या केंद्रा मार्फत कोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात याची माहिती दिली. केंद्रा मार्फत आरोग्य सुविधा गरजू लोकांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

यावेळी आशा पुजा बळी, वैशाली मोहळे, अर्चना बळी, सोनटक्के यांनी ग्रामीण भागात महिलासाठी पुरवीत असलेल्या सुविधांची माहिती दिली. डॉ, रेणुका कापुरे,प्रा.खिराडे, भास्करराव गुडदे, यांनी काही आवश्यक सुविधा उपलब्ध देण्याची मागणी केली तसेच येथील रक्त तपासणीच्या अहवालात नेहमीच तफावत आढळून येते,याची दक्षता घेण्याची विनंती केली. प्रास्ताविक डॉ. मनिष बोरकर यांनी डॉ, सुरेन्द्र उखळे, यांनी संचालक व आभार प्रदर्शन केले.यावेळी सर्व कर्मचारी व सदस्य उपस्थित होते.

# शहरातील महापुरुषांच्या पुतळ्यांची नियमित स्वच्छता करा

## नागरिकांचे मुख्याधिका-यांना निवेदन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा शहरातील शिक्षणाचे प्रणेते, समाजसुधारक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासह विविध ऐतिहासिक व राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्यांची नियमित स्वच्छता, देखभाल व परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी कारंजा नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे.

नागरिकांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, शहरातील विविध चौक, सार्वजनिक स्थळे व महत्त्वाच्या भागांमध्ये उभारण्यात आलेले महापुरुषांचे पुतळे हे केवळ स्मारके नसून समाजाला प्रेरणा देणारी विचारपीठे आहेत. समता, बंधुता, शिक्षण, सामाजिक न्याय आणि राष्ट्रनिर्मितीचे संदेश देणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वांचे स्मारक जतन करणे ही स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी आहे.



निवेदनानुसार, अनेक ठिकाणी महापुरुषांच्या पुतळ्यांवर धूळ साचलेली दिसून येते. तसेच पक्ष्यांची विष्ठा, परिसरातील वाढलेले गवत, कचरा व अस्वच्छता यामुळे या स्मारकांचे सौंदर्य आणि पावित्र्य बाधित होत आहे. शहरातील नागरिक, विद्यार्थी तसेच विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीच्या निमित्ताने या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी येत असतात. मात्र परिसरातील अस्वच्छतेमुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे पुतळ्यांची नियमित स्वच्छता करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याची मागणी केली आहे. दररोज किंवा किमान आठवड्यातून एकदा सर्व पुतळे स्वच्छ पाण्याने धुवून त्यांची देखभाल करावी, तसेच परिसरात नियमित झाडलोट व कचरा निर्मूलनाची व्यवस्था ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच पुतळ्यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र जबाबदार अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, परिसरात पुरेशी प्रकाश व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, वृक्षारोपण व सुशोभीकरणाची कामे हाती घ्यावीत, तसेच जयंती, पुण्यतिथी व राष्ट्रीय सणांच्या पार्श्वभूमीवर विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

पुतळ्यांच्या परिसरात होणारे अतिक्रमण, विद्रूपीकरण किंवा असामाजिक कृत्यांना आळा घालण्यासाठी नियमित निरीक्षण यंत्रणा कार्यान्वित करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

नागरिकांनी निवेदनात स्पष्ट केले आहे की, ’महापुरुषांचा सन्मान म्हणजे त्यांच्या विचारांचा आणि स्मारकांचा सन्मान होय.’

त्यामुळे प्रशासनाने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन या मागण्यांवर सकारात्मक विचार करून तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# पक्षनिष्ठेचा विश्वासघात केल्याचा आरोप; खा. संजय देशमुखांविरोधात महाविकास आघाडीचे जोडेमारो आंदोलन; प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून निषेध – घोषणाबाजीने झाशी राणी चौक दणाणला

■ प्रतिनिधी | कारंजा ■

खासदार संजय देशमुख यांनी पक्षाशी गद्दारी करून कार्यकर्ते आणि मतदारांच्या विश्वासाला तडा दिल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या वतीने गुरुवारी शहरातील झाशी राणी चौक येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान संजय देशमुख यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून संतप्त कार्यकर्त्यांनी निषेध नोंदविला. यावेळी झालेल्या जोरदार घोषणाबाजीमुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हातात विविध निषेधात्मक फलक घेत आंदोलनात सहभाग घेतला. ’पक्षाची बेइमानी करणाऱ्यांना जनता माफ करणार नाही’, ’या गद्दाराचे करायचे काय, खाली



मुंडके वर पाय’ अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यकर्त्यांनी संजय देशमुख यांनी पक्षाच्या विचारधारेचा आणि पक्षश्रेष्ठींनी दाखविलेल्या विश्वासाचा विश्वासघात केल्याचा आरोप केला. त्यांच्या निर्णयामुळे तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी आणि संतापाची भावना निर्माण झाल्याचे आंदोलकांनी सांगितले.

आंदोलनादरम्यान निषेधाचे प्रतीक म्हणून संजय देशमुख यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारण्यात आले. या प्रकारामुळे काही काळ झाशी राणी चौक परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने घटनास्थळी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी विशेष दक्षता घेतल्याने आंदोलन शांततेत पार पडले. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी यावेळी पक्षनिष्ठा आणि विचारधारेप्रती प्रामाणिक राहण्याचे आवाहन केले. लोकशाही मार्गाने निषेध व्यक्त करण्यासाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनतेच्या विश्वासावर निवडून येऊन नंतर पक्षांतर करणाऱ्या नेत्यांविषयी मतदारांमध्ये नाराजी असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला. कारंजा शहरातील या आंदोलनाची दिवसभर राजकीय वर्तुळात चर्चा रंगली. आगामी काळातही पक्षाशी बेइमानी करणाऱ्या नेत्यांविरोधात जनजागृती आणि निषेध आंदोलने सुरू ठेवण्याचा इशारा महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. त्यामुळे कारंजा शहरातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जागतिक योग दिनी रक्तदानाचा महायज्ञ कारंज्यात आज भव्य रक्तदान शिबिर

■ प्रतिनिधी | कारंजा ■

‘रक्तदान हेच जीवनदान’ या मानवतावादी संदेशाला केंद्रस्थानी ठेवून जागतिक योग दिनानिमित्त कारंजा येथे रविवारी, २१ जून २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. निरोगी शरीर, सुदृढ मन आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांचा संगम साधणारा हा उपक्रम असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

हे रक्तदान शिबिर महेश भवन, कारंजा (लाड) येथे सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले असून, रक्तदात्यांची सर्व आवश्यक वैद्यकीय तपासणी करून सुरक्षित पद्धतीने रक्तसंकलन करण्यात येणार आहे. सध्या विविध रुग्णालयांमध्ये अपघातग्रस्त, शस्त्रक्रियाग्रस्त तसेच गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना रक्ताची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासत असते. अशा परिस्थितीत रक्तदानाद्वारे अनेकांना नवजीवन मिळू शकते. समाजहिताच्या या कार्यात प्रत्येक नागरिकाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे.

या उपक्रमाचे आयोजन श्री महेश सेवा समिती कारंजा, कारंजा रक्तदान चळवळ, अदानी अंबुजा सिमेंट ग्रुप आणि अनुलोम विभाग कारंजा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. जागतिक योग दिनाच्या निमित्ताने आरोग्य संवर्धनासोबतच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमात युवक, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. ’आपल्या रक्ताचा प्रत्येक थेंब कोणासाठी तरी संजीवनी ठरू शकतो. चला, रक्तदान करून जीवन वाचविण्याच्या या पवित्र कार्यात सहभागी होऊया.’

# ३० जूनपर्यंत एचएसआरपी बसवा; १ जुलैपासून दंडात्मक कारवाई

■ प्रतिनिधी | वाशिम ■

: केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५० तसेच रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशानुसार सर्व मोटार वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पट्टी (एचएसआरपी) बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनधारकांनी ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी बसवून घ्यावी, अन्यथा १ जुलै २०२६ पासून मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिली आहे.

वाहनांच्या क्रमांक पट्टीमध्ये होणारी छेडछाड व बनावटगिरी रोखणे, रस्त्यांवरील वाहनांची अचूक ओळख पटविणे तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने एचएसआरपी प्रणाली अत्यंत महत्त्वाची मानली जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार महाराष्ट्र शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित व नोंदणीकृत सर्व जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसविणे बंधनकारक केले आहे. वाशिम जिल्ह्यासाठी एचएसआरपी बसविण्याचे काम रोझमेर्टा सेफ्टी सिस्टिम्स लिमिटेड या कंपनीकडे सोपविण्यात आले.

# आकांक्षित असलेल्या वाशिम जिल्ह्याकरीता १५३ अतिरीक्त रोहीत्र उपलब्ध

## आ. भावनाताई गवळी पाटील यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांची हिरवी झेंडी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आकांक्षित असलेल्या वाशिम जिल्ह्याकरीता रब्बी हंगामासाठी १०० केव्हीए चे २०० अतिरिक्त रोहीत्र मंजुर करण्यात यावे अशी मागणी आ. भावनाताई गवळी पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे केली होती. यापैकी वाशिम जिल्ह्याला अतिरीक्त १५३ रोहीत्र उपलब्ध करुन दिल्याची माहीती महावितरणचे मुख्य अभियंता प्रवीण परदेशी यांनी दिली आहे.

आकांक्षित असलेल्या वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पारंपारीक शेती शिवाय उद्योगधंदे व इतर कुठलाही व्यवसाय करण्याची सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे संपुर्ण जिवनमान शेतीवरच अवलंबुन आहे. गत खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीने वाशिम जिल्ह्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे आता खरीपाची झिज भरुन काढण्याकरीता रब्बीचा हंगाम केल्याशिवाय शेतकऱ्यांकडे कुठलाही पर्याय नाही. या रब्बीच्या हंगामाकरीता वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडुन मोठ्या प्रमाणात विजेची मागणी होत आहे. त्यामुळे कृषी वाहीन्यावर विजेचा दाब वाढल्याने विद्युत रोहीत्रात वारंवार बिघाड होतांना दिसून येते. त्यामुळे कृषी पंपाकरीता अखंडीत विज पुरवठा मिळण्याकरीता व महावितरण कपंनीला रोटेशन मेंटनेस करण्याकरीता १०० केव्हीएच्या २०० रोहीत्राची अत्यंत आवश्यकता आहे.अशी मागणी आ. भावनाताई गवळी पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्री फडणविस यांनी सदर प्रकरणी तात्काळ लक्ष घालुन वाशिम जिल्ह्याला अतिरिक्त रोहीत्र उपलब्ध करुन देण्याच्या सुचना महावितरणला दिल्या. महावितरणने १०० केव्हीए चे १५० व २०० केव्हीएचे ३ असे एकुण १५३ विद्युत रोहीत्र वाशिम जिल्ह्याला उपलब्ध करुन दिले आहेत.



### ग्राहकांना अखंडीत विज पुरवठा द्या – आ. गवळी

वाशिम जिल्ह्यामध्ये वारंवार विज पुरवठा खंडीत होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. पावसाळ्याच्या दिवसात विज वाहीन्यामध्ये मध्ये कमीत कमी तांत्रीक बिघाड व्हावेत या करीता महातिवरणने मान्सुनपुर्व कामे तातडीने पुर्ण करुन वाशिम जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी नागरिकांना अखंडीत विज पुरवठा देण्याकरीता महातिवरणने लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. जिल्ह्याला १०० केव्हीए चे १५० व २०० केव्हीएचे ३ असे एकुण १५३ विद्युत रोहीत्र मिळाले असून उर्वरीत रोहीत्र जिल्हा वार्षीक योजनेतून देण्यासंदर्भात पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याशी चर्चा करणार आहे, असे आ. गवळी यांनी यावेळी सांगीतले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २०४ ■ रविवार, २१ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## बोगस खतांच्या काळ्या बाजाराला लगाम कधी; शेतकऱ्यांचा शासनावर आरोप

### मी करतो मारल्यासारखे, तू कर रडल्यासारखे; मकोकासारख्या कठोर कायद्याची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** राज्यात दरवर्षी बोगस खत, बियाणे आणि कीटकनाशक विक्रीचे प्रकार उघडकीस येत असतानाही संबंधितांवर होणारी कारवाई केवळ दिखाऊ स्वरूपाची असल्याची तीव्र भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. काही दिवसांसाठी परवाने निलंबित करणे किंवा रद्द करणे एवढ्यावरच प्रशासनाची जबाबदारी संपत असल्याने ही कारवाई म्हणजे मी करतो मारल्यासारखे, तू कर रडल्यासारखे असल्याची संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. त्यामुळे अशा शेतकरी लुटारूंवर मकोकासारख्या कठोर कायद्यांतर्गत कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

खरीप आणि रब्बी हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या अडचणींचा गैरफायदा घेत काही कृषी सेवा केंद्र चालक बोगस रासायनिक खत, निकृष्ट बियाणे आणि बनावट कीटकनाशकांची विक्री करतात.



पिकांच्या आशेवर कर्ज काढून किंवा व्याजाने पैसे उभे करून शेतकरी ही उत्पादने खरेदी करतो. मात्र पीक उगवत नाही, उत्पादन घटते आणि अखेर शेतकरी आर्थिक संकटाच्या गर्तेत ढकलला जातो. त्याचा फटका केवळ एका व्यक्तीला नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला बसतो.

अनेकदा फसवणूक झाल्यानंतरही तक्रारींच्या प्रक्रियेत अडकण्यापेक्षा शेतकरी नशिबाला दोष देत गप्प बसतो. याचाच फायदा घेत काही विक्रेते पुन्हा पुन्हा अशाच प्रकारे शेतकऱ्यांची लूट करत असल्याचा आरोप होत आहे. कृषी विभागाच्या तपासणीत बोगस माल आढळल्यानंतरही केवळ परवाना निलंबनाची कारवाई होत असल्याने अशा प्रवृत्तींवर कोणताही वचक राहत नसल्याचे चित्र आहे.

अलीकडेच माजलगाव येथे बोगस खत विक्रीप्रकरणी तीन कृषी सेवा केंद्रांवर कारवाई करून त्यांचे परवाने २ ऑगस्टपर्यंत निलंबित करण्यात आले. मात्र त्यानंतर हे परवाने पुन्हा सुरू होणार असल्याने अशा कारवाईचा फारसा परिणाम होत नसल्याची चर्चा शेतकरी वर्तुळात आहे. त्यामुळे तात्पुरत्या कारवाईऐवजी कायमस्वरूपी परवाना रद्द करणे, फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि संघटित पद्धतीने शेतकरी फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कायद्यांतर्गत कारवाई करणे आवश्यक असल्याची मागणी पुढे येत आहे.

शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या बोगस कृषी उत्पादन विक्रेत्यांविरोधात शासनाने आता कठोर भूमिका घेतली नाही, तर शेतकऱ्यांचा प्रशासनावरील विश्वास आणखी ढासळेल, अशी भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे परवाना निलंबन नव्हे, तर बोगस खत माफियांना कायद्याचा जबरदस्त फआहे देण्याची वेळ आल्याचे मत शेतकरी संघटनांनी व्यक्त केले आहे.

## काटा खोटा, हिशेब खोटा;

# आष्टी बाजार समिती संशयाच्या जाळ्यात

### बाजार समिती संशयाच्या भोवऱ्यात; काटा कुणाचा, कारवाई कुणावर ?

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये उघडकीस आलेल्या कथित बोगस वजन काटा प्रकरणाने संपूर्ण बाजार व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाच्या मालाचे वजन करताना जर काटाच संशयास्पद निघत असेल, तर बाजार समितीच्या कारभारावर विश्वास ठेवायचा तरी कसा, असा प्रश्न आता शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.

दि. १८ जून रोजी दुपारी शेतकरी श्याम देशमुख यांच्या तुरीचे वजन करताना वजन काट्यात तफावत आढळून आल्याची घटना समोर आली. या प्रकारामुळे केवळ एका शेतकऱ्याची नव्हे, तर गेल्या अनेक महिन्यांपासून बाजार समितीत व्यवहार करणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांच्या फसवणुकीची शक्यता निर्माण झाली आहे.





सर्वात गंभीर बाब म्हणजे संबंधित दलाल निमकरडे यांनी स्वतःचा वजन काटा वापरण्याऐवजी दुसऱ्याच वजन काट्यावर व्यवहार का केला बाजार समितीच्या आवारात हा वजन काटा आला कसा त्याचा मालक नेमका कोण आणि तो अधिकृत होता की अनधिकृत? या प्रश्नांची उत्तरे अद्यापही गुलदस्त्यात आहेत. त्यामुळे संपूर्ण व्यवहारावर संशयाचे सावट अधिक गडद झाले आहे.

घोटाळा उघडकीस आल्यानंतरही बाजार समितीचे संचालक मंडळ आणि प्रशासनाकडून ठोस भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा रोष वाढत असून, दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न तर होत नाही ना, अशीही चर्चा परिसरात सुरू झाली आहे.

याच संशयित वजन काट्यावर विश्वास ठेवून असंख्य शेतकऱ्यांनी आपला शेतमाल विकला आहे. त्यामुळे आतापर्यंत किती क्विंटल मालाचे वजन कमी दाखवण्यात आले, किती शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आणि या कथित गैरव्यवहारातून कोणाचा फायदा झाला, याची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

बाजार समितीत वापरल्या जाणाऱ्या वजन काट्यांची नियमित तपासणी होते का होत असेल तर असा संशयास्पद काटा वापरात कसा आला आणि होत नसेल तर नियंत्रण यंत्रणा नेमकी झोपली होती का, असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत.

शेतकऱ्यांच्या घामाच्या प्रत्येक दाण्याचा हिशेब मागितला जात असताना, त्यांच्या मालाचे वजन करणाऱ्या काट्यावरच संशय निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावा, अशी मागणी आता तीव्र होत आहे.

## नशेच्या सौदागाराला पोलिसांचा दणका; एमडी सह आरोपी जेरबंद

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरातील युवकांना अमली पदार्थांच्या विळख्यात ओढण्याचा सुरू असलेला घातक डाव उधळून लावत वर्धा पोलिसांनी इदगाह ग्राउंड परिसरात धडक कारवाई करत एमडी (मेफेड्रोन) या अमली पदार्थासह एका आरोपीला अटक केली. या कारवाईत अमली पदार्थ, मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा एकूण ५१ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव शेख अमीर शेख हमीद (वय ३३, रा. आनंदनगर, वर्धा) असे आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. आरोपीच्या ताब्यातून ३.८७ ग्रॅम एमडी (मेफेड्रोन) हा घातक अमली पदार्थ हस्तगत करण्यात आला. त्याच्यासोबत दोन मोबाईल फोन आणि रोख रक्कमही जप्त करण्यात आली.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम २० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीदरम्यान आरोपीने हा अमली पदार्थ रोशन सहारे (रा. आनंदनगर, वर्धा) याच्याकडून विकत घेतल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. संबंधित आरोपी सध्या फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. दरम्यान, न्यायालयाने शेख अमीर शेख हमीद यास चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून या रॅकेटच्या मुळापर्यंत पोहोचण्यासाठी पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू आहे. शहरात अमली पदार्थांची साखळी किती खोलवर रुजली आहे, याचा तपासही यानिमित्ताने केला जात आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## फित कापण्याची घाई; विद्यार्थ्यांच्या सुविधांचा बळी

### ४५ लाखांचे ग्रंथालय उद्‌घाटनाआधीच वादाच्या भोवऱ्यात

**सेलू जनमाध्यम :** विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे केंद्र म्हणून उभारण्यात आलेल्या ४५ लाख रुपयांच्या ग्रंथालयात पिण्याचे पाणी नाही, शौचालय नाही, तर रात्री प्रकाशाचीही व्यवस्था नाही. मात्र, या गंभीर उणिवांकडे दुर्लक्ष करून उद्‌घाटनाचा सोहळा उरकण्याची घाई सुरू असल्याने सेलू नगर पंचायतीच्या कारभारावर संताप व्यक्त होत आहे.

प्रभाग क्रमांक १६ मध्ये उभारण्यात आलेल्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधाच नसल्याने नागरिक आणि महिलांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. शौचालयाअभावी विद्यार्थी व विद्यार्थीनींची मोठी गैरसोय होत असून परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना आसपासच्या घरांमध्ये पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.



याहून गंभीर बाब म्हणजे, सुविधा अपुऱ्या असतानाच ग्रंथालयाच्या उद्‌घाटनाचा घाट घालण्यात येत आहे. त्यामुळे हा विकासाचा प्रकल्प नसून केवळ राजकीय श्रेय घेण्याचा प्रकार असल्याची टीका नागरिकांतून होत आहे. दरम्यान, ग्रंथालय चालविण्यासाठी निविदा काढण्याच्या हालचालींमुळे भविष्यात विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारले जाण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. सत्तारूढ पक्षाचे सदस्य शैलेंद्र दफ्तरी यांनी सुविधा पूर्ण होईपर्यंत उद्‌घाटनाला विरोध दर्शविल्याने हा वाद आणखी चिघळला आहे.

## नागपाल हत्याकांडात नवा ट्विस्ट : चार आरोपींच्या जामिनावर २४ जूनला निर्णय

**वर्धा जनमाध्यम :** पुलगाव येथील भाजप शहर महामंत्री भरत नागपाल हत्याकांडात शनिवारी महत्त्वपूर्ण घडामोड घडली. या बहुचर्चित प्रकरणातील १३ आरोपींपैकी चार आरोपींनी दाखल केलेल्या जामीन अर्जावर चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा न्यायालयात सुनावणी झाली. मात्र न्यायालयाने याबाबतचा निर्णय राखून ठेवत २४ जून रोजी आदेश देण्याचे संकेत दिल्याने प्रकरणाकडे पुन्हा एकदा सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.



जामीनासाठी अर्ज करणाऱ्यांमध्ये वर्ध्यातील त्रिमूर्ती नगर येथील अतुल मोटघरे, गांधीनगर येथील प्रफुल्ल उमाटे, सावंगी मेघे येथील नानाजी नगर निवासी सुनील झोरे तसेच भद्रावती येथील गितेश वसंतराव सातपुते यांचा समावेश आहे. या चारही आरोपींच्या वतीने न्यायालयात सविस्तर युक्तिवाद करण्यात आला. त्यावर सरकारी पक्षानेही आपली बाजू मांडली. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने निर्णय पुढे ढकलला.

भरत नागपाल हत्याकांडाने सुरुवातीपासूनच जिल्ह्यात मोठी खळबळ उडवून दिली होती. राजकीय आणि सामाजिक वर्तुळात या प्रकरणाची चर्चा सुरू असून तपास यंत्रणांकडून पुरावे, आरोपींची भूमिका आणि कटकारस्थानाच्या विविध पैलूंची छाननी केली जात आहे. या प्रकरणातील प्रत्येक न्यायालयीन घडामोडीवर नागरिक, राजकीय पक्ष आणि नागपाल कुटुंबीयांचे बारकाईने लक्ष आहे. दरम्यान, आरोपींच्या जामीन अर्जावर २४ जून रोजी होणाऱ्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. न्यायालयाचा निर्णय या गाजलेल्या प्रकरणातील पुढील न्यायालयीन प्रक्रियेसाठी महत्त्वाचा ठरणार असल्याची चर्चा कायदेवर्तुळात सुरू आहे.

आता २४ जून रोजी न्यायालय काय निर्णय देते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून या निर्णयामुळे प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### इंग्रजकालीन जलवाहिनीवर डल्ला

## आर्वीत भंगार माफियाचा सुळसुळाट

## खा. अमर काळेंची उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी नगरपरिषदेच्या हद्दीतील इंग्रजकालीन मौल्यवान जलवाहिनी चोरीप्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून, या प्रकरणामागे नेमके कोणाचे आशीर्वाद आहेत, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. ऐतिहासिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या जलवाहिनीतील तांबे, पितळ आणि कांस्ययुक्त पाइप गायब झाल्याच्या आरोपांनंतर खासदार अमर काळे यांनी थेट नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे धाव घेत उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

आर्वी शहरात नवीन जलपुरवठा योजना कार्यान्वित झाल्यानंतर जुनी जलवाहिनी जमिनीतच शिल्लक होती. इंग्रजकालीन वारसा असलेल्या या पाइपलाईनमध्ये मौल्यवान धातूंचा वापर झाल्याने तिचे मोठे आर्थिक मूल्य होते. मात्र ही संपूर्ण पाइपलाईन संशयास्पदरीत्या गायब झाल्याची बाब नगरसेवकांच्या निदर्शनास आली. यानंतर त्यांनी खासदार अमर काळे यांच्याकडे तक्रार दाखल केली.



या तक्रारीची गंभीर दखल घेत काळे यांनी नगरविकास विभागाला पाठविलेल्या पत्रात संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि तात्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे. विशेष म्हणजे या चोरीप्रकरणामागे राजकीय आश्रय लाभलेल्या काही भंगार व्यावसायिकांचा हात असल्याची माहिती मिळाल्याचा उल्लेखही त्यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

खासदार काळे यांनी केवळ आर्वीतील जलवाहिनी चोरीपुरतीच मर्यादा न ठेवता जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांमधील भंगार साहित्याच्या गैरव्यवहाराकडेही लक्ष वेधले आहे. काही भंगार व्यावसायिकांकडून शासकीय मालमत्ता बेकायदेशीररीत्या ताब्यात घेतल्याच्या तक्रारी समोर येत असल्याने सरकारी संपत्तीची संघटित लूट सुरू असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

शासकीय मालमत्ता कोणाच्या बापाची नाही. जनतेच्या पैशातून उभारलेल्या संपत्तीवर डल्ला मारणाऱ्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न झाला तर ते सहन केले जाणार नाही,असा स्पष्ट इशारा या पत्रातून देण्यात आल्याचे बोलले जात आहे.

त्यामुळे आर्वीतील कथित जलवाहिनी चोरीप्रकरण आता केवळ भंगाराचा मुद्दा न राहता शासकीय मालमत्तेच्या सुरक्षेचा आणि प्रशासनाच्या पारदर्शकतेचा मोठा राजकीय प्रश्न बनला आहे.

### चल वर्धेत... शेतकरी तुझी वाट पाहतोय...

## मॉन्सूनची दगाबाजी; रखडलेल्या पेरण्यांनी शिवारात चिंतेचे सावट

**वर्धा जनमाध्यम :** चल वर्धेत, लोक तुझी वाट पाहत आहेत, अशा आशयाचे फलक आणि संदेश सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. मात्र हा केवळ विनोद नाही, तर पावसाच्या प्रतीक्षेत आसुसलेल्या शेतकऱ्यांच्या मनातील आर्त हाक आहे. २० जून उजाडला तरी राज्यात मॉन्सूनच्या पावसाचा पत्ता नसल्याने शेतकरी वर्ग चिंतेच्या गर्तेत सापडला आहे.

यंदा केरळमध्ये मॉन्सून केवळ दोन दिवस उशिराने दाखल झाला होता. त्यामुळे महाराष्ट्रातही वेळेत पाऊस येईल, अशी अपेक्षा होती. मात्र अरबी समुद्रात मॉन्सूनची वाटचाल थांबल्याने राज्यात पावसाचे आगमन लांबले आहे. हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, पुढील दोन ते तीन दिवसही मॉन्सूनची विशेष प्रगती होण्याची शक्यता नसून ही स्थिती शेतकऱ्यांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे.





वर्ध्यासह विदर्भातील अनेक भागांत पेरणीसाठी शेतजमिनी तयार आहेत. बियाणे, खते आणि मशागतीवर हजारो रुपयांचा खर्च करून शेतकरी आकाशाकडे आशेने पाहत आहेत. मात्र ढग येतात आणि निघून जातात. परिणामी खरीप हंगामाची सुरुवातच अडचणीत आली आहे. पावसाअभावी पेरण्या रखडल्या असून अनेक शेतकरी संभ्रमावस्थेत आहेत.

दरम्यान, उष्णतेनेही कडेलोट केला आहे. भारतीय हवामान विभागाने राज्यातील काही जिल्ह्यांना उष्णतेचा इशारा दिला आहे. तापमानात होत असलेल्या वाढीमुळे जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असून पिकांच्या नियोजनावर त्याचा परिणाम होत आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जून महिना मोठ्या प्रमाणात कोरडा जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. आता १ जुलैनंतरच राज्यात जोरदार पावसाला सुरुवात होण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. त्यामुळे पुढील किमान आठ दिवस तरी शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा करावी लागणार आहे. एकीकडे शेतीच्या आशा आणि दुसरीकडे निसर्गाची अनिश्चितता यामध्ये शेतकरी भरडला जात आहे. सरकारने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. कारण आज वर्धाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र एका प्रश्नाने व्याकूळ झाला आहे, पावसा, अखेर तू कधी येणार

## आशेचा किरण ठरले देवळी पोलीस;

## सात बेपत्ता लेकरांचा सुखरूप घरी परतावा

**देवळी जनमाध्यम :** घरातून बेपत्ता झालेल्या लेकरांच्या शोधासाठी पालकांचे डोळे वाटेकडे लागलेले असतानाच देवळी पोलिसांनी आशेचा किरण ठरत सात मुला-मुलींना सुखरूप शोधून त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केले. या यशस्वी कारवाईमुळे अनेक दिवसांच्या चिंतेनंतर पालकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले असून त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

पोलिस महासंचालकांच्या आदेशानुसार राज्यभर राबविण्यात आलेल्या ऑपरेशन शोध मोहिमेअंतर्गत देवळी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या मिसिंग व अपहरणाच्या प्रकरणांचा विशेष आढावा घेण्यात आला. त्यानुसार पोलिसांनी तांत्रिक तपास, गुप्त माहिती आणि कौशल्यपूर्ण शोधमोहीम राबवत बेपत्ता मुला-मुलींचा माग काढला.

या मोहिमेत पाच मुली आणि दोन मुलांना सुरक्षित शोधण्यात पोलिसांना यश आले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सर्वांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. विशेष म्हणजे, अल्पवयीन मुलीच्या अपहरण प्रकरणात आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्यात आले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

बेपत्ता लेकरे सुखरूप परतल्याने अनेक कुटुंबांच्या घरात पुन्हा आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. लेकरांना कवेत घेताना पालकांच्या डोळ्यांतून वाहणारे आनंदाश्रू आणि त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान हीच या मोहिमेची खरी पावती ठरली.

ही उल्लेखनीय कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी वंदना कारखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संदीप कापडे, पोलिस उपनिरीक्षक अश्विन गजभिये, शिवराज जाधव तसेच पोलिस कर्मचारी सतीश दरवरे आणि दुर्गेश बानदे यांनी यशस्वीपणे पार पाडली.

## लेडी सिंघम'चा खाकी दणका : ४२ गावांत दारू-जुगार बंद; माफियांचे धाबे दणाणले

**अल्लीपूर जनमाध्यम :** अल्लीपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ४२ गावांत अवैध दारू व जुगार व्यवसायावर मोठा आळा बसल्याने परिसरात अघोषित दारूबंदीचे वातावरण निर्माण झाले आहे. नव्याने रुजू झालेल्या ठाणेदार संगीता हेलोंडे यांनी धडक कारवाईचा सपाटा लावत दारू माफिया व अवैध धंदेवाल्यांची झोप उडवली आहे.

वर्षानुवर्षे गावागावांत सहज उपलब्ध होणारी मोहा, देशी व इंग्लिश दारू तसेच सटापट्टी व जुगाराचे अड्डे पोलिसांच्या वाढत्या वचकामुळे बंद पडू लागले आहेत. त्यामुळे महिलांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

सहायक पोलिस उपनिरीक्षक वर्षा तांदूळकर यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या मोहिमेमुळे अवैध धंदेगारांचे आर्थिक गणितच बिघडले आहे.

अवैध रेती तस्करीसह इतर बेकायदेशीर व्यवसायांवरही पोलिसांनी कठोर नजर ठेवली आहे. वरिष्ठांच्या आदेशानुसार दारूबंदी आणि अवैध धंदेविरोधी मोहीम सुरू असून ती आणखी प्रभावीपणे राबविण्यात येईल, असे ठाणेदार संगीता हेलोंडे यांनी स्पष्ट केले. त्यांच्या धाडसी भूमिकेमुळे परिसरात कायद्याचा दरारा पुन्हा निर्माण झाल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

### नावात बदल

माझे पूर्वी SHABEENA ANJUM ABDUL MAJEED असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील SAMINA PARVIN ABDUL SALIM नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: वीर भगतसिंग वॉर्ड हिंगणघाट जिल्हा वर्धा ४४२३०१

### नावात बदल

माझे पूर्वी BALI PANJAB KAWADKAR असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील POONAM PRASHANT SHUBHKAR नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- वॉर्ड नं ५ मनीष नगर म्हसाळा वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पूर्वी MOHD SHADAB ABDUL SALIM असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील MOHAMMAD SHADAB ABDUL SALIM नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता: संत तुकडोजी वॉर्ड हिंगणघाट जि.वर्धा ४४२३०१


# ये..रे..ये..रे..पावसा

## आजपासून दक्षिणायना सह वर्षा ऋतूला प्रारंभ..

**चांदूरबाजार/वार्ताहर**

कॅलेंडर व घड्याळा नुसार कालगणना सुरू होण्यापूर्वी सूर्य व चंद्र यावर आधारित,घटी व पळे तथा तिथी नुसार कालगणना केल्या जात होती.साधारणत: या कालगणनेचा पाच हजार वर्षांचा इतिहास ज्ञात आहे.तत्पूर्वी ही सत्ययुग, त्रेतायुग व व्दापारयुगातही याच पध्दतीने कालगणना केल्या जात होती.असे या शास्त्राचे अभ्यासक सांगतात.तिथी म्हणजे आजच्या तारखा,तर घटी व पळे म्हणजे तास व सेकंद.तसेच कालगणनेसाठी शास्त्र संमत बारा महिन्यांची, सहा ऋतूंची निर्मिती व सुर्याचे दक्षिणायन व उत्तरायण भ्रमण. यांची सुसंगत निर्मिती करून कालगणना शास्त्र,विकसित करण्यात आले होते.याचाच आधार घेऊन कालगणना केल्या जात होती.ती पंचांग शास्त्राव्दारे आजही सुरू आहे. त्या कालगणने शास्त्रा नुसार आजपासून पावसाळ्याला म्हणजेच वर्षा ऋतूला व दक्षिणायनला प्रारंभ होत आहे.

हजारो वर्षांपूर्वीची कालगणना करतांना वर्षाची सहा ऋतूंमध्ये विभागनी करण्यात आली आहे.प्रत्येक ऋतू हा साधारणतः दोन महिन्यांचा आहे.तसेच पुन्हा एका वर्षाला सहा-सहा महिने अशा दोन भागात विभाजन करण्यात आले आहे.या सहा महिन्यांच्या एका भागाला उत्तरायण व दुसऱ्या भागाला



दक्षिणायन असे म्हटले आहे.उत्तरायणाला सुरुवात २० डिसेंबरला होते.दक्षिणायनाची सुरवार २१जूनला होते.उत्तरायणात सुर्य दक्षिणेकडून उत्तरेकडे भ्रमण करतो.त्यामुळेच उत्तरायणात दिवस हा कला कलाने वाढत जातो.तर दक्षिणायनात सूर्य उत्तरेकडून दक्षिणेकडे भ्रमण करतो.परिणामी दक्षिणायनात दिवस कला कलाने लहान होत जातो.म्हणूनच निसर्गातील ऋतूचक्राचे संतुलनासाठी उत्तरायण व दक्षिणायनला अनन्य साधारण महत्व आहे.खगोल शास्त्राची निर्मिती होण्यापूर्वी हजारो वर्षांपूर्वी आपल्या ऋषीमुनींनी यांची रचना केली होती.

भारतीय ऋषीमुनींच्या खगोलशास्त्राच्या रचनेत,त्यांनी निर्माण केलेल्या सहा ऋतूंनाही अनन्य साधारण महत्व आहे.वसंत ऋतू,ग्रिष्म ऋतू,वर्षा ऋतू ,शरद ऋतू,हेमंत ऋतू,शिशिर ऋतू असे ते सहा ऋतू होय.सहा ऋतूंचे सहा सोहळे,प्रत्येकाचे महत्व आगळे.असे म्हणत कवींनी प्रत्येक ऋतूंचे गोडवे गात, प्रत्येक ऋतूच वेगळेपणही विषद करून मोठेपण सांगितले आहे.तर साहित्यिकांनीही आपल्या साहित्यात ऋतूनिहाय कौतुक करत प्रत्येक ऋतूचे सुरेख असे वर्णन केले आहे.पूर्वाश्रमीच्या हजारो वर्षांपूर्वीच्या ऋतू चक्राचे असे गोडवे, कौतुक व वर्णन फक्त भारतीय संस्कृतीतच दिसून येते.त्यामुळेच संपूर्ण जगाला आजही भारतीय संस्कृतीने भुरळ घातल्याचे दिसून येते.

सहा ऋतूंमध्ये वसंत व ग्रिष्म ऋतू म्हणजे उन्हाळा.वर्षा व शरद ऋतू म्हणजे पावसाळा.तर हेमंत व शिशिर ऋतू म्हणजे हिवाळा. अशा प्रकारे विभागणी केली आहे.आजच्या घटकेला ग्लोबलवार्मिंगमुळे या ऋतू चक्रात कालावधी थोडा फार बदल झाला आहे.मात्र फारसा बदल झालेला नाही.या पारंपरिक ऋतू चक्राचा विचार करता,खरा पावसाळा हा दक्षिणायनातच सुरू होतो.तो ही वर्षा ऋतू च्या प्रारंभा पासूनच.हजारो वर्षांपूर्वी आपल्या पुर्वजांनी खगोलशास्त्राचा किती खोलवर अभ्यास करून,या ऋतू चक्राची मांडणी केली .हे यावरून लक्षात येते.आज ही भारतीयांच्या या ऋतू चक्राला कोणी चॅलेंज देऊ शकल नाही.यावरूनच या ऋतू चक्राची निर्विवाद सत्यता सिध्द होते.

## पाऊस लांबल्यामुळे शेतकरी चिंतेत

### पिके वाचवण्यासाठी ठिंबक सिंचनाचा वापर

**अचलपूर/वार्ताहर**



सर्वसाधारणपणे पूर्वी जून महिन्यात पाऊस येणारच याची ठाम शाश्वती असायची,मात्र सद्यस्थितीत वाढते हवामान बदल, एल निनोचा धोका आणि हवामान तज्ज्ञांनी वर्तवलेले विविध अंदाज यामुळे अचलपूर तालुक्यासह राज्यातील शेतकरी धास्तावला आहे. मान्सून स्थिरावण्यास विलंब होत असल्याने खरीप हंगामाच्या पिकांवर परिणाम होत आहे. विहिरींनी तळ गाठल्याने अचलपूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनावर पिके वाचवण्यासाठी शेतकरी धडपड करत आहेत.

सध्या अचलपूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये शेतकरी विहीर, बोअरवेल शेततळ्यातील उपलब्ध पाण्याच्या आधारे कपाशीची लागवड करत आहेत. विशेषतः ठिबक सिंचन व्यवस्था असलेल्या शेतकऱ्यांनी कपाशी लागवडीची कामे मोठ्या प्रमाणात पूर्ण केली. पावसाची वाट पाहत बसल्यास लागवड उशिरा होऊन उत्पादनावर परिणाम होऊ शकतो, या भीतीने अनेकांनी हा पर्याय स्वीकारला आहे.दरम्यान, कपाशीबरोबरच सोयाबीन, तूर, मूग, यांसारख्या इतर खरीप पिकांच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात रखडल्या आहेत. अनेक शेत अजूनही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. मात्र या पिकांच्या पुढील वाढीसाठी नियमित पावसाची गरज असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे.

## प्रा.बी.टी.देशमुख यांना श्रद्धांजली

### लढवय्या आवाज हरपला



प्रा. बी. टी. देशमुख सरांचे निधन म्हणजे विदर्भाच्या विकास चळवळीतील एक युग संपल्याची भावना निर्माण करणारी घटना आहे. विदर्भाच्या अनुशेष निर्मूलनाचा प्रश्न त्यांनी केवळ राजकीय मुद्दा म्हणून नव्हे, तर जनतेच्या हक्काचा विषय म्हणून आयुष्यभर लावून धरला. अभ्यासपूर्ण मांडणी, तत्त्वनिष्ठ भूमिका आणि जनहितासाठीची अखंड बांधिलकी ही त्यांची खरी ओळख होती.विधिमंडळात त्यांनी केलेला संघर्ष, शिक्षक आणि पदवीधरांच्या प्रश्नांसाठी दिलेले नेतृत्व तसेच विदर्भाच्या विकासासाठी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील. त्यांच्या जाण्याने सार्वजनिक जीवनातील एक सजग, अभ्यासू आणि लढवय्या आवाज कायमचा हरपला आहे.त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली.

**- खा. बळवंत वानखडे**

### विदर्भाच्या विकासाचा लढवय्या

विदर्भाच्या अनुशेष निर्मूलनासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे, शिक्षण क्षेत्रातील प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने लढणारे आणि लोकशिक्षक म्हणून समाजमनात अढळ स्थान निर्माण करणारे माजी आमदार प्रा. बी. टी. देशमुख यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या निधनाने विदर्भाने एक अभ्यासू, तत्त्वनिष्ठ आणि जनतेच्या प्रश्नांप्रती संवेदनशील नेतृत्व गमावले आहे, अशी भावना श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी व्यक्त केली.

प्रा.बी.टी.देशमुख हे केवळ लोकप्रतिनिधी नव्हते, तर ते विचारांचे आणि मूल्यांचे शिक्षक होते. शिक्षण, समाजकारण आणि लोकशाही मूल्यांची जपणूक करत त्यांनी संपूर्ण आयुष्य जनहितासाठी वाहिले. अमरावती विद्यापीठ स्थापनेपासून शिक्षक, प्राध्यापक आणि पदवीधरांच्या प्रश्नांपर्यंत त्यांनी केलेला संघर्ष हा भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.विदर्भाच्या विकासाचा प्रश्न त्यांनी केवळ राजकीय विषय म्हणून मांडला नाही, तर तो सामाजिक न्यायाचा मुद्दा म्हणून सातत्याने लावून धरला. अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठविण्याची त्यांची वृत्ती आणि अभ्यासपूर्ण मांडणी यामुळे त्यांना सभागृहात तसेच समाजात विशेष आदराचे स्थान प्राप्त झाले होते.प्रा.देशमुख यांच्याशी माझे अनेक दशकांचे स्नेहसंबंध होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साधेपणा, प्रामाणिकपणा आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी यांचा सुंदर संगम होता. विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना तसेच असंख्य अनुयायांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच भावपूर्ण श्रद्धांजली.

**पद्मश्री प्रभाकरराव वैद्य**

### लोकाभिमुख नेतृत्व

माजी आमदार, शिक्षणतज्ज्ञ,अभ्यासू संसदीय नेते तसेच विदर्भाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनाच्या प्रगतीसाठी आयुष्यभर समर्पित राहिलेले आदरणीय प्रा.बी. टी. देशमुख सर यांच्या निधनाने विदर्भासह संपूर्ण शैक्षणिक, सामाजिक आणि सार्वजनिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.अमरावती पदवीधर मतदारसंघाचे विधान परिषदेवर सलग अनेक वर्षे प्रभावी प्रतिनिधित्व करताना त्यांनी शिक्षण, शिक्षक, विद्यार्थी, सिंचन, पाणीपुरवठा तसेच विविध जनहिताच्या प्रश्नांना अभ्यासपूर्ण, तत्त्वनिष्ठ आणि निर्भीडपणे वाचा फोडली.त्यांच्या शिस्तप्रियतेमुळे,सखोल अभ्यासू वृत्तीमुळे आणि लोकहिताप्रती असलेल्या अखंड बांधिलकीमुळे त्यांना सर्वपक्षीय आदर आणि सन्मान लाभला.विदर्भातील विविध प्रश्नांच्या निराकरणासाठी त्यांनी उल्लेखनीय आणि निःस्वार्थ योगदान दिले.समाजसेवा, शिक्षणाविषयीची निष्ठा आणि लोककल्याणाची तळमळ ही त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याची प्रेरणास्थाने होती.सरांच्या निधनाने समाजाने एक दूरदर्शी, अभ्यासू, तत्त्वनिष्ठ आणि लोकाभिमुख नेतृत्व गमावले आहे. त्यांचे कार्य, विचार, मूल्यनिष्ठ जीवन आणि जनसेवेचा आदर्श भावी पिढ्यांसाठी सदैव प्रेरणादायी राहील. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती प्रदान करो आणि सरांच्या कुटुंबीयांना,मित्रपरिवाराला तसेच असंख्य अनुयायांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो,ही विनम्र प्रार्थना.भावपूर्ण श्रद्धांजली!

**सुदर्शन जैन, बीजेएस**

### लोकनेता गमावला

प्रा.बी.टी. देशमुख यांचे निधन ही विदर्भाच्या सार्वजनिक जीवनाची मोठी हानी आहे. बेलोरा हे आमचे समान जन्मगाव असल्याने त्यांच्याविषयी माझ्या मनात विशेष जिव्हाळा आणि आदर होता. सिंचन, पाणी, शिक्षण आणि विदर्भाच्या अनुशेषाच्या प्रश्नांवर त्यांनी आयुष्यभर अभ्यासपूर्ण आणि निस्वार्थ लढा दिला. साधेपणा, स्वच्छ चारित्र्य आणि तत्त्वनिष्ठ राजकारण यांचे ते जिवंत उदाहरण होते. त्यांच्या जाण्याने विदर्भाने एक अभ्यासू, प्रामाणिक आणि मूल्याधिष्ठित लोकनेता गमावला आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**-बच्चू कडू आमदार,महाराष्ट्र विधान परिषद**

## जनतेचे सेवक झालेत नाटकखोर?

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

नुकत्याच समाज माध्यमावर काही प्रभागातील नगरसेवक व नगसेविका सहलीला गेले असता,एका हॉटेलच्या रूम मध्ये फिल्मी गाण्यावर बनविलेल्या रील मध्ये थिरकतानाचा प्रसारीत व्हिडीओ अनेकांच्या दृष्टीस पडला. नगरसेवकांच्या ह्या व्हिडिओ मधील मौज मस्ती अनेकांच्या जिव्हारी आली असून नगरसेवक पदाला हे शोभत का? ह्या वरून विरोधक नगरसेवकांवर ताशेरे ओढू पाहत आहे. केवळ विरंगुळा म्हणून केलेल्या ह्या रील मुळे खरोखर हे सर्व नाटकखोर ठरतील काय ? याउलट सर्व नगरसेवक व नगरसेविका यांच्या ह्या कृतीमुळे त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करण्याच्या अधिकार कुणाला आहे? अशीही चर्चा शहरातील सुजान नागरिकांकडून ऐकायला मिळत आहे.

नगर परिषदेच्या निवडणुका होऊन सहा महिन्याचा कालावधी जरी लोटला तरी शहरात निवडणूक काळात जनतेस दिलेल्या रस्ते व नाल्या बांधकामाचे काम मधल्या काळात प्रत्यक्षात तसेच समाज माध्यमावर दिसून आले. जनतेने ह्या त्यांच्या कार्यासाठी कौतुक सुध्दा केल्याचे पाहावयास मिळाले आहे.

### ‘तो’व्हिडिओ झाला व्हायरल

■ प्रसार माध्यमावर फिरत असलेली रील केवळ विरंगुळा म्हणून तयार केली आहे.याचा अर्थ असा नाही की आम्हाला जनतेच्या कामाचा विसर पडला आहे. आमच्या ह्या रील वर जर विरोधक आक्षेप घेत असेल तर हा तर आमच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर केलेला आघातच समजावा लागेल.

**- पप्पू भालेराव, (भाजप नगरसेवक)**

■ प्रसार माध्यमावर वायरल झालेली नगरसेवकांची रील बघितलेली आहे पण त्यात आक्षेप घेण्यासारखे काही आढळत नाही. केवळ एक विरंगुळा म्हणून तयार करण्यात आलेल्या रील वरून नगरसेवकांच्या कार्यप्रणालीवर आक्षेप घेणे चुकीचे वाटते.माझ्या प्रभागतील नगसेवक व नगरसेविका तर प्रभगातील कामासाठी नेहमीच तत्पर असतातच.

**-राजेंद्र मस्के(नागरिक)माजी मुख्याध्यापक**

एन.ओ.सी.साठी अद्यापही तात्कळत आहेत.काही प्रभाग तर स्ट्रीट लाईट विना अंधारातच असल्याने कॉलनीत राहणारे वृद्ध न नागरिक व लहान मुलांना त्रास होत आहे. अनेक प्रभागातील नागरिकांना मात्र स्वच्छते विषयी सुविधा मिळाव्यात तसेच पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे तसेच पावसाळ्यापूर्वी नाले व नाल्याची साफसफाई करणे गरजेचे आहे.

मात्र सर्वच प्रभागातील नगरसेवक प्राधाण्यक्रमाने काम करण्यात व्यस्त असल्याचे

■ अशा प्रकारचे गलिच्छ राजकारण शहरात सुरू असून मंजूर झालेली जी कामे होती त्या कामांना ब्रेक लावण्यात आलेला आहे. महारुद्र नगरमध्ये लिटिल स्टार ही शाळा असून या शाळेत जाण्याकरिता पावसाळ्यामध्ये पालकांना व त्यांच्या पाल्यांना कसरत करावी लागते. आम्हाला सहा महिने आधी आश्वासन देण्यात आले होते की तुमची कामे नगरपरिषद निवडणूक झाल्याबरोबर करण्यात येईल पण या गलिच्छ राजकारणामुळे अद्यापही ते कामे झाली नाही मग याला जबाबदार कोण? यामध्ये आमच्यासारख्या सामान्य जनतेची काय चूक.

**संजय ठाकूर**
**महारुद्र नगर, चांदुर रेल्वे**

## आरटीओ कर्मचाऱ्यांच्या बेमुदत संपामुळे शासनाला कोट्यवधींचा फटका

### अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांत वाहन व्यवहार ठप्प

**अमरावती/का.प्र.**

मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या बेमुदत संपाचा फटका आता थेट शासनाच्या महसुलाला बसू लागला आहे. अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, खामगाव, वाशिम आणि बुलढाणा या पाच जिल्ह्यांतील प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांमधील बहुतांश सेवा ठप्प झाल्याने शासनाच्या तिजोरीत दररोज सुमारे ५ कोटी रुपयांचा महसूल जमा होण्यास अडथळा निर्माण झाला आहे.

कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याच्या निषेधार्थ सुरू असलेल्या या राज्यव्यापी संपामुळे वाहन नोंदणी, वाहन हस्तांतरण,लायसन्स नूतनीकरण,परवाना नूतनीकरण, कर भरणा, फिटनेस तपासणी, परमिट नूतनीकरण व मंजुरी तसेच खटला विभागातील अनेक सेवा प्रभावित झाल्या आहेत.परिणामी वाहनधारक, परिवहन व्यावसायिक आणि नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.दररोज करोडो रुपयांचे व्यवहार आरटीओ कार्यालयांमार्फत होत असतात. मात्र संपामुळे हे व्यवहार पूर्णपणे विस्कळीत झाले असून शासनाच्या महसुलात मोठी घट नोंदविली जात आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, आकृतीबंध मंजूर होऊनही सेवा प्रवेश नियम अद्याप लागू करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पदोन्नती, पदभरती आणि इतर प्रशासकीय बाबी वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत.संपाचा कालावधी वाढल्यास केवळ महसुली नव्हे तर वाहन व्यवहारांची राज्यात मोठी प्रलंबितता निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी कर्मचारी संघटनेचे अनिल मानकर, संदीप खवले,अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, अमोल माटोडे,संजय चौधरी, मनोज खोब्रागडे, देवेंद्र कळमकर, जयसिंग राठोड, अरुण वाघमारे, पराग जाधव, प्रीती डोंगरे, यशवंत रामटेके, अनिल मेश्राम आदी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## चांदुर रेल्वे शहरात विनापरवाना दारू विक्रीचा सुळसुळाट

### एक्साईज विभाग व पोलीस प्रशासन कुंभकर्णी झोपेत

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

शहर व ग्रामीण भागात विना परवाना देशी व विदेशी दारूची खुल्या विक्री होत असल्याचा आरोप नागरिक व महिला वर्ग आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी केला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग, अन्न प्रशासन तसेच स्थानिक प्रशासनाच्या कथित दुर्लक्षामुळे अवैध दारू व्यवसायला खत पाणी मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील काही पानटपरी, तर काही विशिष्ट भागातील बंद घरामधून देशी विदेशी दारूची विक्री सुरू



आहे.अनेक ठिकाणी कोणताही वैद्य परवाना नसताना विविध ब्रँडच्या दारूच्या बाटल्या तसेच हातभट्टी दारू सहज उपलब्ध होत असल्याचे सांगितले जाते. रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या बियर बार मुळे शहरात संशयास्पद हालचालीली वाढल्याची तक्रार गावातील नागरिक करत आहे. दारूची सहज उपलब्धता वाढल्याने तरुणांमध्ये व्यासनधनीतेचे दमन वाढत असून चोरी भांडणे मारामाऱ्या आणि कौटुंबिक वादाच्या घटनांमध्येही वाढ झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे रात्री शतपावली फिरणाऱ्या महिला व ज्येष्ठ नागरिक, पुरुष,यांच्या मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवैध दारू विक्री विरोधात आवाज उठवणाऱ्यांना धमक्या दिल्या जात असल्याचे काही चे म्हणणे आहे. काही विक्रेत्याकडून दादागिरी केली जात असून त्यामुळे अनेक नागरिक तक्रार करण्यास धजावत नसल्याचे सांगितले जाते.महिला बचत गट,पालक,आणि नागरिकांनी अनेक वेळा जिल्हाधिकारी कार्यालय राज्य उत्पादन शुल्क, पोलीस प्रशासन विभाग, अन्न व औषधी प्रशासनाने विशेष मोहीम राबवून संबंधितांवर कठोर कारवाई करावी तसेच निष्क्रिय व अधिकाऱ्यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी अशी मागणी करण्यात येत आहे. आता तरी प्रशासन किती गांभीर्याने लक्ष देते. याकडे नागरिकांची लक्ष लागले आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिवस

वृद्धावस्था ही काही निवृत्ती नाही,तर शरीर आणि मनाच्या निरामयतेसाठी योगाची कास धरण्याची हीच खरी वेळ आहे.वय वाढणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे,परंतु वाढत्या वयासोबत शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याचा समतोल राखणे हे आजच्या काळात सर्वात मोठे आव्हान बनले आहे. निरोगी वृद्धत्वाचा अर्थ केवळ जास्त काळ जगणे नसून, तो काळ आजारमुक्त आणि आनंदाने जगणे होय. यामध्ये ‘योग’ ही भारताची प्राचीन जीवनशैली अत्यंत महत्त्वाची आणि प्रभावी भूमिका बजावते. वृद्ध लोकांचे आरोग्य सुधारणे आणि संपूर्ण आयुष्यभर शारीरिक व भावनिक संतुलन टिकवून ठेवण्यास मदत करणे या उद्देशाने आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जुन २०२६ ची मध्यवर्ती संकल्पना/थीम ‘निरोगी वार्धक्यासाठी योग’ (योगा फॉर हेल्दी एजिंग ) अशी आहे.

योग आणि वार्धक्य यांचा अतिशय जवळचा व सखोल परस्पर संबंध आहे. नियमित योगाभ्यासाने वार्धक्यातील शारीरिक व मानसिक समस्यांचे व्यवस्थापन उत्तम प्रकारे होते. हा सराव वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावतो, चैतन्य टिकवतो आणि ज्येष्ठ नागरिकांना स्वतंत्र व निरोगी आयुष्य जगण्यास मदत करतो. योगशास्त्र हे वार्धक्याच्या प्रक्रियेला मंदावण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी एक वरदान आहे. नियमित योगाभ्यासामुळे वृद्धावस्थेत येणारे ताणतणाव कमी होतात, लवचिकता व संतुलन सुधारते आणि वार्धक्य सहज,आनंदी व स्वावलंबी बनते. शरीरातील रक्ताभिसरण वाढते, अवयव स्वच्छ व निर्विष होतात,लवचिकता येते आणि ताकद वाढते, आराम मिळतो आणि वर्तमान क्षणाची जाणीव होते. या सर्व फायद्यांमुळे दीर्घायुष्य लाभते आणि अकाली वृद्धत्व टळते.लवचिकता आणि संतुलन: वाढत्या वयासोबत हाडे ठिसूळ होणे आणि सांधेदुखी (उदा. संधिवात) यांसारख्या समस्या उद्भवतात. योगासने (उदा. ताडासन, सुक्ष्म व्यायाम) स्नायू बळकट करतात आणि शरीराची लवचिकता टिकवून ठेवतात. योगामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि पचनाक्रिया उत्तम राहते.आसनांच्या सरावाने तोल सुधारतो, ज्यामुळे वृद्धापकाळात पडण्याची व दुखापत होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते.मानसिक स्वास्थ्य आणि तणावमुक्ती: वृद्धापकाळात अनेकदा एकाकीपण,नैराश्य / निद्रानाशाचा त्रास होतो. योग आणि ध्यान यांमुळे मन शांत होते. प्राणायाम (उदा.अनुलोम-विलोम, भ्रामरी) मेंदूला ऑक्सिजनचा पुरवठा वाढवून चिंता आणि ताण कमी करतात. या मानसिक स्थिरतेमुळे वृद्ध व्यक्तींना सकारात्मक ऊर्जा मिळते आणि जीवनातील उत्साह टिकून राहतो.

रक्ताभिसरण आणि हृदय:प्राणायाम आणि हलक्या आसनांमुळे रक्ताभिसरण सुधारते, रक्तदाब नियंत्रणात राहतो आणि हृदय निरोगी राहते. सेल्युलर वृद्धत्व मंदावणे: वैज्ञानिक संशोधनानुसार, योगाभ्यास पेशींच्या पातळीवर वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावण्यास आणि पेशींचे नुकसान रोखण्यास मदत करतो. स्मरणशक्ती: नियमित सरावाने मेंदूतील पेशींची कार्यक्षमता सुधारते, ज्यामुळे वाढत्या वयातील विस्मरणाची समस्या दूर होऊ शकते.रोगप्रतिकारशक्ती आणि दीर्घायुष्य:तणाव कमी झाल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढते. योग हे शरीर आणि मनाचे संतुलन साधणारे माध्यम असल्याने अनेक जुनाट आजारांपासून बचाव होतो. योगशास्त्र आणि आयुर्वेद यांच्या समन्वयातून दीर्घायुष्य लाभण्यास आणि वार्धक्यातील विकारांवर नियंत्रण मिळवण्यास मोठी मदत होते.

वार्धक्यात फायदेशीर विशेष योगासने : चेअर योग (खुर्चीचा वापर):जर जमिनीवर बसणे किंवा ताळेबंद राखणे कठीण वाटत असेल, तर चेअर योग (खुर्चीवर बसून करावयाचे व्यायाम) सर्वोत्तम पर्याय आहे. ताडासन (पर्वतासन):पद्धत: सरळ उभे राहा, दोन्ही हात वर करून बोटांमध्ये बोटे अडकवून ताणा. पाठीचा कणा ताठ होतो. भद्रासन (बटरफ्लाय पोझ):पद्धत: जमिनीवर बसा, दोन्ही तळवे एकमेकांना जोडा आणि गुडघे वर-खाली हलवा. वक्रासन (अर्धे मत्स्येंद्रासन):पद्धत: पायांची हालचाल आणि पाठीला पीळ देऊन हे आसन बसून केले जाते. शवासन:पद्धत: पाठीवर झोपा, डोळे मिटून संपूर्ण शरीराला शिथिल सोडा.. प्राणायाम (श्वासोच्छवासाचो व्यायाम):अनुलोम-विलोम आणि भ्रामरी प्राणायाम योगासने करताना बाळगावी लागणारी खबरदारी कोणतेही योगासन करताना जबरदस्ती करू नका.सर्वसामान्य मूलभूत योगासनांची माहिती वाचून योग्य तंत्र समजून घ्या.व्यायामाची सुरुवात करण्यापूर्वी डॉक्टरांचा



सल्ला नक्की घ्या. अतिरेक टाळा: क्षमता नसतानाही कोणतेही आसन बळजबरीने करू नका. शरीराच्या क्षमतेनुसारच ताण द्या.आधार घ्या: समतोल राखणे कठीण वाटल्यास भिंतीचा किंवा खुर्चीचा आधार नक्की घ्या.श्वासोच्छवास सुरू ठेवा: कोणतीही पोझ करताना श्वास रोखून धरू नका.झटका देणे टाळा: योगासने करताना शरीराला हळूवारपणे ताणा, झटके देऊ नका.सुरुवातीला प्राणायाम ५ ते १० मिनिटेच करा.

योग वृद्धत्वाचे वय रोखू शकत नाही, पण ते आयुष्य निरामय, वेदनाविरहित आणि आनंदी नक्कीच बनवू शकते .योग वार्धक्याला केवळ शारीरिक व्याधींनी ग्रासलेला काळ न ठेवता, त्याला एक आध्यात्मिक आणि शांततापूर्ण प्रवासात रूपांतरित करतो. योग आपल्याला तणावमुक्त आणि निरोगी जीवन जगण्याची संधी देतो.

**डॉ विनोद पवार**
जिल्हा शल्य चिकित्सक
सा.रु.अमरावती

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सुटकेचा निःश्वास

**जी** शांतता आधी मोफत होती, ती स्वतःच्याच आगळिकीने बिघडवली आणि सरतेशेवटी त्याच शांततेसाठी मोठी किंमत चुकवली... इराण आणि अमेरिकेमध्ये झालेल्या ६० दिवसांच्या युद्ध विश्रांती करारात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही मिळवले असेल, तर ते हेच! इराणचा अणुकार्यक्रम थांबवण्याचा,त्यांच्याकडील युरेनियमचा साठा काढून घेण्याचा, इराणमधील धर्मांध-एकाधिकारी राजवट उलथवून जनताभिमुख सरकार आणण्याचा उद्देश ट्रम्प यांनी युद्धाच्या सुरुवातीला बोलून दाखवला होता. जगाचा काय, इस्त्रायलचाही त्यावर विश्वास नव्हता. अमेरिकेतल्या जनतेला तर यातला एकही उद्देश मान्य नव्हता. तरीही या सगळ्यांतून 'ग्रेट अमेरिका' हे आपले मूळ उद्दिष्ट साध्य होणार आहे,अमेरिकेतील जनतेला याचे खूप लाभ होणार आहेत, असे ट्रम्प सांगत राहिले. पहिला हल्ला केल्यानंतर इस्त्रायलच्या समर्थनार्थ युद्धात उतरताना ट्रम्प यांची भाषा अत्यंत गुर्मीची होती. तंत्रज्ञानाच्या अचूक कामगिरीने इराणचे सर्वोच्च नेते आणि लष्करातील वरिष्ठ अधिकारी अगदी सहज संपवल्याने इराण म्हणजे एका मुंगीपेक्षा अधिक नाही; आठवडाभरात इराण संपलेला असेल, अशीच ट्रम्प यांची भाषा होती. अमेरिका कशी वेगाने सरशी मिळवते आहे, हेही ते रेटून बोलत होते. पण, दोन महिने उलटून गेले, तरी इराण मागे हटेना, युरोपातील एकेक देश साथ सोडू लागले आणि इंधन टंचाईने भयभीत झालेले इतर देशही साफ दुर्लक्ष करू लागले, त्यांच्या वक्तव्यांना प्रतिसाद देईनासे झाले, तेव्हा ट्रम्प काहीसे ताळ्यावर आले. तीन महिने उलटल्यानंतर तर ते उघड उघड परतीचा मार्ग शोधू लागले! इराण, चीन आणि त्यांना पडद्याआडून समर्थन देणाऱ्या देशांनी ट्रम्प यांचा पाय बेचक्यात अडकल्याचे हेरले आणि आपली भूमिका अधिक ताठर केली. शेवटी ट्रम्प यांना पाकिस्तान आणि कतारसारख्या किरकोळ मध्यस्थांना पुढे करून इराणची समजूत काढावी लागली. त्यातून ६० दिवसांची युद्धविश्रांती विकत घ्यावी लागली!! युद्ध विश्रांतीच्या तयारीवर स्वाक्षरी झाल्यानंतर मूळ मसुद्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी ट्रम्प काहीतरी कुरापत काढतील, असा संशय होता. पण, ठरलेल्या वेळेपूर्वीच आपली स्वाक्षरी करणे, इराणच्या राष्ट्रप्रमुखांसमोर येणे टाळणे आणि जी ७ राष्ट्रांच्या बैठकीवेळी अन्य सर्व राष्ट्रप्रमुखांशी बरोबरीच्या नात्याने वागणे या सगळ्यांतून ट्रम्प यांची कढी किती पातळ झाली आहे,तेच समोर आले. जगासाठी; विशेषतः अमेरिकेसाठी हीच या युद्धाची सगळ्यात मोठी कमाई आहे. युद्धविश्रांतीच्या करारातील १४ कलमांपैकी एकही कलम अमेरिकेच्या वर्चस्वाची, इराण नरमल्याची साक्ष देणारे नाही. उलट, विश्रांतीच्या तीनही प्रस्तावांदरम्यान इराणने आपल्या मागण्या कायम ठेवल्या आणि त्या पुरेपूर पदरात पाडून घेतल्याचे दिसते आहे. १०७ दिवसांच्या युद्धकाळात इराणच्या झालेल्या स्थावर आणि लष्करी नुकसानीबद्दल अमेरिकेने इराणला ३०० अब्ज डॉलर नुकसान भरपाई द्यावी, ही मागणी ट्रम्प अगदी पहिल्या सह्या झाल्यानंतरही व्यानंतरही उडवून लावत होते. पण, प्रत्यक्ष १४ कलमांत या कलमाचा समावेश आहे. अमेरिकेने इराणमध्ये ३०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याचे केवळ ६० दिवसांच्या युद्धविश्रांतीसाठी मान्य केले गेले आहे! या गुंतवणुकीतून उभ्या राहणाऱ्या बऱ्याच प्रकल्पांची कंत्राटे पुन्हा ट्रम्प यांच्याच कंपन्या घेतील, अशी टिप्पणी सध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर केली जाते आहे. ते खरंच साधायचे असेल, तर ट्रम्प यांना अंतिम करारात इराणला आणखी मोकळी द्यावी लागेल. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि व्यापारी ट्रम्प यांच्यात कोण भारी पडते, ते तेव्हा आपल्याला कळेल. बॅलेस्टिक क्षेपणास्त्र हा इराण आणि अमेरिकेतील वादाचा मुद्दा होता. या क्षेपणास्त्रांची निर्मिती इराणने थांबवावी, असा ट्रम्प यांचा आग्रह होता. पण, परवा बोलताना ही क्षेपणास्त्र इराणसाठी कशी आवश्यक आहेत, हे ट्रम्पच सांगत होते. बराक ओबामा यांनी २०१५ मध्ये केलेल्या करारापेक्षा या करारात काहीही 'ग्रेट' नाही. हे युद्ध सुरू होण्यापूर्वी, २०१५ च्या कराराच्या नूतनीकरणासाठी जी बोलणी सुरू होती, त्यात इराणने आपला युरेनियमचा ८० टक्के साठा देशाबाहेर काढून तटस्थ देशात ठेवण्याचे कबूल केले होते. इराण आपला अणुकार्यक्रम पूर्णपणे गुंडाळायला तयार नाही, शेजारी आखाती देशांची सुरक्षितता त्यामुळे धोक्यात आहे, या कारणांसाठी तर बोलणी बाजूला सारून ट्रम्प यांनी युद्ध छेडले होते. जे त्या बोलण्यांमध्ये मान्य होत होते, ते मान्य करायलाही आता इराण तयार नाही. मग ट्रम्प यांनी कमावले काय? या प्रश्नाचे उत्तर दिसते ते असे:आर्थिक अडचणीत असलेल्या अमेरिकेचा खोलात जाणारा पाय त्यांनी सावरला. अमेरिकेतल्या मध्यावधी निवडणुकीत मोठा फटका बसू नये, म्हणून ६० दिवसांचा 'टाईम प्लीज' मिळवला. चर्चेचा घोळ सुरू ठेवून त्यादरम्यान पुन्हा उलटसुलट वक्तव्य करायची आणि अमेरिकेतल्या मतदाराला तोंड दाखवायला जागा ठेवायची, एवढाच या सगळ्याचा हेतू आहे.भारताला मात्र या कराराचा चांगला फायदा आहे. होर्मुझची सामुद्रधुनी ६० दिवस पूर्ण खुली राहणार असल्याने भारताचा इंधन पुरवठा, विविध उद्योगांसाठी प्राणवायू असलेला नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत होणार आहे. रसातळाला गेलेला इंधनसाठा पुन्हा पूर्ववत करण्याची भारताला संधी आहे. कच्च्या तेलाची किंमत बॅरलला ७८ डॉलरपर्यंत खाली आली असल्याने परकीय गंगाजळीवरील ताण कमी होणार आहे. अमेरिकेने इराणच्या तेल विक्री तसेच अन्य निर्यातीवरील निर्बंध उठवले असल्याने इराणमधून तेल खरेदी करणे भारताला अंतर आणि रुपयांतील विनिमयाच्यादृष्टीने अनुकूल ठरणार आहे. मध्य आशियातील देशांशी असलेला व्यवहार सुरळीत होणार आहे.अमेरिकेतल्या जनतेनेही अर्थातच सुटकेचा निःश्वास टाकला आहे. कारण,अमेरिकेच्या इज्जतीचा असा पंचनामा यापूर्वी कधीच झाला नव्हता.

# 'ऐसा' बी.टी.देशमुख होणे नाही...



**स**काळी उठल्याबरोबर पहिली बातमी वाचायला मिळाली ती बी.टी.देशमुख यांच्या निधनाची;अतिशय क्लेश झाला.बी.टी.देशमुख ओळखले जात ते 'बीटी' अशा सुटसुटीत नावाने.त्या संबोधनात जिव्हाळा आणि आदरही होता.बीटी यांच्या निधनाने एका सालस आणि सच्छील लोकप्रतिनिधीचे पर्व संपले असे म्हणावे लागेल .

बीटी देशमुख कोण होते?एक तळमळीचे शिक्षक,वाचक,आमदार,वक्ते, विदर्भाच्या विकासाची तळमळ असणारे नेते होते आणि विदर्भाच्या विकासाचा विकासाचा अनुशेष दूर व्हावा म्हणून संसदीय आणि न्यायालयीन लढाई लढणारे योद्धे होते. पण, हे सगळे जितके महत्त्वाचे आहे त्यापेक्षा महत्त्वाचे आहे ते, बीटी देशमुख हे व्यक्तिमत्व अतिशय सालस आणि सरळ होते. बीटी देशमुख यांच्या या सच्छीलपणाचा प्रभाव किती मोठा होता याचा एक प्रसंग.

बी.टी.देशमुख प्रदीर्घकाळ अमरावती पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर निवडून येत.या शतकाच्या सुरुवातीच्या दशकात एका निवडणुकीत त्यांचा अनपेक्षित पराभव झाला.तो उमेदवार धनवान होता आणि केवळ धनवानच होता, हीच त्याची बी.टी.देशमुख यांच्या विरोधात निवडून येण्याची पात्रता होती.निवडणुकीचा निकाल लागल्यावर 'लोकसत्ता'चे तत्कालीन संपादक कुमार केतकर यांना मी फोन केला (तेव्हा 'लोकसत्ता'च्या नागपुरातून प्रकाशित होणाऱ्या विदर्भ आवृत्तीचा मी संपादक होतो.)आणि बीटी देशमुख हरले ही बातमी दिली.बीटी देशमुख निवडणुकीत पराभूत होऊ शकतात हीच मोठी बातमी होती.

केतकर म्हणाले 'तू आता बीटी यांच्यावरच व्यक्तिवेध लिही.कारण हा पराभव बी टी देशमुखांचे शिक्षण आणि समाजकारणातले महत्त्व कमी करु शकत नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती असणारी साधेपणाची झळाळी कमी करु शकत नाही. बीटी देशमुख यांचे मोठेपण यातच आहे की निवडणूक हरल्यावरही त्यांच्यावर लोकसत्तामध्ये गुणगौरव पर मजकूर आला.

बी.टी.देशमुख एका शेतकऱ्याच्या घरात जन्माला आले.नंतर शिक्षक झाले आणि जनतेचे प्रश्न सुटावेत या ओढीने पुढे संसदीय राजकारणात आले. आयुष्यभर ते कुठल्याच पक्षाशी थेट संबंधित नव्हते पण,सर्वच पक्षात त्यांच्याविषयी मोठा सहज आदरभाव होता.त्यांची नाळ मानवी संवेदनांशी घट्ट जुळलेली होती. अमरावती शहराच्या सामाजिक प्रश्नांच्या भोवती त्यांचा जीव घुटमळत होता आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे विकासाच्या बाबतीत विदर्भ जो मागे पडला त्याबद्दल त्यांच्या मनात अत्यंतिक सल होती.पदवीधर आणि शिक्षकांचे प्रश्न बी.टी.देशमुख यांनी विधानपरिषदेत ज्या हिरीरीने मांडले तितक्याच आक्रमकपणे त्यांनी विदर्भाच्या विकासाच्या अनुशेषाचा लढा लढला.बी.टी.देशमुख आणि नितीन गडकरी या जोडीने त्यासाठी विधिमंडळ आणि न्यायालय अशा दोन्ही पातळ्यांवर अतिशय अभ्यासूपणे आवाज उठवला.अखेर या प्रश्नावर राज्यपालांना हस्तक्षेप करावा लागला आणि विदर्भाच्या विकासाच्या अनुशेषाच्या प्रश्नात लक्ष घालावे लागले. बीटी देशमुख आणि नितीन गडकरी यांचा हा लढा विदर्भाच्या विकासाच्या अनुशेषाच्या लढाईत सुवर्ण अक्षरानं नोंदवावा लागेल.महत्त्वाचे म्हणजे या लढ्याला यश आल्यानंतर श्रेयापासून दूर राहण्याची जी वृत्ती या दोघांनीही दाखवली, त्याचीही विद्यमान राजकारणी आणि पत्रकारांनी न विसरता नोंद घ्यायलाच हवी .

बीटी वृत्तीने अतिशय साधे होते जवळजवळ सहा फुटाची उंची,शिडशिडीत बांधा,रापलेला वर्ण,पायजमा व कुर्ता किंवा सदरा आणि पायात चपला असा एकूण बीटी यांचा अवतार होता.अभ्यासू वृत्ती आणि अन्यायाविरुद्ध कणखरपणे आवाज उठवण्याची त्यांची वृत्ती होती. ते मुंबई किंवा नागपूरला कामासाठी म्हणा की विधिमंडळाच्या अधिवेशनासाठी,रेल्वे किंवा बसने प्रवास करत.नागपूरला आमदार निवासात राहणारे आणि एस.टी. बसने प्रवास करणारे गणपतराव देशमुख यांच्यासारखे जे काही मोजके दोन-चार विधिमंडळ सदस्य होते त्यात बी.टी.देशमुख यांचा अग्रक्रमाने समावेश करावा लागेल.आमदार निवास ते विधिमंडळ हा नागपुरातला प्रवास ते एसटीच्या बसने किंवा चक्क पायी करत असत.मुंबईतही आमदार निवासातून विधिमंडळात जाताना पाऊस असो की ऊन्हं,बी.टी.देशमुख यांनी कधी टॅक्सी केली नाही. ताडताड पावल टाकत बीटी विधिमंडळाकडे जात, सभागृहात प्रवेश करत आणि कामकाजात मोठ्या तडफेने भाग घेत .




रेल्वे स्टेशनवर किंवा बसस्थानकावर वाहनाची प्रतीक्षा करताना ते बाकावर वाचत बसलेले अनेकदा दिसत.आपण आमदार आहोत म्हणजे कोणी विशेष आहोत असा कोणताही डामडौल त्यांच्या वागण्यात कधीच दिसला नाही. त्यांच्या पोतडीत ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही जनजीवनातील असंख्य हकीकती आणि आठवणी होत्या.त्या आठवणी कुणा धनवान कुटुंबाशी निगडित असलेल्या कधीच नव्हत्या तर शेतीत राबणाऱ्या बळीराजाच्या आणि सामान्य माणसाच्या होत्या.हा बळीराजा आणि हा सामान्य माणूस हाच बी.टी.देशमुख यांच्या आस्थेचा आणि कामाचाही कायम केंद्रबिंदू राहिला.त्यामुळे बीटी यांना भेटले की हिरव्यागार सावलीत वसलेले एखादे गाव भेटल्यासारखे वाटायचे आणि त्या गावचेच एक रहिवासी बी.टी.देशमुख आहेत, असे जाणवायचे.

बी.टी.देशमुख तब्बल अडीच दशक विधिमंडळाच्या राजकारणात होते पण,पक्षीय राजकारणाचा शिंतोडा त्यांनी त्यांच्या अंगावर चुकूनही उडू दिला दिला नाही आणि कुणाही भ्रष्ट मंत्री नेत्याशी त्यांची कधी जवळीक घडली नाही. साधारण २००० आधीच्या राजकारणात जाणकार, समंजस अभ्यासू आणि पाय जमिनीवर घट्ट रोवलेल्या लोकप्रतिनिधींचे बहुमत होते.त्यांची संख्या नंतर हळूहळू कमी होत गेली.विधिमंडळ आणि संसदीय राजकारणात धनवानांची चलती सुरु झाली आणि बी.टी.देशमुख यांच्यासारखे सच्छील राजकारणी मागे पडले. निवडणुकीच्या राजकारणात जनतेशी असणाऱ्या बांधिलकीपेक्षा पैसा महत्त्वाचा झाला.कम व्हॉट मे,कोणत्याही प्रकारे निवडणूक जिंकलीच पाहिजे,ही ईर्षा निर्माण झाली आणि बी.टी.देशमुख यांच्यासारखे राजकारणी अपवाद म्हणून उरले. म्हणूनच बी.टी.देशमुख यांचा पराभव झाला तरी माध्यमात ते गौरवपर लेखाचे मानकरी ठरले, हेच त्यांचे सगळ्यात मोठे योगदान आहे.असे लोकप्रतिनिधी आता केवळ आठवणींच्या प्रदेशातच उरलेले आहे.धनाच्या प्रवाहात वाहून जाणाऱ्या विद्यमान राजकारणात बीटी देशमुख यांच्यासारख्या राजकारण्यांना मुळीच आता स्थान उरलेले नाही.देशमुख यांची जागा विदर्भातला अन्य कोणताही नेता आता कोणत्याही प्रकारे घेऊ शकणार नाही हे निश्चित.

**प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी-९८२२०५५७९९
praveen.bardapurkar@gmail.com

# विदर्भ विकासाचा ज्ञानसूर्य अस्तंगत

**रा**ज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक, अभ्यासू आमदार, शिक्षकांचे कैवारी आणि तहानलेल्या विदर्भाला समृद्ध व जलसंपन्न करणारे भगीरथ, प्रा.बी. टी. देशमुख यांचे १९जूनच्या सायंकाळी अखेर निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील संपूर्ण शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्र ढवळून निघाले आहे.

बेलोरासारख्या ग्रामीण भागातून अमरावतीच्या शैक्षणिक भूमीत येऊन त्यांनी आपल्या ज्ञानाची व कर्तुत्वाची बीजे रोवली.'दैनिक हिंदुस्तान' हे त्यांच्या सुरुवातीच्या कारकीर्दीचे कार्यक्षेत्र होते.पत्रमहर्षी बाळासाहेब मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली ते पत्रकारिकेत घडलेत . हिंदुस्तान कार्यालयाला आपले मानून तेथे त्यांनी पडेल ते काम स्वीकारले आणि आपली कार्यक्षमता सिद्ध केली. म्हणूनच बाळासाहेब मराठे त्यांना आपला ज्येष्ठ पुत्र मानू लागले होते.

कठोर परिश्रम करून व स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देत ते शासकीय विदर्भ महाविद्यालयात कला शाखेत दाखल झाले. तेथे त्यांनी विद्यार्थी नेतृत्वाला सुरुवात केली आणि अल्पावधीतच ते विद्यार्थ्यांचे लाडके नेते झाले. छात्रसंघाच्या निवडणुकांमध्ये, महाविद्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा मिळवून देण्यासाठी ते सातत्याने लढत राहिले. विद्यार्थी त्यांना 'बीटी भाऊ' म्हणू लागले आणि पुढे ते सर्वांचेच लाडके 'बीटी भाऊ' झाले. विदर्भ महाविद्यालयात त्यांच्याच प्रयत्नाने अनेक पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले, प्रामुख्याने इंग्रजी विषयातील स्नातकोत्तर अभ्यासक्रम त्यांच्याच प्रयत्नाची फलश्रुती होय. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना अमूल्य लाभ झाला. १९७३ मध्ये संपन्न झालेल्या शासकीय विदर्भ महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी भाऊंनी महाविद्यालयासाठी आवश्यक असलेल्या अनेक सुविधांची मागणी राजकीय नेत्यांसमोर जोमाने रेटली आणि त्याचा सातत्याने पाठपुरावा केला. मुलींसाठीचे अतिरिक्त वसतिगृह हे त्यांच्याच अथक प्रयत्नांचे फळ होय.

शासकीय विदर्भ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रा.प.सि. काणे हे त्यांच्या गुरुस्थानी होते. प्राचार्यांच्या बंगल्यावर बीटी भाऊ आणि प्रा.काणे सर सायंकाळच्या वेळी अनेकदा चर्चा करताना मी पाहिले आहे.गुरू आणि शिष्याचा असा अनोखा अनुबंध त्यावेळी मी स्वतः अनुभवला. शिस्त आणि वक्तशीरपणा बिटी भाऊंच्याठायी ठायी दिसून येत होता अमरावतीच्या श्री शिवाजी श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात प्राध्यापक असताना ते अगदी वेळेवर वर्गात प्रवेश करत आणि अध्यापनाच्या वेळी सलग दोन तास जरी अध्यापन करत राहिले तरी सुद्धा वेळ कळत नव्हता. त्यांच्या वक्तशीरपणावर अनेक लोक आपल्या मनगटी घड्याळात वेड लावत असत अशीही त्यांच्या बाबतची ख्याती आहे.

अमरावती शहराच्या पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची समस्या बीटी भाऊंना नेहमी भेडसावत असे.'दैनिक हिंदुस्तान'मधून ते या समस्यांवर सातत्याने लिखाण करत असत. अखेरीस शासकीय विदर्भ महाविद्यालयाच्या परिसरातच पाणीपुरवठा विभागाला आवश्यक असलेली जागा देऊन, तत्कालीन गव्हर्नर सुब्रमण्यम यांच्या उपस्थितीत पाणीपुरवठा विभागाचे दिमाखात उद्घाटन झाले आणि त्याच ठिकाणी एक महाकाय पाण्याची टाकी बांधण्यात आली. अप्पर वर्धा धरणाचे पाणी आज अमरावतीकरांना अखंड लाभ देत आहे, यात भाऊंचा मोठा वाटा आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची मागणी शासन दरबारी सातत्याने लावण्यात बीटी भाऊंचा सिंहाचा वाटा होता.त्याचीच फलश्रुती म्हणून अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली आणि बुलढाणा, अकोला, यवतमाळ व वाशीमसारख्या दुर्गम जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना नागपूरसाठी करावी लागणारी पायपीट थांबली.

राज्यशास्त्र विषयावर त्यांनी अनेक क्रमिक पुस्तके लिहिली. ही ग्रंथसंपदा सुबोध व सर्वसामान्य विद्यार्थ्यांनाही सहज समजण्यासारखी आहे. विद्यापीठ अंतर्गत त्यांनी वेळोवेळी अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. विदर्भाच्या आणि अमरावती विद्यापीठाच्या विकासासाठी ते अहोरात्र झटले. त्यांच्या या प्रयत्नांची फळे आज सर्व स्तरातील विद्यार्थी आणि शिक्षक चाखत आहेत.

बीटी भाऊ सलग ३० वर्षे शिक्षक आमदार राहिले. या प्रदीर्घ कालावधीत त्यांनी अहोरात्र शिक्षकांच्या कल्याणाचा ध्यास घेतला. १९७६ मध्ये त्यांनी 'नुटा'या संघटनेचा श्रीगणेशा केला आणि त्या माध्यमातून प्राध्यापकांच्या पूर्वापार चालत आलेल्या अनेक समस्यांचा निपटारा केला.त्यांनी प्राध्यापकांना समाजामध्ये सर्वोच्च स्थान मिळवून दिले. आज वेतनमानाचा विचार केल्यास, जिल्हाधिकाऱ्यांपेक्षाही अधिक वेतन अनेक प्राध्यापक घेत आहेत, याचे सर्वस्वी श्रेय बीटी भाऊंनाच जाते.



२१ जून रोजी 'नुटा' संघटनेचा सुवर्णमहोत्सव सोहळा आयोजित केला आहे. मात्र, या सोहळ्याच्या पूर्वसंध्येलाच बीटी भाऊंनी स्वर्गारोहण केले, याचे निश्चितच मनाला वाईट वाटते. परंतु, त्यांनी संघर्षाची जी ज्योत पेटवून ठेवली आहे, तिचा उजेड कधीही मंदावणार नाही, असा पूर्ण विश्वास वाटतो.शेवटी मी एवढेच म्हणेन–

'उजाले आपके यादों के हमारे साथ रहने दो,न जाने जिंदगी की कब शाम हो जाये...'

**प्रा. डॉ. राजेंद्र भुयार**

फ्रेंड्स कॉलनी,विमवी रोड, अमरावती
मो-९५०३०४६५५५

# ज्ञानयोग्याचा अस्त

**मा**जी आमदार प्रा.बी.टी. देशमुख यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय,शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील एक तेजस्वी सूर्य अस्ताला गेला आहे.विशेषतः विदर्भाच्या जनजीवनात त्यांनी निर्माण केलेली बौद्धिक, नैतिक आणि सामाजिक उंची आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या जाण्याने हजारो अनुयायांना आपल्या जीवनातील एक दीपस्तंभ हरवल्याची वेदना होत आहे.

प्रा.बी.टी. देशमुख हे खऱ्या अर्थाने एक विराट ज्ञानयोगी होते.भारतातील थोर विद्वान, अभ्यासू राजकारणी डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'डॉ. श्रीकांत जिचकार स्मृती ज्ञानयोगी पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात आला, तेव्हा त्या पुरस्कारालाच अधिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. डॉ. जिचकार यांनाही आपल्या प्रेरणास्थान असलेल्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव होताना निश्चितच अभिमान वाटला असता.

विद्यार्थी दशेतील प्रखर बुद्धिमत्ता, शिक्षक म्हणून आदर्श कार्य, संघटक म्हणून दूरदृष्टी आणि विधिमंडळातील अभ्यासपूर्ण, प्रभावी वक्तृत्व या सर्व गुणांचा अद्वितीय संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. त्यांची भाषणे प्रेरणादायी होती, त्यांच्या चर्चा ज्ञानवर्धक होत्या आणि त्यांच्या नेतृत्वाने अनेक संस्थांना नवी दिशा दिली. मात्र त्यांच्या यशापेक्षाही त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक महान होते. शिस्त, साधेपणा,विनम्रता, नैतिक धैर्य आणि नितांत प्रामाणिकपणा या मूल्यांचे ते मूर्तिमंत प्रतीक होते. सार्वजनिक तसेच वैयक्तिक जीवनात त्यांनी नेहमीच तत्त्वनिष्ठ, संवेदनशील आणि जमिनीशी नाळ जोडलेली भूमिका घेतली.

महाराष्ट्र विधान परिषदेतील त्यांचे योगदान हे स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरावे इतके महत्त्वपूर्ण आहे. तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी विधिमंडळातील चर्चांना बौद्धिक धार, नैतिक दिशा आणि अभ्यासपूर्ण परिप्रेक्ष्य दिला. त्यांची प्रत्येक भूमिका सखोल अध्ययन, चिकित्सक दृष्टी आणि सामाजिक न्यायाच्या बांधिलकीतून साकारलेली असे.त्यांच्या पारदर्शक प्रामाणिकतेमुळे आणि तडजोड न करणाऱ्या चारित्र्यामुळे त्यांना सर्वपक्षीय आदर प्राप्त झाला. ते खरे कर्मयोगी होते. पुरस्कार, सन्मान किंवा प्रसिद्धी यांचा त्यांनी कधीही पाठपुरावा केला नाही; परंतु समाजहितासाठीच्या त्यांच्या अथक कार्यामुळे सन्मान स्वतःहून त्यांच्या पायाशी आले.

अमरावती जिल्ह्यातील बेलोरा या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या थोर व्यक्तिमत्त्वाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वतःला घडविले. तत्कालीन किंग एडवर्ड महाविद्यालयातील शिक्षणकाळातच त्यांचे नेतृत्वगुण दिसून आले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीसारख्या ऐतिहासिक आंदोलनांत ते सक्रिय राहिले.श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथे राज्यशास्त्र विषयाचे शिक्षक म्हणून कार्य केले. शिक्षकांवर अन्याय होत असताना त्यांनी नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेच्या माध्यमातून ऐतिहासिक लढे उभारले आणि शिक्षकांच्या सन्मान, हक्क व प्रतिष्ठेला नवी उंची मिळवून दिली.

अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघातून पाच वेळा निवडून येत त्यांनी निवडणूक नीतिमत्ता आणि लोकप्रतिनिधित्वाचे नवे आदर्श निर्माण केले. सत्ताधाऱ्यांच्या दबावाला किंवा प्रलोभनांना बळी न पडता त्यांनी न्यायासाठी सातत्याने संघर्ष केला.महात्मा गांधी, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कृषीमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा त्यांच्यावर खोल प्रभाव होता. सत्य, स्वातंत्र्य आणि नैतिक जबाबदारी या मूल्यांपासून ते कधीही विचलित झाले नाहीत.

विदर्भातील पाणीटंचाई, प्रादेशिक असमतोल आणि वंचितांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला. 'पदवीधरांनाही स्वच्छ पिण्याच्या पाण्याची गरज असते' या त्यांच्या विधानातून त्यांच्या व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनाची प्रचिती येते. 'विदर्भ विकास प्रबोधिनी'सारख्या उपक्रमांतून त्यांनी समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी कार्य केले. त्यांच्या बौद्धिक सामर्थ्यामुळे आणि नैतिक नेतृत्वामुळे स्व. जयंतराव टिळक, मा. शरदचंद्र पवार, मा. नितीन गडकरी, स्व. डॉ. डी. आर. शेखावत, स्व. आर. एस. गवई, स्व. अण्णासाहेब वैद्य, स्व. बाळासाहेब कुळकर्णी, स्व. प्रा. राम मेघे, यांसारख्या विविध विचारसरणीच्या नेत्यांचाही त्यांना सन्मान आणि पाठिंबा लाभला.

२१ जून २०२६ रोजी आपण नुटा बुलेटिनच्या सुवर्णमहोत्सवाचे औचित्य साधून केवळ एका प्रकाशनाचा गौरव होणार होता, परंतु ते काळाच्या पडद्याआड गेले; नुटा बुलेटिन विचार, संघर्ष, सामाजिक बांधिलकी आणि प्रबोधन यांचा पन्नास वर्षांचा वारसा घडविणाऱ्या या दूरदर्शी व्यक्तिमत्त्वाचा गौरव करणार होते. परंतु नियतीने हा क्षण त्यांच्या अनुपस्थितीत अनुभवण्याची वेळ आपल्यावर आणली आहे. बी.टी.देशमुख सरांचे संपूर्ण जीवन पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहील. ज्ञान, विवेक,नैतिकता आणि धैर्य यांच्या साहाय्याने समाजपरिवर्तन घडवून आणता येते, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले.त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे अशक्य आहे.

परमेश्वर त्यांच्या दुःखी कुटुंबीयांना, हजारो अनुयायांना, हितचिंतकांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो आणि या महान, थोर, ज्ञानयोगी व्यक्तिमत्त्वास चिरशांती लाभो, हीच भावपूर्ण प्रार्थना.

**प्रा.डॉ. प्रशांत विघे**
भारतीय महाविद्यालय,अमरावती
मो.९३२६८७७७४९

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# अमरावती विभागावर जलसंकटाचे सावट
# मोठ्या प्रकल्पांमध्ये केवळ ३५ टक्के पाणीसाठा

**अमरावती/का.प्र.**

अमरावती विभागातील सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आगामी काळात तीव्र होण्याची चिन्हे आहेत. जलसंपदा विभागाने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, विभागातील ९ प्रमुख मोठ्या प्रकल्पांमध्ये सध्या केवळ ३५.२१ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. २८८ विभागातील एकूण प्रकल्पांमधील सरासरी जलसाठा ३०.६३ टक्क्यांवर घसरला आहे. जून महिना निम्मा सरला तरी दमदार पावसाने दडी मारल्यामुळे अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशीम आणि बुलढाणा जिल्ह्यांवर जलसंकटाचे सावट गडद झाले आहे.विभागातील ९ मोठ्या प्रकल्पांची एकूण उपयुक्त पाणीसाठा क्षमता १३९९.९२ दशलक्ष घनमीटर (दलघमी) आहे, ज्यामध्ये सध्या ४९२.९४ दलघमी (३५.२१ टक्के) साठा



उपलब्ध आहे. अमरावती जिल्ह्यातील अप्पर वर्धा प्रकल्पात २४६.५५ दलघमी म्हणजेच ४३.७१ टक्के साठा असून तो मागील वर्षाच्या (४३.४० टक्के) तुलनेत किंचित जास्त आहे. वान (अकोला) या प्रकल्पात ४३.३७ टक्के साठा असून अकोला जिल्ह्याला यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. खडकपूर्णा (बुलढाणा) प्रकल्पाची स्थिती अत्यंत गंभीर आहे. जलाशयाची पातळी ५१५.०० मीटरवर पोहोचली असून उपयुक्त साठा शून्य झाला आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा या प्रकल्पाने तळ गाठला आहे. अरुणावती प्रकल्पात ३६.९९ टक्के, पेनटाकळी ३४.४८ टक्के, पुस प्रकल्प ३२.३९ टक्के, बेंबळा २९.१३ टक्के तर काटेपूर्णा प्रकल्पात केवळ २१.०१ टक्के साठा शिल्लक आहे. विभागातील २७ मध्यम प्रकल्पांचा विचार केल्यास, तिथेही स्थिती फारशी आशादायक नाही. मध्यम प्रकल्पांमध्ये सध्या ३४.८४ टक्के (२६८.८६ दलघमी) उपयुक्त पाणीसाठा आहे. अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागा प्रकल्पात सर्वाधिक ७६.२१ टक्के साठा आहे, तर गर्गा प्रकल्प पूर्णपणे कोरडा पडला आहे बुलढाण्यातील पलढग प्रकल्पात केवळ १.२० टक्के पाणी शिल्लक आहे. दुसरीकडे, विभागातील २५२ लघु प्रकल्पांमध्ये अवघा २०.२७टक्के साठा शिल्लक आहे.

# सोमवारी स्मार्ट मीटरविरोधात आंदोलन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून सुरू असलेल्या स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या मोहिमेविरोधात महाराष्ट्र राज्य किसान सभा आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष, चांदूर रेल्वे यांच्या वतीने सोमवार, दि. २२ जून रोजी दुपारी १ वाजता आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

आंदोलनाची सुरुवात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या चांदूर रेल्वे कार्यालयासमोर होणार असून त्यानंतर तहसील कार्यालयावर मोर्चा काढून तहसीलदारांना निवेदन देण्यात येणार आहे.

प्रसिद्धीपत्रकानुसार, राज्य सरकारच्या धोरणामुळे जुने वीज मीटर बदलून स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू असून, यामुळे ग्राहकांवर आर्थिक भार पडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ग्राहकांची



पूर्वपरवानगी न घेता स्मार्ट मीटर बसवू नयेत, स्मार्ट मीटर योजना रद्द करावी, महाराष्ट्रात २०० युनिटपर्यंत मोफत वीज द्यावी आणि शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. आंदोलनात सहभागी होणाऱ्या नागरिकांनी आपले वीज बिल सोबत आणावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. पक्ष कार्यालयात अर्ज भरून घेण्यात येणार असून त्यानंतर महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी दाखल केल्या जातील. यावेळी तहसीलदारांमार्फत राज्य सरकारकडे मागण्यांचे निवेदनही सादर करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# काळानुसार पालकांनीही बदल स्वीकारावा-डॉ.जयंत पांढरीकर
## 'तारुण्यावस्थेतील मुलांच्या पालकांना 'ज्येष्ठ किशोरवस्था तज्ज्ञांचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

आज वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात किशोरवस्थेतील मुले भरकटत जाण्याचे प्रमाण वाढत असल्याने त्यांच्या पालकांनी काळानुसार पालकत्वातही बदल स्वीकारावा असे आवाहन बालरोग व तरुण्यावस्था तज्ञ डॉ जयंत पांढरीकर सह सर्वच तज्ज्ञांनी पनवेल येथील पालकांच्या भरगच्च कार्यक्रमात केले. महाराष्ट्र राज्य किशोरवस्थातज्ञ संघटना व रायगड बालरोग तज्ञ संघटनेच्या वतीने पनवेल, मुंबई येथे वासुदेव बळवंत फडके सभागृहात' बदलत्या काळातील पालकत्व' ह्या विषयावर पलकांकरिता खुल्या चर्चासत्राचे आयोजन केले होते. चर्चासत्रात रायगडचे वरिष्ठ बालरोग तज्ञ डॉ शेखर दाभाडकर, नागपूरचे



डॉ निशिकांत कोतवाल, नगरचे डॉ सूचित तांबोळी, अमरावतीचे डॉ जयंत पांढरीकर, मुंबईच्य डॉ नीलिमा भांडारकर व चंद्रपूरचे डॉ राम भारत ह्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले तर कार्यक्रमाचे रंगतदार सूत्रसंचालन वैजापूर चे बालरोग तज्ञ, स्तंभलेखक डॉ अमोल अन्नदाते ह्यांनी केले.सुरवातीला कार्यक्रमाचे उद्घाटन संघटनेच्या अध्यक्षा डॉ चित्रा कुलकर्णी ह्यांनी तर प्रास्ताविक व स्वागत डॉ जय भांडारकर, डॉ खिल्लारे, डॉ विकास मोरे ह्यांनी केले.

काल पेक्षा आजच्या काळामध्ये किशोरसमोर निश्चितच जास्त आवाहने आहेत, संभ्रमाचे प्रमाण वाढत आहे तेव्हा पालकांनी हे समजावून घ्यायला हवे असे मत डॉ अमोल अन्नदाते ह्यांनी मांडले. अवास्तव अपेक्षांचे ओझे पालकांनी आपल्या किशोरांवर लादू नये असे मत डॉ शेखर दाभडकर ह्यांनी मांडले. एकत्र कुटुंब पद्धती कमी झाल्याने आणि दोघेही पालक नोकरी/ व्यवसायात व्यस्त असल्याने त्यांच्यावर पालकत्वाचा जास्त ताण पडतो आहे असे विचार डॉ निशिकांत कोतवाल ह्यांनी मांडले तर शक्य तेवढा हातभार आजी आजोबांनी लावावा असे ते म्हणाले. तरुण्यावस्थेत हार्मोन्स मुळे शारीरिक, मानसिक, वैचारिक, लैंगिक, भावनिक असे अनेक बदल एकाच वेळी घडत असतात त्यामुळे किशोरांच्या वागण्यातील बदल पालकांनी समजावून घ्यावा आणि मुलांशी सुसंवाद कधीही खंडित होणार नाही ह्याची काळजी प्रत्येक पालकांनी घ्यावी असे आवाहन डॉ जयंत पांढरीकर ह्यांनी केले. करीयर निवडतांना पाल्याच्या आवडीचा, क्षमतेचा, बुद्धिमत्तेचा विचार जरूर व्हावा असे विचार डॉ सूचित तांबोळी ह्यांनी मांडलेत. आज दिवसाला जवळपास ५ ते ७ तास पर्यंत मुलांचा स्क्'रीन टाईम' वाढला असल्याने चिडचिडपण, नैराश्य, एकाकीपणा, डिप्रेशन चे प्रमाण खूप वाढल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्याची मोठी जबाबदारी पालकांनी पार पाडण्याची गरज असल्याचे डॉ नीलिमा भांडारकर म्हणाल्या. गुणांक, बुध्यांक पेक्षा मुलाच्या 'भावनाक' अर्थात 'इमोशनल' कोशंत वर पालकांनी जास्त लक्ष केंद्रित करावे असे मत डॉ राम भारत ह्यांनी मांडले.

आजकाल किशोवयीनामधील व्यसनाधीनता हे एक मोठे चिंतेच कारण असल्याचे मत सर्वच तज्ज्ञांनी व्यक्त केले. किशोरच्य लैंगिकता, मानसिक आजार, हिंसाचार, आक्रमक वर्तन, सवांगड्यांचा दबाव, वर्तणूक समस्या, गुंडगिरी, सायबर बुळींग,स्थूलता इत्यादी अनेक विषयांवर पालकांनी विचारलेल्या प्रश्नांना सर्व तज्ज्ञांनी समर्पक उत्तरे दिलीत. काळानुसार पालकांनीही बदल स्वीकारवे आणि किशोरंना सर्व 'लाईफ स्किल्स' अगदी लहनपणापासूनच शिकावाव्या असे आवाहन डॉ अमोल अन्नदाते, डॉ जयंत पांढरीकर सह सर्वच तज्ज्ञांनी केले. लोकसंख्येच एकूण २२% असलेल्या किशोरांमध्ये अपघात, मानसिक आजार, आत्महत्या, लठ्ठपणा, वर्तणूक समस्या प्रामुख्याने वाढतांना आढळून येत आहेत तेव्हा पालकांनी गरज भासल्यास वेळीच समुपदेशकांच सल्ला घ्यावा असे आवाहन सर्व मार्गदर्शकांनी ह्यावेळी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांचे व पालकांचे मोलाचे योगदान लाभले.

# पावसाने दडी मारल्याने पेरण्या खोळंबल्या; शेतकरी चिंतेत

**कुऱ्हा/वार्ताहर**

जून महिना अर्ध्यावर आला असतानाही अपेक्षित पाऊस न झाल्याने जिल्ह्यातील खरीप हंगाम धोक्यात आला आहे. पावसाअभावी शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या असून बळीराजाच्या चिंतेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. दरवर्षी मृग नक्षत्राच्या आगमनानंतर पावसाची सुरुवात होत असल्याने शेतकरी पेरणीच्या तयारीला लागतात. मात्र यंदा आभाळात ढगांची वर्दळ दिसत असली तरी पाऊस हुलकावणी देत असल्याने शेतीचे संपूर्ण गणितच बिघडले आहे.

कुऱ्हा परिसरात शेतकऱ्यांची मशागतीची कामे पूर्ण केली आहेत. बियाणे, खते आणि इतर कृषी साहित्य खरेदी करून ठेवले आहे. काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेतीसाठी आवश्यक खर्चही केला आहे. मात्र पाऊस नसल्याने पेरणी सुरू करता येत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. पेरणीसाठी योग्य कालावधी हातातून निघून जात असल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागात सध्या सर्वत्र पावसाचीच चर्चा सुरू असून शेतकऱ्यांचे लक्ष आकाशाकडे लागले आहे. पाऊस वेळेत न झाल्यास सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद यांसारख्या खरीप पिकांच्या लागवडीवर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी वर्गात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे.दरम्यान, हवामान विभागाने आगामी काही दिवसांत पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली असली तरी प्रत्यक्षात दमदार पाऊस कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## माही जैस्वालचा आयआयटी इंदूरमध्ये प्रवेश

**अंजनगाव सुर्जी** - जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या



बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे माही मनोज जैस्वाल हिने शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिने इंदूरमध्ये प्रवेश मिळविला आहे. माहीने जेईई मेन परीक्षेत ९८.०३ पर्सेंटाईल, कॉमेडक परीक्षेत ९९.२२ पर्सेंटाईल तसेच एमएचटी-सीईटी परीक्षेत ९९.७८ पर्सेंटाईल गुण प्राप्त करून आपल्या असामान्य बुद्धिमत्तेची आणि अथक परिश्रमांची छाप उमटविली आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक व मार्गदर्शकांना दिले आहे. या यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहेत.

# जिल्ह्यात खाद्यतेल अभियानांतर्गत 'मिनी ऑईल मिल'साठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यामध्ये सन २०२६-२७ या वर्षात सोयाबीन पिकासाठी 'राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया योजना' राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत जिल्ह्यात 'मिनी ऑईल मिल (एक्सपेलर)' या घटकाचे लक्षांक प्राप्त झाले आहेत. पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा जास्तीत-जास्त प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेससह आणि मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेसशिवाय अशा दोन घटकांचा लाभ वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि मूल्य साखळी भागीदार गट यांना दिला जाणार आहे. कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या नियमांनुसारच लाभार्थ्यांची निवड केली जाईल आणि यासाठी महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांनी सादर केलेल्या अर्जांमधून प्राधान्याने या योजनेसाठी लाभार्थी निवडले जाणार आहेत. या अभियानांतर्गत आर्थिक मर्यादेचा तपशील पाहता, मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेससह या घटकासाठी ४ लाख रुपये प्रति युनिट खर्च मर्यादा असून, युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत, अथवा युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत अनुदान देय राहील; तर मिनी ऑईल मिल, एक्सपेलर फिल्टर प्रेसशिवाय या घटकासाठी ३ लाख रुपये प्रति युनिट खर्च मर्यादा असून, यामध्येही युनिटच्या किमतीच्या ५० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत, अथवा युनिटच्या किमतीच्या ४० टक्के किंवा निर्धारित उच्चतम मर्यादेत अनुदान उपलब्ध करून दिले जाईल.

पात्रतेच्या निकषानुसार जिल्ह्यातील इच्छुक वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या आणि मूल्य साखळी भागीदार गटांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत आणि या योजनेच्या अधिक माहितीसाठी व तांत्रिक तपशिलासाठी नागरिकांनी आपापल्या संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# पानटपऱ्यांचे शटर डाऊन; प्रशासनाच्या धडक कारवाईची धास्ती

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

पोलीस प्रशासन व अन्न व औषध प्रशासन (एफडीए) यांनी गुटखा, पानमसाला व तत्सम प्रतिबंधित पदार्थांच्या विक्रीविरोधात धडक तपासणी मोहीम सुरू केल्याने आसेगाव पूर्णा परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये धास्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाईच्या पार्श्वभूमीवर गावातील बहुतांश पानटपऱ्यांनी शटर डाऊन केले असून काही ठिकाणी दुकाने सुरू असली तरी गुटखा व पानमसाल्याची विक्री बंद करण्यात आली आहे. परिणामी, नेहमी गर्दीने गजबजलेला बसस्थानक परिसरही दिवसभर तुलनेने सुनसान दिसून आला.प्रशासनाच्या या मोहिमेचे सुज्ञ नागरिकांनी स्वागत केले असून, व्यसनाधीनतेला आळा बसण्यास मदत होईल तसेच युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती होण्यास हातभार लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाकडून पुढील काळातही अशीच तपासणी मोहीम सुरू राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



'राज्य शासन व अन्न व औषध प्रशासनाने गुटखा, पानमसाला आणि प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरोधात सुरू केलेल्या मोहिमेला पोलीस प्रशासनाचा पूर्ण पाठिंबा आहे. कायद्याने बंदी असलेल्या पदार्थांची विक्री, साठवणूक किंवा वाहतूक करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. व्यापाऱ्यांनी नियमांचे पालन करून बेकायदेशीर व्यवसाय टाळावा. तसेच नागरिकांनीही अशा प्रकारच्या विक्रीची माहिती पोलिसांना द्यावी. युवकांचे आरोग्य व समाजहित लक्षात घेता व्यसनमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.'

**सुरज तेलगोटे,** ठाणेदार

## 'नशा मुक्त भारत अभियान' सामाजिक सप्ताहाचे उद्घाटन

**अमरावती/का.प्र.**

सामाजिक न्याय आणि अधिकारिता विभागांतर्गत २६ जून या 'आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधी दिवसा'चे औचित्य साधून जिल्ह्यात २६ जून पर्यंत 'सामाजिक सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात या सप्ताहांतर्गत 'नशा मुक्त भारत अभियान विकसित भारत की पहचान' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे उद्घाटन समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.

याप्रसंगी समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर, वित्त व लेखा विभागाचे सहायक संचालक मेतकर तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी, महामंडळांचे कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांनी नशा मुक्तीचे संकल्प पत्र व शपथ घेतली, तसेच निर्धारित संकेतस्थळावर ऑनलाईन शपथही नोंदवण्यात आली. या पार्श्वभूमीवर निवासी शाळांचे मुख्याध्यापक व शासकीय वसतिगृह अधीक्षक यांनी विविध उपक्रम राबवण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, शासकीय अनुदानित वसतिगृहे, व्यसनमुक्ती केंद्रे आणि सर्वसामान्य नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार हेमंत निखाडे यांना जाहीर



**अमरावती-** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने देण्यात येणारे विविध पुरस्कार शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात आले.त्यामध्ये पत्रकारिता गटातून वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार तिवसा तालुक्यातील पत्रकार हेमंत निखाडे यांना जाहीर झाला असून अमरावती जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्या आहे.गेल्या २१ वर्षांपासून तिवसा तालुक्यात कृषी पत्रकारिता करीत असलेल्या हेमंत निखाडे यांच्या कृषी क्षेत्रातील कार्याची प्रशासनाने दखल घेत त्यांना हा अतिशय प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर केला आहे.शेतकऱ्यांप्रति तळमळ ठेवून सकारात्मक वृत्त,प्रेरणादायी यशकथा,शेतीच्या बांधावर जाऊन नाविन्यपूर्ण शेतीच्या स्टोरी,शेतकऱ्यांच्या समस्या,अडचणी आदी कार्य त्यांनी आजवरच्या पत्रकारितेतुन केले आहे.या सर्वांगीण कार्याची दखल घेऊन शासनाने हेमंत निखाडे यांना वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार जाहीर केला आहे. हा पुरस्कार जाहीर होताच सर्वच क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून लवकरच मुंबई येथे त्यांना हा पुरस्कार सपत्नीक प्रदान करण्यात येणार आहे.



### रा.से.यो विभागामार्फत वृक्षारोपण

कुऱ्हा-महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन, हरित परिसर निर्मिती व विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, प्राध्यापक, कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वृक्षांचे संवर्धन व संगोपन करण्याची शपथही यावेळी घेण्यात आली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची भावना दृढ झाली असून हरित व स्वच्छ परिसर निर्मितीसाठी सकारात्मक संदेश देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कौतुक केले.

### बी.एस्सी (होम सायन्स) सेमि-३च्या ह्युमन डेव्हलपमेंटची पूनर्परीक्षा ३० जूनला

**अमरावती-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची उन्हाळी-२०२६ बी.एस्सी (होम सायन्स) सेमिस्टर-३ अभ्यासक्रमाच्या २३३एचडी१७ ह्युमन डेव्हलपमेंट विषयाची पूनर्परीक्षा दि. ३० जून, २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद (केंद्र क्र. ४०४) या परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात आले आहे. यासंदर्भात श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद येथील प्राचार्य तसेच फुलसिंग नाईक महाविद्यालय,पुसदचे केंद्राधिकारी यांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून, फेरपरीक्षेबाबतची तारीख व वेळ विद्यार्थ्यांना कळविण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहील. त्यामुळे सर्वसंबंधितांनी त्यांच्या विभागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर जाणीव करुन द्यावी. काही अडचण असल्यास परीक्षा अधिका-यांशी विद्यापीठ संकेतस्थळावर दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे.




### रविकांत तुपकर यांच्या आंदोलनाला पाठिंबा

**आसेगाव पूर्णा -** शेतकरी कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी आंदोलन करणारे शेतकरी नेते रविकांत तुपकर यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे बुलढाणा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी आसेगाव येथील माजी उपसरपंच विनोद कोळसकर, माजी सरपंच अमोल वाटणे, प्रशांत नागापुरे, भैय्यासाहेब मानकर व योगेश शिरभाते यांनी १९ जून रोजी जिल्हा रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली व आंदोलनाला आपला पाठिंबा जाहीर केला.


### मंगळवारी आनंद महाजन आकाशवाणीवर

**अमरावती-** आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने मंगळवारी



(दि. २३)'निरामय आरोग्यासाठी योग' या विषयावर योगप्रशिक्षक आनंद महाजन यांची मुलाखत आकाशवाणीच्या अमरावती केंद्रावरून प्रसारित केली जाणार आहे. नितीन भट यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे. 'नमस्कार अमरावती' या कार्यक्रमात ही मुलाखत प्रसारित केली जाईल. कार्यक्रमाची निर्मिती आकाशवाणी अमरावती केंद्राची असून सादरकर्ते भैय्यालाल टेकाम आहेत. मार्गदर्शकाची आवश्यकता, आहारावरील बंधने आदी मुद्द्यांवर आनंद महाजन हे आपल्या मुलाखतीत भाष्य करतील.

### प्रकाश पन्नाशे यांचे निधन



**तळेगाव ठाकूर-** येथील प्रकाश किसनराव पन्नाशे (वय ५५ वर्षे) यांचे दि. २० जून २०२६ रोजी पहाटे ४:०० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या निधनाने पन्नाशे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, विवाहित मुली, नातवंडे तसेच मोठा आप्तपरिवार असा परिवार आहे.

# अतिक्रमण हटविण्यासाठी चार महिन्यांचा संघर्ष ; अखेर पंचायत समितीत आत्मदहनाचा प्रयत्न!

## अमीनपूरच्या नागरिकांचा संताप अनावर ; ग्रामीण पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला



■ प्रतिनिधी | अकोट ■

प्रशासनाच्या आश्वासनांची वारंवार फसवणूक, अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईतील विलंब आणि चार महिन्यांपासून सुरू असलेल्या पाठपुराव्याला प्रतिसाद न मिळाल्याने अखेर अमीनपूर येथील नागरिकांचा संताप शुक्रवारी अकोट पंचायत समितीत उसळला. अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी आलेल्या तीन नागरिकांनी थेट गटविकास अधिकारी यांच्या दालनात पेट्रोलसह प्रवेश करून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने पंचायत समिती परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला.

मुंडगाव गट ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या अमीनपूर गावातील अतिक्रमणाच्या प्रश्नावरून नागरिक गेल्या चार महिन्यांपासून प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारत आहेत. यापूर्वी ग्रामपंचायत कार्यालयासमोर चार दिवस आमरण उपोषणही करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनाने लेखी आश्वासन देऊन उपोषण मागे घ्यायला लावले; मात्र त्यानंतरही प्रत्यक्ष कारवाईचा पत्ता नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

शुक्रवारी दुपारच्या सुमारास सुरेश सरकटे, तोताराम सरकटे आणि सिंधूताई सोनोने हे तोंडाला कपडे बांधून गटविकास अधिकारी रमाकांत माळी यांच्या दालनात दाखल झाले. त्यांच्या जवळ पेट्रोलच्या बाटल्या असल्याचे निदर्शनास येताच ते आत्मदहनाचा प्रयत्न करणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

तत्काळ कारवाई करत पोलिसांनी संबंधितांना ताब्यात घेत पेट्रोलच्या बाटल्या हिसकावून घेतल्या. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

या घटनेनंतर अमीनपूर येथील महिला-पुरुषांनी गटविकास अधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन सुरू केले. 'आश्वासनांची खैरात आणि कारवाईचा शून्य वेग' अशी भूमिका घेत आंदोलकांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. जोपर्यंत अतिक्रमण हटविण्याची ठोस कार्यवाही सुरू होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशाराही देण्यात आला.

आंदोलकांनी ग्रामसेवक सैय्यद नजाकत यांच्यावर अतिक्रमणधारकांना संरक्षण देण्याचा गंभीर आरोप केला. अनेक निवेदने, तक्रारी आणि पाठपुरावा करूनही कोणतीही कारवाई झाली नाही. उलट अतिक्रमण कायम राहावे यासाठी प्रयत्न होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, आत्मदहनाच्या प्रयत्नामुळे पंचायत समिती कार्यालयात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. गटविकास अधिकारी कार्यालयासह पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली. पोलिसांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली.

**लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित**

घटनेनंतर गटविकास अधिकारी रमाकांत माळी यांनी आंदोलकांशी चर्चा केली. अतिक्रमण हटविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल तसेच गावठाणातील जागांबाबत योग्य निर्णय घेतला जाईल, असे दोन स्वतंत्र लेखी पत्रांद्वारे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर आंदोलनाची तीव्रता कमी झाली.

**कडेकोट पोलिस बंदोबस्त**

आत्मदहनाच्या पूर्वसूचनेमुळे पंचायत समिती परिसरात आधीपासूनच पोलिसांचा चौख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याचे निरीक्षक श्रीधर गुट्टे, मुंडगाव बिट जमादार निलेश खंडारे यांच्यासह मोठा पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. पोलिसांच्या सतर्कतेमुळे संभाव्य जीवितहानी टळली.

**'अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया सुरू करणार'**

'अमीनपूर येथील नागरिकांची तक्रार प्राप्त झाली आहे. संबंधित अतिक्रमण हटविण्यासाठी ग्रामसेवकांना निर्देश देण्यात आले आहेत. पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने आवश्यक ती कार्यवाही तातडीने सुरू करण्यात येईल.'

**रमाकांत माळी,**
गटविकास अधिकारी, अकोट

---

# वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठच्या वादविवाद स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद



**अकोला :** माहेश्वरी समाज ट्रस्ट व संबंधित संस्थेच्या वतीने आयोजित महेश नवमी उत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.दरम्यान उत्सवत्वबमाहेश्वरी समाज वरिष्ठ नागरिक प्रकोष्ठच्या वतीने स्व. अँड गिरधारीलाल मोहता यांच्या स्मरणार्थ माहेश्वरी भवनात वादविवाद स्पर्धा संपन्न झाली.या प्रकोष्ठचे अध्यक्ष सुरेश माहेश्वरी, माहेश्वरी समाज ट्रस्टचे अध्यक्ष विजयकुमार तोष्णिवाल, प्रकोष्ठचे उपाध्यक्ष प्रवीण मोहता, महिला मंडळ अध्यक्षा सौ. वंदना हेड़ा, वरिष्ठ महिला प्रकोष्ठ अध्यक्षा सौ. प्रमिला लाहोटी, महेश नवमी उत्सव प्रमुख नरेश बियानी, प्रकोष्ठचे सल्लागार भगवानदास तोष्णिवाल, रमणभाई लाहोटी, माजी अध्यक्ष प्रा. गोपीकिशन कासट, स्पर्धा सहयोगी अँड कृष्णकुमार मोहता, स्पर्धेचे परीक्षक राजेश पांडेय, डॉ. सरलता वर्मा, समालोचक ब्रिजमोहन चितलांगे आदी मान्यवरे उपस्थित होते. प्रथम भगवान महेश यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व पूजन करून तसेच स्व अँड गिरधारीलाल मोहता यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून स्पर्धेचा प्रारंभ करण्यात आला. सुरेश माहेश्वरी यांनी स्पर्धेचा विषय 'वैयक्तिक स्वातंत्र्य आणि वाढती व्यस्तता — विकासाची चिन्हे की नात्यांत वाढता दुरावा?' या विषयावर प्रकाश टाकत विषयसूचकर्ते आर्की. पवन बंग यांचे कौतुक करीत स्पर्धा सहयोगी मोहता कुटुंबाचे आभार मानले.

सचिव राजीव मूंदडा व विजय राठी जावरा यांनी स्पर्धेचे परीक्षक, समालोचक व सहयोगी मोहता कुटुंबातील प्रवीण मोहता व अँड. कृष्णा मोहता यांचे स्वागत केले. परीक्षकांचा परिचय प्रकोष्ठचे राजेंद्र चितलांगे यांनी केला. स्पर्धकांचे मूल्यांकन प्रा. सौ. शारदा बियानी यांनी व समालोचन ब्रिजमोहन चितलांगे यांनी केले.

---



# 'स्टॉप डायरिया' अभियान गावोगावी समन्वयाने राबवा - आरडीसी मालठाणे

■ प्रतिनिधी | अकोला ■

पाच वर्षाखालील बालकांमध्ये अतिसार(डायरिया) या आजारामुळे होणारे मृत्यू आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'स्टॉप डायरिया अभियान' राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील १ लाख १४ हजार १५८ बालकांची तपासणी व आवश्यक तिथे उपचार करण्यात येणार आहे. सर्व यंत्रणांनी जिल्ह्यात ही मोहिम गावोगाव समन्वयाने राबवावी, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांनी आज येथे दिले.


अभियानाबाबत बैठक आरडीसी यांच्या अध्यक्षतेत त्यांच्या दालनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, माता व बालसंगोपन अधिकारी विनोद करंजीकर, निवासी वैद्यकीय अधिकारी श्रीमती डॉ. पांडे आदी उपस्थित होते. उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, शासकीय आरोग्य संस्था तसेच अंगणवाडी केंद्रांचा या अभियानात सक्रिय सहभाग राहणार आहे. पालकांना अतिसार झालेल्या बालकांना तात्काळ ओआरएस द्रावण देणे, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार झिंक गोळ्यांचा वापर करणे, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा वापर करणे आणि स्वच्छतेच्या सवयी अंगीकारणे याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यात आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि विविध स्तरांवरील अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

---

# जिल्हा प्रशासनाच्या 'ई- भूमिती' प्रकल्पाला प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कार

**अकोला :** अकोला जिल्हा प्रशासनाच्या नाविन्यपूर्ण 'ई-भूमिती – मॅपिंग एव्हरी इंच ऑफ गव्हर्नन्स' या प्रकल्पाला देशातील प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथील पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, ऑगस्ट क्रांती मार्ग येथे आयोजित १०८ व्या स्कॉच समिटमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

स्कॉच पुरस्कार हा भारतातील प्रशासन, सुशासन, डिजिटल परिवर्तन, सामाजिक विकास, वित्तीय समावेशन आणि सार्वजनिक सेवा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेणारा एक मानाचा राष्ट्रीय पुरस्कार मानला जातो. देशभरातील विविध शासकीय संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांमधून उत्कृष्ट उपक्रमांची निवड करून त्यांना हा सन्मान प्रदान केला जातो. त्यामुळे या पुरस्कारामुळे अकोला जिल्ह्याच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे.



ई-भूमिती हा जिल्ह्यातील विविध शासकीय मालमत्ता, सुविधा व सेवांचे भू-स्थानिक जीआयएस तंत्रज्ञानाद्वारे एकत्रित डिजिटल मॅपिंग करणारा अभिनव प्रकल्प आहे. या प्रणालीमध्ये शाळा, अंगणवाडी केंद्रे, रेशन दुकाने, आरोग्य संस्था, जलस्रोत, डिजिटल सेवा केंद्रे, शासकीय कार्यालये तसेच विविध सार्वजनिक सुविधांची अचूक भौगोलिक माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे प्रशासनाला विकासकामांचे नियोजन, संसाधनांचे व्यवस्थापन, सेवा वितरण आणि निर्णय प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य झाले आहे.जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पाने जिल्हा प्रशासनात डेटा-आधारित निर्णय प्रक्रियेला चालना दिली असून पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी तसेच नागरिकांना उत्तम सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरत आहे.

---

# कर्ता हनुमान योगासन मंडळाच्या योग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिागतिक योग दिनाचे औचित्य साधून वानखडे नगर येथील कर्ता हनुमान योगासन मंडळच्या ५ दिवसीय योग शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कर्ता हनुमान योगासन मंडळामार्फत गेल्या १७ वर्षांपासून नियमित मोफत योग वर्ग सुरू आहेत. मंडळाचे योग शिक्षक गजानन धरमकर,विलास आगरकर आणि महिला योग शिक्षिका सौ. नंदा निचळ, सौ. आगरकर ताई यांच्या मार्गदर्शनाखाली नित्य सकाळी ५ ते ६ या वेळेत मोफत वर्ग घेतले जातात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाला जागतिक दर्जा दिल्यामुळे योगाचा प्रसार संपूर्ण विश्वात झाला.त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत कर्ता हनुमान योगासन मंडळ दरवर्षी ५ दिवसीय योग शिबिराचे आयोजन करते.संपन्न झालेल्या या योग शिबिरात डॉ. गजानन कर्हे, आयुर्वेदाचार्य राजेश बोंडे,दयाराम मेतकर, डॉ. रुद्रेश कर्हे,मुना उकर्डे, रवी गोतमारे, माजी नगरसेवक मनोज गायकवाड, शिवसेनेचे अकोला जिल्हा समन्वयक डॉ अशोक ओळंबे, शहराध्यक्ष राजेश मिश्रा, युवासेना अध्यक्ष योगेश ढोरे, नॅशनल मिलिटरी स्कूलच्या मुख्याध्यापि का सौ सिसोदिया, सचिन कोरडे, माजी नगरसेविका सौ. मंगला म्हैसने यांच्यासह अकोला शहरातील अनेक योग साधक उपस्थित होते.दरम्यान राजेश मिश्रा यांची शिवसेना शहराध्यक्ष पदी दुसऱ्यांदा नियुक्ती झाल्या बद्दल मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.आज रविवार दि २१ जून रोजी सकाळी ७ वाजता जागतिक योग दिनावर शहरातील सर्व योग शिक्षकांचा सत्कार करण्यात येणार आहे.यात सर्व शिक्षकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.संचालन माजी सैनिक सुभाषराव म्हैसने यांनी तर आभार गजानन धरमकर यांनी मानलेत. या पाच दिवसीय योग शिबिर यशस्वी करण्यासाठी ह.भ.प. सुखदेव वाडकर महाराज, विलास आगरकर, गजानन धरमकर, मुरलीधर आवटे, गजानन माळी, भिका भगत, सेलसिंग सिसोदिया, संजय वै, विठ्ठल चिकटे, दत्ता वेध, हिमतराव पोहरे, भीमराव ठाकरे, शांताराम काळेमेजर, दिवाकर देशमुख, चंद्रकांत ताठे, अश्विन चोपडे, संतोष जाधव, विलास धरस्कर, अशोक भिलकर, शरद लोटे.शीला माळी,वाहोकार रजनी पोहरे, खाडेताई, भाकरेताई, भारसाकडे ताई, वानखडे ताई, आगरकरताई, उजाडेताई, चोपडेताई, तालेताई समवेत कर्ता हनुमान योगासन मंडळाच्या समस्त कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.


---

# प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ वितरण

**अकोला :** कर्मचारी भविष्य निधी संघटन विभागीय कार्यालयातर्फे प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेच्या अकोला विभागातील १ हजार १२१ लाभार्थ्यांना लाभ वितरण आज करण्यात आले.

लाभ वितरणाचा जिल्हास्तरीय कार्यक्रम नियोजनभवनात झाला. त्यात प्रातिनिधीक स्वरूपात २२ लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते लाभ वितरण करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत दिल्ली येथे आयोजित राष्ट्रस्तरीय मुख्य कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपणही यावेळी करण्यात आले. क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त सुदर्शनकुमार,अजयकुमार यादव,केंद्रीय श्रम निरीक्षक प्रशांत तिरपुडे,अकोला इंडस्ट्रीज असोशीएशनचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, सहायक संचालक ए. पी. भोगी आदी उपस्थित होते.

**विभागातील १ हजार १२१ लाभार्थ्यांना लाभ**



देशभरात योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना अंदाजे २४०० कोटी रुपयांचे लाभ वितरित करण्यात आले. योजनेमुळे विशेषतः उत्पादन क्षेत्रात रोजगाराच्या निर्मितीला चालना मिळण्याची आणि तरुणांचा औपचारिक कार्यबलातील सहभाग वाढण्याची अपेक्षा आहे. ही योजना देशभरातील लाखो कामगारांसाठी रोजगार औपचारिक करण्याच्या आणि सामाजिक सुरक्षा व्याप्ती वाढवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण योगदान देईल, असे सुदर्शनकुमार यांनी सांगितले. रोजगार वृद्धी, पात्र व्यक्तींपर्यंत लाभ पोहोचविणे हा या योजनेचा उद्देश आहे, अशी माहिती विभागीय भविष्य निधी आयुक्त अजयकुमार यादव यांनी दिली.

या योजनेचे दोन भाग असून, भाग अ नुसार प्रथमच नोकरीवर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यात नोंदणीकृत असलेले आणि दरमहा १ लाख रुपयांपर्यंत वेतन मिळवणारे, प्रथमच नोकरीवर रुजू झालेले कर्मचारी एका महिन्याच्या वेतनाइतके (जास्तीत जास्त १५००० रुपयांपर्यंत) प्रोत्साहनपर अनुदान दोन हप्त्यांमध्ये मिळण्यास पात्र आहेत. पहिला हप्ता सलग सहा महिन्यांची सेवा पूर्ण झाल्यानंतर दिला जातो, तर दुसरा हप्ता बारा महिन्यांची सेवा आणि आर्थिक साक्षरता कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर दिला जातो. तरुण कामगारांमध्ये दीर्घकालीन बचतीची सवय वाढीस लागावी यासाठी, या प्रोत्साहनपर अनुदानाचा काही भाग ठराविक कालावधीसाठी बचत साधन किंवा ठेव खात्यात राखून ठेवला जातो.

भाग बमध्ये नियोक्त्यांना (मालकांना) सहाय्य दिले आहे. हा भाग सर्व क्षेत्रांमध्ये अतिरिक्त रोजगार निर्मितीसाठी नियोक्त्यांना प्रोत्साहन देतो. संबंधित कर्मचारी किमान सहा महिने सतत नोकरीवर राहिल्यास, नियोक्त्यांना प्रत्येक अतिरिक्त कर्मचाऱ्यामागे दरमहा ३००० रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदान दोन वर्षांच्या कालावधीसाठी मिळेल. उत्पादन क्षेत्रासाठी, हे प्रोत्साहन आणखी दोन वर्षांसाठी (म्हणजेच तिसऱ्या आणि चौथ्या वर्षासाठीही) वाढवून दिले जाते.

---

# अद्वैतच्या संगीताचा लाभ आता गोरक्षण रोड वासीयांना



■ प्रतिनिधी | अकोला ■

अभिजात संगीताचे संवर्धन करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या अद्वैत म्युझिक अकादमीच्या द्वितीय दुसऱ्या शाखेचा प्रारंभ गोरक्षण रोडच्या व्हिएचबी कॉलोनी येथील भक्तिधाम मंदिर परिसरात करण्यात आला.या प्रारंभ सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून मनसे नेते पंकज साबळे व सौ. भाग्यश्री साबळे उपस्थित होते.तर सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी अद्वैत म्युझिक अकादमीचे संस्थापक संचालक ॲड. शिवम भौरदकर होते.यावेळी फोनिक्स व संस्कृत शिक्षिका निलिमा मोरे या प्रामुख्याने उपस्थित होत्या.या प्रसंगी संस्थेतील विद्यार्थ्यांनी आपल्या सुरेल सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकलीत. वीणा फटकर, वीर बजाड आणि आदित्य पानझडे या विद्यार्थ्यांनी 'गणनायकाय', 'ऐरणीच्या देवा' आणि 'लिखे जो खत तुझे' ही गीते सादर करीत अभिजात संगीताचे सादरीकरण करीत जल्लोष सादर केला.अँड भौरदकर यांनी संस्थेच्या एकंदर संगीत उपक्रमाची माहिती दिली.या दुसऱ्या शाखेमुळे शहरातील संगीतप्रेमी विद्यार्थ्यांना संगीत शिक्षणाची आणखी एक उत्कृष्ट संधी उपलब्ध झाली असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सुंदर क्षण टिपण्याचे काम छायाचित्रकार संजय सरकाटे यांनी पार पाडले.

---

# शिवसेना ही केवळ पक्ष नव्हे, तर जनसामान्यांची चळवळ – ललित वानखडे

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेना ही जनसामान्यांची ताकद असून आगामी काळात अकोला जिल्ह्यात पक्षाची मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. शिवसेना हे केवळ चार अक्षरांचे नाव नसून सर्वसामान्यांच्या हक्कासाठी लढणारी एक प्रभावी चळवळ आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे जिल्हा विशेष प्रभारी ललित वानखडे यांनी केले.

अकोला येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित नियुक्तीपत्र वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख अश्विन नवले, माजी आमदार तथा जिल्हाप्रमुख नारायणराव गव्हाणकर, जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी, जिल्हाप्रमुख मंगेश काळे, महिला सेना जिल्हाप्रमुख उषाताई विरक, जिल्हा समन्वयक डॉ. अशोक ओळंबे तसेच महानगरप्रमुख राजेश मिश्रा यांना ललित वानखडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



कार्यक्रमात मार्गदर्शन करताना अश्विन नवले म्हणाले की, शिवसैनिक नेहमी जनतेच्या प्रश्नांसाठी सज्ज असला पाहिजे. अन्यायग्रस्त नागरिकांच्या न्याय व हक्कांसाठी लढण्याची भूमिका प्रत्येक शिवसैनिकाने घेतली पाहिजे.

माजी आमदार नारायणराव गव्हाणकर यांनी 'गाव तेथे शाखा, शाखा तेथे बूथ प्रमुख' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

चंद्रशेखर पांडे गुरुजी यांनी अकोला जिल्ह्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अपेक्षित असलेली शिवसेना उभी करण्याचा निर्धार व्यक्त केला. आगामी निवडणुकांमध्ये जिल्ह्यातून अधिकाधिक लोकप्रतिनिधी निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासून कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले.

नवनियुक्त जिल्हा समन्वयक डॉ. अशोक ओळंबे यांनी पक्षातील बूथस्तरीय कार्यकर्त्यांपासून ते वरिष्ठ नेत्यांपर्यंत सर्वांना समान सन्मान मिळावा यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. कार्यकर्ता आणि नेतृत्व यांच्यातील दुवा म्हणून काम करण्याची ग्वाही त्यांनी दिली.महानगरप्रमुख राजेश मिश्रा यांनी महानगर क्षेत्रात 'वॉर्ड तेथे बूथ प्रमुख' ही संकल्पना लवकरच राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. प्रत्येक बूथवर सक्षम शिवसैनिक उभा करण्यासाठी संघटनात्मक बांधणीवर भर दिला जाईल, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला प्रा. प्रकाश डवले, संतोष अनासने, योगेश अग्रवाल, माजी नगरसेवक गजानन चव्हाण यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती अनिल मालगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १९४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

### अंबाबाईच्या साक्षीने विकास आणि वारशाचा महामंत्र

# फडणवीस-शहांच्या भाषणातून सांस्कृतिक पुनर्जागरणाची गर्जना

### कोल्हापुरातून महाराष्ट्राच्या धार्मिक विकासाचा नवा आराखडा

**कोल्हापूर/जनमाध्यम**

करवीर निवासिनी श्री अंबाबाई महालक्ष्मी मंदिर परिसरातील भव्य कॉरिडॉर आणि संवर्धन प्रकल्पाच्या शुभारंभ सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी विकास, वारसा आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचा ठोस संदेश दिला. अंबाबाईच्या पवित्र साक्षीने झालेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रांच्या विकासाचा नवा आराखडा जनतेसमोर मांडण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात अंबाबाई मंदिर हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक असल्याचे सांगितले. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या मंदिरात दरवर्षी लाखो भाविक येतात. मात्र वाढती गर्दी आणि अपुऱ्या सुविधांमुळे भाविकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. आता १५०० कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे मंदिर परिसराचा कायापालट होणार असून भाविकांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

फडणवीस म्हणाले की, राज्य सरकारने विकास आणि वारसा यांचा समतोल राखण्याचा निर्धार केला आहे. मंदिरांचे जतन, धार्मिक पर्यटनाला चालना आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ देणे या तिन्ही गोष्टी या प्रकल्पातून



साध्य होणार आहेत. कोल्हापूरच्या विकासाला नवी गती देणारा हा ऐतिहासिक टप्पा असल्याचेही त्यांनी नमूद केले.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या सांस्कृतिक पुनर्जागरणाचा विशेष उल्लेख केला. भारताची ओळख त्याच्या संस्कृती, परंपरा आणि श्रद्धास्थानांमुळे आहे. अनेक शतकांपासून भारतीय संस्कृतीचे रक्षण करणाऱ्या मंदिरांचे पुनरुज्जीवन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज आणि अंबाबाई मंदिर यांचे ऐतिहासिक नाते अधोरेखित करताना शहा म्हणाले की, शिवरायांनी अनेकदा या मंदिरात येऊन देवीचे दर्शन घेतले आणि मंदिराला दान दिले. त्यामुळे हा प्रकल्प केवळ बांधकाम नसून इतिहास, श्रद्धा आणि संस्कृती यांचे जतन करणारा उपक्रम आहे.शहा यांनी पंढरपूर कॉरिडॉर, पाच ज्योतिर्लिंगांच्या विकासकामांसह भीमाशंकर परिसरातील पुनर्विकास प्रकल्पांची माहिती देत महाराष्ट्राला धार्मिक पर्यटनाचे जागतिक केंद्र बनविण्याचा निर्धार व्यक्त केला. अंबाबाई मंदिर परिसरात आधुनिक सुरक्षा यंत्रणा, प्रदक्षिणा मार्ग, अन्नछत्र, सांस्कृतिक दालन, लाईट अँड साऊंड शो आणि अन्य सुविधा उभारल्या जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले अंबाबाईच्या चरणी नतमस्तक होत फडणवीस आणि शहा यांनी दिलेला संदेश स्पष्ट होता, वारसा जपत विकासाचा मार्ग स्वीकारायचा आणि महाराष्ट्राच्या श्रद्धास्थानांना जागतिक वैभव प्राप्त करून द्यायचे. कोल्हापुरातून दिलेली ही घोषणा आगामी काळातील धार्मिक आणि सांस्कृतिक विकासाच्या नव्या पर्वाची नांदी मानली जात आहे.

### जिल्ह्यात 'धोंडी-धोंडी पाणी दे'चा गजर

# पावसाने ओढ दिल्याने ग्रामस्थांचे निसर्गाला साकडे

**वर्धा/जनमाध्यम**

जून महिना अर्ध्यावर आला तरी वर्धा जिल्ह्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर पावसाने दडी मारल्याने अनेक भागांतील पेरण्या रखडल्या आहेत. अशा परिस्थितीत चांगला पाऊस पडावा यासाठी ग्रामीण भागात पारंपरिक 'धोंडी-धोंडी पाणी दे' या प्रथेला पुन्हा उजाळा मिळाला आहे.

गावातील महिला, पुरुष व बालकांनी एकत्र येत मेंढकाला प्रतीकात्मक स्वरूपात घेऊन गावभर फेरी काढली. यावेळी धोंडी-धोंडी पाणी दे, शेतशिवार हिरवे कर' अशा घोषणा देत पर्जन्यराजाला साकडे घालण्यात आले. पावसासाठी करण्यात येणारी ही लोकपरंपरा आजही ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग मानली जाते.यंदा मान्सूनच्या संथ गतीमुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. विहिरींची पाणीपातळी घटली असून पेरणीसाठी आवश्यक ओलावा मिळत नसल्याने शेतकरी आभाळाकडे आशेने पाहत आहेत. त्यामुळे गावोगावी पूजा,प्रार्थना आणि धोंडीसारख्या पारंपरिक उपक्रमांद्वारे पावसाचे आवाहन केले जात आहे.



दरम्यान, आगामी काही दिवसांत समाधानकारक पाऊस झाल्यास खरीप हंगामाला मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या वर्धा जिल्ह्यात सध्या 'धोंडी-धोंडी पाणी दे' हा गजर सर्वत्र घुमत आहे.

## संक्षिप्त

### ४० हजारांचे कॉपर रॉड लंपास

**आर्वी-** शहरालगत असलेल्या महावितरणच्या उपकेंद्रातून अज्ञात चोरट्यांनी ४० हजार रुपये किमतीचे अर्थिंगसाठी वापरण्यात येणारे कॉपर रॉड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमुळे उपकेंद्राच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वर्धा मार्गावरील महावितरण उपकेंद्रात रात्रीच्या सुमारास चोरट्यांनी प्रवेश करून ही चोरी केल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. चोरीची बाब लक्षात येताच संबंधित अधिकाऱ्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. घटनेमुळे महावितरणच्या मालमत्तेचे नुकसान झाले असून परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### आजाराला कंटाळून वृद्धेची आत्महत्या

**वर्धा-** दीर्घकाळ सुरू असलेल्या आजारपणाला कंटाळून एका वृद्ध महिलेने विहिरीत उडी घेऊन जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना करंजी (भोगे) येथे घडली. लंका वाघमारे (९२) असे मृत वृद्धेचे नाव आहे. कुटुंबीयांच्या माहितीनुसार त्या काही काळापासून विविध आजारांनी त्रस्त होत्या. यामुळे मानसिक तणावात असल्याचे सांगितले जाते. घरातून बाहेर गेल्यानंतर त्या परत न आल्याने शोधाशोध करण्यात आली. त्यावेळी त्यांचा मृतदेह गावातील विहिरीत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.या प्रकरणी सेवाग्राम पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

### गोठ्यातून १२ शेळया चोरीला

**आर्वी-** तालुक्यातील भाईपूर पुनर्वसन येथे अज्ञात चोरट्यांनी गोठ्यात बांधून ठेवलेल्या १२ शेळया चोरून नेल्याची घटना घडली. या चोरीत सुमारे ७६ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. राजेश शिरघरे (४८) हे शेळीपालन व्यवसाय करतात. त्यांनी घरालगत असलेल्या गोठ्यात शेळ्या बांधून ठेवल्या होत्या. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्यांनी गोठ्यात प्रवेश करून शेळ्या लंपास केल्या. सकाळी गोठा रिकामा असल्याचे लक्षात आल्यानंतर चोरीची बाब उघड झाली. घटनेची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली. शिरघरे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली असून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ग्रामीण भागात वाढत्या पशुधन चोरीच्या घटनांमुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण झाले आहे.

### अपघातात जखमी इसमाचा मृत्यू

**तळेगाव (शा.पंत)-** काही दिवसांपूर्वी झालेल्या दुचाकी अपघातात गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. गजानन दातीर (५२), रा. बालाजी वॉर्ड, आर्वी असे मृताचे नाव आहे. पी.आर.पोटे कॉलेज परिसरात त्यांचा दुचाकी अपघात झाला होता. अपघातानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. वैद्यकीय उपचार सुरू असतानाही प्रकृतीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. अखेर उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची बातमी समजताच कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. तळेगाव पोलिसांनी प्रकरणाची नोंद करून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू केली आहे.

### गळफास घेऊन आत्महत्या

**सेलू-** तालुक्यातील धानोली गावंडे शिवारात एका शेतकऱ्याने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. गजानन वाघ (५५), रा. बोरी कोकाटे असे मृताचे नाव आहे. सकाळच्या सुमारास शेतात गेलेल्या नागरिकांना झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळला.यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी सेलू पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास हाती घेतला आहे.

### मुंढेंचा दणका अन् गुटख्याचा काळाबाजार

# पानठेल्यांवर कुलूप, पण 'अंडरग्राऊंड' विक्री जोमात


### २५ चा खर्रा ५० रुपयांत, शौकीनांची सरळ लूट

**वर्धा/जनमाध्यम**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुगंधी तंबाखू, पानमसाला आणि प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिल्यानंतर वर्धा शहरातील पानठेले चालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. मकोका अंतर्गत कारवाई होण्याची शक्यता व्यक्त झाल्याने अनेक पानठेले चालकांनी तातडीने आपली दुकाने बंद केली आहेत. मात्र प्रशासनाच्या या धडक कारवाईच्या पार्श्वभूमीवर खर्याचा काळाबाजार फोफावल्याचे चित्र सध्या शहरात पाहायला मिळत आहे.

पूर्वी सहजपणे २५ रुपयांना मिळणारा खर्रा आता सर्रास ५० रुपयांना विकला जात आहे. काही ठिकाणी तर त्यापेक्षाही अधिक दर आकारले जात असल्याची चर्चा आहे. पानठेले बंद झाल्यामुळे खर्रा शौकीनांची मोठी गैरसोय होत असून अनेकांना शहरभर भटकंती करूनही हवा तो माल मिळत नाही. त्यामुळे मिळेल त्या ठिकाणी आणि मिळेल त्या दराने खर्रा खरेदी करण्याची वेळ ग्राहकांवर आली आहे. विशेष म्हणजे कारवाईच्या भीतीने छोटे विक्रेते आणि पानठेले चालकांनी व्यवसाय थांबविला असला तरी काही ठोक विक्रेते आणि पुरवठादार मात्र अद्यापही सक्रिय असल्याचे बोलले जात आहे. उघडपणे विक्री बंद असली तरी पडद्यामागून मालाचा पुरवठा सुरू असल्याच्या चर्चांना शहरात उधाण आले आहे. परिणामी बाजारात कृत्रिम टंचाई निर्माण झाली असून त्याचा थेट फायदा काही मोजक्या विक्रेत्यांना होत आहे.दरम्यान, सुगंधी तंबाखू आणि पानमसाल्यावर शासनाने यापूर्वीच बंदी लागू केली होती. मात्र प्रत्यक्षात त्याची विक्री राजरोसपणे सुरू असल्याची तक्रार वारंवार होत होती. अनेक ठिकाणी पानठेल्यांवर आणि किराणा दुकानांमध्ये हे पदार्थ सहज उपलब्ध होत होते. आता मात्र तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कठोर भूमिका घेतल्याने तंबाखू व्यवसायाशी संबंधित साखळीत मोठी खळबळ उडाली आहे.

कारवाईच्या धास्तीमुळे अनेकांनी दुकाने बंद केली असली तरी दुसरीकडे खर्याचा गुप्त बाजार तेजीत असल्याचे वास्तव समोर येत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कारवाईचा फटका सर्वसामान्य ग्राहक आणि छोट्या व्यावसायिकांना बसत असताना मोठ्या पुरवठादारांवर नेमकी कितपत कारवाई होणार, हा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.एकीकडे आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधित पदार्थांवर कारवाईचे स्वागत होत असताना दुसरीकडे



वाढलेले दर, कृत्रिम टंचाई आणि गुप्त विक्रीचे जाळे यामुळे वर्ध्यातील परिस्थिती अधिकच चर्चेचा विषय बनली आहे. सध्या शहरात मुंढेंच्या दणक्याची धास्ती आणि खर्याच्या काळाबाजाराची मस्ती असे दुहेरी चित्र पाहायला मिळत आहे.

# अधिकाऱ्यांची झोप उडाली डौलापूर वितरिकेच्या दुरुस्तीला वेग

## पाहणीनंतर चार दिवसांत काम पूर्ण करण्याचे आश्वासन

**देवळी/जनमाध्यम**

डौलापूर येथील वितरिका गाळ आणि रेतीने पूर्णपणे भरून गेल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेक तक्रारी करूनही लघु सिंचन विभागाचे अधिकारी दखल घेत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी होती. अखेर आमदार राजेश बकाने यांनी घटनास्थळी धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला आणि रखडलेले काम मार्गी लावण्यास भाग पाडले.

डौलापूर वितरिकेत दरवर्षी मोठ्या प्रमाणात गाळ साचत असल्याने पावसाळ्यात पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी, शेतांमध्ये पाणी साचून शेतीचे



नुकसान होते. अनेक वेळा शिवारात जाणेही अशक्य होते, तर काही ठिकाणी दळणवळणही ठप्प पडण्याची वेळ येते. गेटची दुरुस्ती आणि गाळ उपसण्याची मागणी शेतकरी सातत्याने करत होते. मात्र संबंधित विभागाकडून केवळ आश्वासने मिळत होती.या पार्श्वभूमीवर गुरुवारी आमदार राजेश बकाने यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. समस्या अद्याप का सुटलेली नाही, याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना थेट प्रश्न विचारले. मात्र समाधानकारक उत्तर देण्यात अधिकारी अपयशी ठरल्याचे उपस्थितांनी सांगितले. यानंतर आमदारांनी अधिकाऱ्यांना खडसावत तातडीने काम सुरू करण्याचे निर्देश दिले संबंधित अभियंत्याने वितरिकेतील गाळ काढणे व गेट दुरुस्तीचे काम चार दिवसांत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे दीर्घकाळापासून त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.या दौऱ्यात भाजपचे वायगाव-कानगाव मंडळ अध्यक्ष निलेश उर्फ राजू किटकुले, नितीन चंदनखेडे, बंडू करपे, सुवर्णा महले, किशोर उभाटे, सागर सातपुते, मंगेश खासरे, प्रशांत महले यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. डौलापूर वितरिकेच्या दुरुस्तीचे काम प्रत्यक्षात किती वेगाने पूर्ण होते, याकडे आता परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# पोलिसांची अवैध दारू भट्ट्यांवर धडक कारवाई

### खापरी व जयपूर शिवारात लाखांचे साहित्य नष्ट



**सेलू/जनमाध्यम**

अवैध गावठी दारू निर्मितीविरोधात सेलू पोलिसांनी मोठी कारवाई करत खापरी आणि जयपूर शिवारातील दोन ठिकाणी सुरू असलेल्या दारू भट्ट्या उद्ध्वस्त केल्या. या कारवाईत एकूण २ लाख ८३ हजार ६०० रुपयांचे कच्चे रसायन, दारू आणि इतर साहित्य जप्त करून जागीच नष्ट करण्यात आले.

पोलीस ठाण्याचे निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या नेतृत्वाखाली १८ जून रोजी ही कारवाई करण्यात आली. खापरी शिवारातील स्मशानभूमीजवळील ठिकाणी छापा टाकला असता चार लोखंडी ड्रममध्ये साठवून ठेवलेले ७२० लिटर कच्चे मोहा रसायन, १८ लिटर गावठी मोहा दारू आणि इतर साहित्य मिळून १ लाख ५७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. हा सर्व मुद्देमाल जागीच नष्ट करण्यात आला. या प्रकरणी संदीप उडान (रा. खापरी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तो सध्या फरार आहे.

त्यानंतर जयपूर शेतशिवारातील बोर नदीच्या काठावर दुसरी कारवाई करण्यात आली. येथे ६०० लिटर कच्चे मोहा रसायन आणि दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य मिळून १ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल सापडला.पोलिसांनी तोही जागीच नष्ट केला.दोन्ही कारवायांमध्ये मिळून १ हजार ३२० लिटर कच्चे मोहा रसायन नष्ट करण्यात आले. या धडक मोहिमेमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून परिसरात पोलिसांच्या कारवाईची चर्चा रंगली आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत प्रशांत श्रीवास्तव, शरद इंगोले, सचिन वाटखेडे, विनायक गोडे तसेच खापरी येथील पोलीस पाटील नम्रता गव्हाळे यांनी सहभाग घेतला.

# राहुल गांधींचा वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण व फळवितरण

**सेलू-** लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त सेलू येथील माहेर शांती निवासमध्ये वृक्षारोपण व फळवितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव तथा अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचे सहप्रभारी अफझल बेरा यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले. तसेच माहेर शांती निवासातील ज्येष्ठ नागरिकांना फळांचे वाटप करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी



उपस्थित कार्यकर्त्यांनी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या आरोग्याची विचारपूस केली.अफझल बेरा यांनी सांगितले की, राहुल गांधी यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांद्वारे साजरा करणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे. पर्यावरण संरक्षण, मानवसेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश युवकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माहेर शांती निवासचे मुख्य सहकारी अतुलजी शेळके यांनी विशेष सहकार्य केले.यावेळी युवक काँग्रेसचे गोविंद दिघीकर, शिवराज शिंदे, धनंजय दंढारे, विशाल चिंचोलकर, हरीश सोनटक्के, हिमांशू ठाकरे, आयुष ढोमणे यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माहेर शांती निवासचे प्रतिनिधी आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सहा खासदार 'फुटणार'च्या चर्चेने शहरात खळबळ

# वर्धा येथील खासदार यादीत आहेत का? नागरिकांच्या चर्चेला उधाण

**वर्धा/जनमाध्यम**

राज्याच्या राजकारणात सध्या पक्षफोडीच्या चर्चांना उधाण आले असताना 'शिवसेनेनंतर आता शरद पवार गटाला धक्का' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या जनमाध्यम च्या एका वृत्ताने वर्धा शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापविले आहे. शरद पवार गटातील पाच ते सहा खासदार राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात जाणार असल्याचा दावा समोर आल्यानंतर शहरभर दिवसभर या विषयाची चर्चा रंगली.

चहाच्या टपऱ्यांपासून राजकीय अड्ड्यांपर्यंत एकच प्रश्न विचारला जात होता, या सहा खासदारांमध्ये वर्धा येथील खा.अमर काळे यांचे नाव आहेत का, अनेकांनी या चर्चेकडे गंभीर राजकीय घडामोडीपेक्षा आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेली 'राजकीय स्टंटबाजी' म्हणून पाहिले. कोणताही ठोस पुरावा किंवा संबंधित खासदारांची भूमिका समोर आलेली नसताना अशा दाव्यांचा राजकीय बाजार मात्र जोरात रंगत असल्याचे दिसून आले

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धर्मराव बाबा आत्राम यांनी तुतारी चिन्हावरील काही खासदार आपल्या पक्षात येण्यास इच्छुक असल्याचा दावा केला. मात्र या वक्तव्यावर शरद पवार गटाकडून तात्काळ पलटवार करण्यात आला. पक्षातील खासदार फुटणार असल्याच्या बातम्या पूर्णपणे निराधार असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे.दरम्यान, वर्धा येथील नागरिक मात्र या चर्चेकडे कुतूहलाने पाहत असून प्रत्यक्षात कोण पक्ष बदलतो आणि कोण केवळ चर्चेत राहतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या तरी सहा खासदार या चर्चेने वर्धा शहरातील राजकीय वर्तुळात संभ्रम, उत्सुकता आणि टोलेबाजीचे वातावरण निर्माण केले आहे.

### सतीश मसराम यांचे निधन



**वर्धा-** स्थानिक गोंड मोहल्ला येथील सामाजिक कार्यकर्ते सतीश मसराम (वय ४९) यांचे नुकतेच सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मोठे भाऊ व मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या स्मरणार्थ गोंड मोहल्ला येथील देवगड परिसरात रविवार सकाळी १० वाजता श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेत उपस्थित राहून दिवंगत सतीश मसराम यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्याचे आवाहन समाजबांधवांनी केले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २०४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

रविवार, दि. २१ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# ग्लोबल वॉर्मिंगमुळे मान्सून धोक्यात

## खरीप पेरणी रखडली, शेतकरी-शेतमजूर हवालदिल उकाड्यात वाढ, ऋतुचक्र बदलाचा शेती व अर्थव्यवस्थेवर परिणाम

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**नेर :** जागतिक तापमानवाढ (ग्लोबल वॉर्मिंग) आणि बदलत्या हवामानाचा परिणाम यंदाच्या मान्सूनवर दिसून येत असल्याने शेतकरी आणि शेतमजुरांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मान्सूनच्या आगमनास होत असलेला विलंब आणि पावसाबाबतची अनिश्चितता यामुळे अनेक ठिकाणी खरीप हंगामातील पेरण्या रखडल्या असून ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचे पडसाद उमटू लागले आहेत भारत हा कृषिप्रधान देश असून देशातील बहुतांश बाजारपेठ, सण-उत्सव आणि ग्रामीण अर्थचक्र हे शेतीवर आधारित आहे.

महाराष्ट्रातील मोठा भाग हा मान्सूनच्या पावसावर अवलंबून असल्याने पाऊस उशिरा येणे किंवा कमी पडणे ही गंभीर बाब मानली जाते. शेतकऱ्यांनी कर्ज, उसनवारी व उधारी करून बियाणे, खते आणि औषधे खरेदी केली आहेत. मात्र पेरणीसाठी आवश्यक पाऊस न झाल्याने शेतकरी आर्थिक संकटाच्या छायेत उभा आहे. मान्सून आणखी लांबला तर शेतीसोबतच ग्रामीण बाजारपेठेतील व्यवहारांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रोजगाराच्या संधी कमी होऊन शेतमजुरांसमोरही उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. वाढती बेरोजगारी, आर्थिक अस्थिरता आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी वर्गावर अतिरिक्त ताण पडत असल्याची भावना व्यक्त होत आहे दरम्यान, वाढत्या तापमानामुळे नागरिकही उकाड्याने त्रस्त झाले आहेत. हवामानातील बदलामुळे ऋतुचक्र विस्कळीत होत असल्याचे चित्र दिसत असून जलसंकटाची भीतीदेखील व्यक्त केली जात आहे. पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन असल्याने जलसंधारण, पाणी बचत आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी शासनाच्या विविध योजनांसोबत नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेण्याची गरज तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी शासनाने आवश्यक त्या आर्थिक मदतीची घोषणा करावी, तसेच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. मान्सूनवरच पिण्याचे पाणी, सिंचन, कोरडवाहू शेती, उद्योगधंदे आणि वीज निर्मिती अवलंबून असल्याने मान्सूनमधील अनिश्चितता ही केवळ शेतीपुरती मर्यादित नसून संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. सध्या मान्सूनच्या प्रतीक्षेत असलेले शेतकरी व शेतमजूर हवालदिल झाले असून पावसाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खैरगाव (दे) येथील आगीच्या घटनेला १२ दिवस उलटले

## पंचनामा होऊनही शासन मदतीबाबत सुस्त, शेतकरी हवालदिल!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २० :** केळापूर तालुक्यातील खैरगाव (देशमुख) येथे शेतकऱ्याच्या शेतातील साहित्याची आगीत राखरांगोळी होऊन जवळपास १२ दिवस उलटले आहेत.महसूल व कृषी विभागाने घटनास्थळी जाऊन तातडीने पंचनामा केला खरा,परंतु अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत किंवा दिलासा न मिळाल्यामुळे पीडित शेतकरी हवालदिल झाला असून,प्रशासनाच्या या संथ कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मध्यरात्री लागली होती आग मौजा खैरगाव (देशमुख) येथील रहिवासी विकास मोरेश्वर अवधूतकार यांच्या शेतात (शेत गट क्र. १८३/१) दि.०८ जून २०२६ च्या मध्यरात्री अचानक भीषण आग लागली होती. या आगीत शेतात ठेवलेले महागडे सिंचन साहित्य आणि शेतीची अवजारे पूर्णपणे जळून खाक झाली.दि.१० जून रोजी ग्राम महसूल अधिकारी एस.एस.सोयाम आणि सहाय्यक कृषी अधिकारी डी.ए.मेश्राम यांनी पंचांसमक्ष घटनास्थळी भेट देऊन रीतसर पंचनामा केला.प्रशासनाने केलेल्या अधिकृत पंचनाम्यानुसार शेतकऱ्याचे खालील मोठे नुकसान झाले आहे:शक्ती पंप कंपनीचा सोलर संच (०३ एच.पी): पूर्णपणे जळाला. स्प्रिंकलर सेट: ३० पाईप्ससह संपूर्ण संच जळून खाक.(पीव्हीसी) पाईप: ०२.५ इंचाचे ०७ नग पाईप नष्ट.शेती अवजारे: ०१ वखर,०१ डवरा आणि ०२ जुवाडे आगीच्या भक्ष्यस्थानी.(कागदी घोडे नाचवण्यात प्रशासन व्यस्त?) ऐन खरिपाच्या हंगामात शेतीचे मुख्य साधन असलेला सोलर पंप,स्प्रिंकलर संच आणि अवजारे जळाल्यामुळे शेतकरी विकास अवधूतकार यांच्यासमोर सध्या पेरणी आणि सिंचनाचे मोठे संकट उभे राहिले आहे. घटना घडून आणि पंचनामा होऊनही आज दि.२१ जून उजाडला,तरी शासनाच्या तिजोरीतून मदतीचा एक रुपयाही शेतकऱ्यापर्यंत पोहोचलेला नाही. "पंचनामा झाला म्हणजे मदत मिळाली असे होत नाही,"अशी उद्विग्न प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे.पंचनामा केवळ कागदावरच राहणार की प्रशासनाला जाग येऊन पीडित शेतकऱ्याला तात्काळ आर्थिक भरपाई मिळणार,याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# तहानलेल्या नागरिकांसाठी गोदावरी अर्बन चा दिलासा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

## महागाव तहसील कार्यालयाला वॉटर कुलर भेट



**महागाव , दि. २० :** गावखेड्यातून विविध शासकीय कामांसाठी महागाव तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना अनेकदा पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोयीचा सामना करावा लागत होता. ही गरज ओळखून 'गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, नांदेड'च्या महागाव शाखेने सामाजिक बांधिलकी जपत तहसील कार्यालयाला वॉटर कुलर भेट देऊन नागरिकांच्या तहानेचा प्रश्न सोडविण्याचा स्तुत्य पुढाकार घेतला आहे. महागाव शाखेच्या आठव्या वर्धापनदिनानिमित्त शुक्रवार (दि. 1९ जून) रोजी या वॉटर कुलरचे उद्घाटन संस्थेचे सहाय्यक महाव्यवस्थापक (एजीएम) रवी इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तहसीलदार अभय म्हस्के प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तहसील कार्यालयात तालुक्याच्या दुर्गम भागातून दररोज शेकडो नागरिक विविध कामांसाठी येत असतात. विशेषतः उन्हाळ्यात शुद्ध आणि थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. 'गोदावरी अर्बन'ने ही गरज लक्षात घेऊन दिलेली सुविधा लोकहिताची असून त्याचा थेट लाभ सर्वसामान्यांना होणार असल्याचे तहसीलदार अभय म्हस्के यांनी सांगत संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक केले. हा उपक्रम संस्थापक नामदार हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, अध्यक्षा राजश्री पाटील यांच्या प्रेरणेने आणि व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. यावेळी शाखाधिकारी शशांक ढोबळे, असिस्टंट ऑफिसर सचिन हिंगाडे, जया घड्याले, रामेश्वर शिंदे, सुयोग साकळे, ओमकुमार भोयर, अमोल रावते, प्रवीण आढागळे आदी कर्मचारी उपस्थित होते.

> "तहसील कार्यालयात येणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून वॉटर कुलर भेट देण्यात आले आहे. या सुविधेचा लाभ दररोज शेकडो नागरिकांना होणार आहे."
>
> — रवी इंगळे, एजीएम, गोदावरी अर्बन.

# कायद्याची दारे गावागावांत...! झरी-जामणीत महिलांसाठी विधी जनजागृतीचा जागर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी-जामणी, दि. २० :** आदिवासीबहुल भागातील नागरिकांना कायदे, शासनाच्या योजना आणि मोफत विधी सेवेची माहिती मिळावी, या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ, तालुका विधी सेवा समिती, झरी-जामणी आणि तालुका प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती सभागृहात कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव दिपक एच. दाभाडे होते. प्रमुख उपस्थितीत तहसीलदार अक्षय रासने, पोलीस निरीक्षक सतीश जाधव, पोलीस निरीक्षक मिलिंद सरकटे, तालुका वकील संघाचे अध्यक्ष आर. व्ही. भोयर आणि ॲड. आर. व्ही. मदिकुंटावार उपस्थित होते. प्रास्ताविकात ॲड. डी. व्ही. काटकर यांनी झरी-जामणी सारख्या आदिवासीबहुल तालुक्यात अनेक नागरिक शासनाच्या विविध योजनांपासून आणि कायदेशीर हक्कांपासून अजूनही दूर असल्याची खंत व्यक्त करत जनजागृती शिबिरांची गरज अधोरेखित केली. ॲड. आर. व्ही. मदिकुंटावार यांनी प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा (पीसीपीएनडीटी) आणि अवैध गर्भपाताचे कायदेशीर परिणाम याबाबत महिलांना सविस्तर मार्गदर्शन केले. तर आर. व्ही. भोयर यांनी मोफत विधी सेवा, महिला घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा आणि न्याय मिळविण्याच्या उपलब्ध यंत्रणांची माहिती दिली. तहसीलदार अक्षय रासने यांनी विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.अध्यक्षीय भाषणात दिपक एच. दाभाडे यांनी मुलगा-मुलगी भेदभाव नष्ट करण्याची गरज, महिलांचे सक्षमीकरण आणि नालसा आशा युनिटमार्फत बालविवाह, घरगुती हिंसाचार व लैंगिक अत्याचारग्रस्तांना दिल्या जाणाऱ्या कायदेशीर मदतीची माहिती दिली. कार्यक्रमाला तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमधील बचत गट सदस्य, अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# अंबोडा सोसायटीवर राऊत गटाचे एकतर्फी वर्चस्व

## १२पैकी १२ उमेदवार विजयी, साधली विजयाची हॅट्रिक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

**महागाव :** ग्राम विविध कार्यकारी स.संस्था अंबोडा च्या निवडणुकीत तब्बल १२जागा जिंकत राऊत गटाने आपले वर्चस्व मिळविले असुन विजयाची हॅट्रिक साधत विरोधी पॅनेलचा धुव्वा उडविला आहे. महागाव तालुक्याच्या सहकार क्षेत्रात महत्वाची असलेल्या ग्राम विविध कार्यकारी सह.संस्था मर्या. अंबोडा ची संचालक मंडळाची निवडणुक दिनांक १६जुन २०२६ रोजी पार पडली.

१२जागेसाठी झालेल्या या निवडणुकीत सत्ताधारी राऊत व विरोधी देशमुख गटाचे पॅनल एकमेकांसमोर उभे ठाकले होते. या निवडणुकीत २५०मतदारांपैकी २०५मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला यामध्ये सत्ताधारी गटाने आपण घेतलेल्या शेतकरी हिताच्या निर्णयावर मतदारांना मतदानाचे साकडे घातले होते. मतदारांनी राऊत गटाला आपला आशीर्वाद देत त्यांच्या १२पैकी १२उमेदवारांना एकतर्फी निवडून देत पुन्हा एकदा संस्थेच्या चाव्या राऊत गटाकडे दिल्या आहे. सत्ताधारी राऊत गटाने सलग तिसऱ्यांदा विजय मिळवित विजयाची हॅट्रिक साधली आहे. या निवडणुकीत अशोक रामभाऊ कदम,समाधान बाबाराव कदम,राजाराम बापुराव चौधरी,गोदावरी श्रीराम जाधव,अरविंद बाळासाहेब तायडे, बसीरखान अब्दुलखाँ पठाण, सुरेश उमाजी पाटे, विनोदराव जगदेवराव राऊत,बाबाराव गोविंदा हेडे,अशोक नागोबा चंदनकर,सौ.अनिता पंजाब सुरोशे, पुष्पाबाई विठ्ठल राऊत हे उमेदवार विजयी झाले आहे. या निवडणुकीत राऊत गटाच्या विजयासाठी दिपकराव पाटील राऊत,शंकरराव पाटील, दत्तराव हेडे, देवानंद पाटील रोहिदास पाटे, बाबाराव पाटे, नारायण पतंगराव ,संजय मिराशे,यदनेश करपे, देविदास पावडे , ज्ञानेश्वर सुरोशे, विलासराव हेडे, शेरखान पठाण,शेख बशीर शेख शेख महेबुब, अतुल पतंगे,प्रमोद मिराशे, ज्ञानेश्वर कार्लेवाड,गौतम खरतडे, मधुकर भालेराव यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# कमी पावसाचा ऊस पिकाला धोका, यावर्षी सुध्दा उत्पादनात घट होणार... गोविंदराव देशमुख

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २० :** आज २० जून मृग नक्षत्र संपत आले असुन अध्याप पावसाने हजेरी न लावल्याने संपूर्ण विदर्भात व राज्यात खरीपाच्या पेरण्या खोळंबल्या आहेत तर विहिरीसह जलस्त्रोत संपूर्ण आटले आसुन पाण्याची तिव्र टंचाई निर्माण झाली आहे. विदर्भातील साखर पट्टा म्हणून नविन ओळख निर्माण झालेल्या पुसद, महागाव, उमरखेड तालुक्यातील मुख्य नगदी पीक म्हणून ऊसाकडे बघीतले जाते तर या तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे अर्थकारण या मुख्य पिकावर अवलंबून आहे. मागील वर्षी अतिवृष्टी व ऊशीरा गाळपामुळे एकरी दहा ते पंधरा टणापर्यतं ऊतारा घटला होता.

तर यावर्षी अलनिनोचा परीणाम होऊन अध्याप पाऊस सुरू झाला नसल्याने आजच एकरी दहा ते पंधरा टनांपर्यंत उत्पादन घटणार आसल्याने ऊस उत्पादक शेतकरी कमालीचा धास्तावला आहे. यापुढे हवामान खात्याने केलेल्या अंदाजानुसार पर्जन्यमान कमी झाल्यास याहीपेक्षा भंयकर परीस्थिती उद्धवण्याची शक्यता दिसत आहे. शासकिय स्तरावर संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सरकार उपाययोजना करण्यासाठी नियोजन करीत असल्याचे दिसून येत आहे. परंतु यापूर्वी चे दुष्काळी वर्ष आठविल्यास असे निदर्शनास येते की,बिमारीपेक्षा ईलाज भारी दुष्काळ हा गरीब शेतकरी शेतमजूर यांना सळो की पळो करुन जीवघेणा ठरत आसतो तर काही आधीकारी पदाधिकारी व भ्रष्ट प्रवृत्तीच्या लोकांना ही एक भ्रष्टाचार करण्याची आयती संधी उपलब्ध करून देतो. हा यापूर्वी चा अनुभव आजुनही ताजा आहे. अतिवृष्टी,भुकंप,कोरडा दुष्काळ,कोरोणा सारखे भयानक आजार जेव्हा जेव्हा राज्यात संकट घेऊन आले तेव्हा तेव्हा या भ्रष्ट प्रवृत्तीच्या लोकांनी राज्याला लुटण्याचेच काम अधीक केले आहे. त्यामुळे जनतेने आजच सर्वच बाबतीत काटकसरीने व दक्षतेने राहणे गरजेचे असल्याचे आव्हान शेतकरी मित्र गोविंदराव देशमुख सवनेकर यांनी केले आहे.

# ओबीसी आरक्षणावर 'कात्री' झरी-जामणी सह यवतमाळ जिल्ह्यात संताप..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २० :** ग्रामपंचायत निवडणुकांसाठी 1२ जून २०२६ रोजी जाहीर झालेल्या सदस्य पदांच्या आरक्षण सोडतीत इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गाचे आरक्षण रद्द करून संबंधित जागा सर्वसाधारण प्रवर्गात समाविष्ट करण्यात आल्याने झरी-जामणी तालुक्यासह संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या निर्णयाविरोधात राजूर (गोटा) येथील सामाजिक कार्यकर्ते बाबाराव पिसाराम खडसे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तहसीलदार आणि वणीचे आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार यांच्यामार्फत लेखी निवेदन सादर करून तीव्र निषेध नोंदविला आहे.

राजूर (गोटा) ग्रामपंचायतीत यापूर्वी सर्व साधारण-२, ओबीसी-२, अनुसूचित जाती-२ आणि अनुसूचित जमाती-1 अशा सात जागांचे संतुलित आरक्षण होते. मात्र नव्या सोडतीत ओबीसींच्या दोन जागा रद्द करण्यात आल्याने सर्वसाधारण प्रवर्गाच्या जागा चार झाल्या असून ओबीसींचे प्रतिनिधित्व पूर्णपणे संपुष्टात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ५० टक्के आरक्षण मर्यादेचा आधार घेत केवळ ओबीसी आरक्षणावरच गदा आणण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आज राजकीय आरक्षण कमी केले जात असेल, तर भविष्यात शिक्षण आणि नोकऱ्यांमधील आरक्षणावरही याच निकषाने गदा येऊ शकते, अशी भीती ओबीसी समाजाने व्यक्त केली आहे. शासनाने या निर्णयाचा तातडीने फेरविचार करून ओबीसी आरक्षण पूर्ववत करावे, अन्यथा जिल्हाभर तीव्र आंदोलन उभे राहण्याची चिन्हे आहेत.

# ढाणकीत गुन्हेगारीने गाठला कळस

## किरकोळ वादातून जीवघेणे हल्ले !, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह ?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ बन्टी फूलकोडवार

**ढाणकी :** ढाणकी परिसरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारी घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. छेडछाड आणि सोशल मीडियावरील स्टेटससारख्या शुल्लक कारणावरून थेट जीवघेणे हल्ले करण्यापर्यंत गुन्हेगारांची मजल गेली आहे. या वाढत्या घटनांमुळे सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण असून, गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक उरला आहे की नाही ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

ढाणकी मध्ये अंदाजे ७ जून च्या रोजी एका घटनेत, इन्स्टाग्रामवर ठेवलेल्या एका स्टेटसच्या वादातून दोन गटात तुंबळ हाणामारी झाली. या वादाचे पर्यवसान चाकू हल्ल्यात झाले होते, यामध्ये तीन तरुण गंभीर जखमी झाले होते. याप्रकरणी पोलिसांनी १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून आरोपींना अटक केली आहे. ही घटना होऊन बारा ते तेरा दिवस झाले नाही की, ढाणकी मध्ये कालच्या दिवसात अल्पवयीन मुलीची छेड काढल्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या भावावर, आरोपीने कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यामध्ये भाऊ गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्यायसंहिता (BNS) आणि पोक्सो (POCSO) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

या दोन्ही घटनांवरून ढाणकीतील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था चव्हाट्यावर आली असून, भरदिवसा आणि सार्वजनिक ठिकाणी शस्त्रे काढून हल्ले करण्यापर्यंत गुन्हेगारांची हिंमत वाढल्याने, पोलिसांचा धाक कमी झाला आहे का ? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत असून, शहराच्या मुख्य भागात आणि संवेदनशील गल्ल्यांमध्ये पोलिसांची गस्त अधिक कडक करण्याची मागणी नागरिक करत आहेत. तसेच वारंवार होणाऱ्या या हल्ल्यांमुळे गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक निर्माण करणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान असून, अशा घटनांमध्ये तरुण आणि अल्पवयीन मुलांचा सहभाग वाढत चालल्याने सामाजिक चिंता व्यक्त होत आहे.

> सदर घटनेवरुन लक्षात येते की ढाणकी शहराची कायदा व सुव्यवस्थेची सद्यस्थितीत काय परिस्थिती असेल ? शहरातील कायदा व सुव्यवस्था टिकविण्यात सपशेल अपयशी ठरलेल्या पोलीस प्रशासनाचे,प्रशासनातील काही कर्मचाऱ्यांचे, शहरातील काही लोकांकडून स्तुती सुमने उधळण्याचे काम सुरु असल्याने, सामान्य नागरिकांकडून मात्र मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत आहे. 'ते' 'कर्तव्यदक्ष' कर्मचारी असतांना शहरात टोळी युद्धासारख्या घटना घडतातचं कशा ? असा प्रश्न सामान्य नागरीक उपस्थित करतांना दिसत आहे. ढाणकीतील शांतता टिकवण्यासाठी,शहरातील भावी युवा पिढीचं भविष्य उज्वल रहावं याकरीता, पोलिसांनी शहरात खुलेआम सुरु असलेले अवैध धंदे आणि टवाळखोरांवर, कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे नागरिक बोलतांना दिसत आहेत.

# उमरखेडात वावरणाऱ्या 'तम्या'ला डी.बी. पथकाची शिताफीने अटक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड :** उपविभागीय दंडाधिकारी यांच्या तडीपार आदेशाचे उल्लंघन करून शहरात मुक्तपणे वावरत असलेल्या रेकॉर्डवरील आरोपीला उमरखेड पोलिसांच्या डी.बी. पथकाने शिताफीने जेरबंद केले. या कारवाईमुळे तडीपार गुन्हेगारांविरोधातील पोलिसांचा धडाका कायम असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ जून रोजी रात्री उशिरा उमरखेड डी.बी. पथक नियमित पेट्रोलिंग करीत असताना डी.बी. प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे यांना गोपनीय माहिती मिळाली की, शेख तेहमीर उर्फ तम्या शेख समीर (वय २२, रा. आंबेडकर वॉर्ड, उमरखेड) हा तडीपार आदेशाचे उल्लंघन करून शहरात फिरत आहे. माहितीच्या आधारे पथकाने दोन पंचांसह शोधमोहीम राबविली. करोडी रोड कॅनॉलजवळील मोकळ्या जागेत संशयित बसल्याचे निदर्शनास येताच पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याच्याविरुद्ध उपविभागीय दंडाधिकारी, उपविभाग उमरखेड यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५६ (१)(अ) अन्वये यवतमाळ, नांदेड, हिंगोली आणि वाशिम या चार जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी तडीपार आदेश जारी केल्याचे समोर आले. मात्र, या आदेशाचे उल्लंघन करून तो उमरखेड शहरात आढळून आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १४२ अन्वये उमरखेड पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ५४३/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार संदीप ठाकूर करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हुनमंत गायकवाड आणि पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. प्रमुख शरद लोहकरे व त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

रविवार, २१ जून २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अंततः

# प्रा.बी.टी. देशमुख अनंतात विलीन

## शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** माजी आमदार प्रा. बी.टी. उपाख्य भाऊराव तुळशीराम देशमुख यांच्या पार्थिवावर आज शनिवारी सायंकाळी स्थानिक हिंदु स्मशान संस्थेमध्ये शासकीय इतमामात प्रचंड जनसमुदायाच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. बी.टी. देशमुख यांच्या मुली डॉ. वैशाली वानखडे व डॉ. दिपा लाड या दोघींनी त्यांना मुखाग्नी दिला.

शुक्रवार दि. १९ जुन रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास हृद्यविकाराच्या तिव्र झटक्याने प्रा. बी.टी. देशमुख यांचे निधन झाले होते. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांच्या निवासस्थानी धाव घेतली होती. रात्री त्यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. त्यानंतर त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी निवासस्थानीच ठेवण्यात आले होते. रात्री उशीरा पर्यंत अनेकांनी बी.टी.भाऊंचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या निधनाने अमरावतीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील एक अभ्यासू व प्रेरणादायी व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे अशी भावना सर्वांची होती.

प्रा.बी.टी. देशमुखांच्या निधनाचे वृत्त कळताच आज सकाळी प्रशासनाच्या वतीने तसेच राज्यातील सर्वच ठिकाणाहून विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच शैक्षणिक क्षेत्रातील नागरिकांनी त्यांचो अंत्यदर्शनाकरीता गर्दी केली होती. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता त्यांची अंत्ययात्रा नवसारी रोडवरील फ्रेन्डस कॉलनी येथील निवासस्थानावरून निघाली.



स्थानिक मोक्षधामात शासकीय इतमामात बंदुकीच्या तिन फैरी झाडून त्यांना प्रशासनाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांच्या मुली डॉ. वैशाली वानखडे व डॉ. दिपा लाड यांनी त्यांना मुखाग्नी दिला.

यावेळी शासनाचे प्रतिनिधी म्हणून जलसंधारण मंत्री संजय राठोड अंत्यसंस्काराला उपस्थित होते. तर श्री हनुमान व्यायाम प्रसारक ☞(पान २ वर)







### मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

प्रा. बी.टी. देशमुख यांच्या निधनाचे वृत्त कळताच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. तसेच त्यांनी राज्याच्या सचिवांना आदेश देवून प्रा. बी.टी. देशमुख यांनी विधान परिषदेच्या सभापती म्हणून ही कार्यभार सांभाळला होता. त्यामुळे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करता येईल का याची माहिती घेण्यास सांगीतले, व लगेच प्रा. बी.टी. देशमुखांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचे निर्देश दिले. या निर्देशानंतर प्रशासनाने तत्काळ पुढील कार्यवाही करीत शासकीय इतमामात अंत्यसंस्काराची तयारी केली.

### मुलींनी दिला मुखाग्नी

प्रा. बी.टी.देशमुख यांची अंत्ययात्रा एका मोठ्या सजविलेल्या ट्रकवर काढण्यात आली. स्मशानभूमित शासकीय इतमामात बंदुकीच्या तिन फैरी हवेत झाडत त्यांना प्रशासनार्ते भावपूर्ण श्रध्दांजली देण्यात आली. त्यानंतर त्यांच्या मुली डॉ. वैशाली वानखडे व डॉ. दिपा लाड यांनी त्यांच्या चितेला मुखाग्नी दिला. शैक्षणिक व सिंचन क्षेत्रातील योध्दा व तत्वाशी कधीही तडजोड न करणारा लढवय्या नेता, ऋषितुल्य व्यक्तिमत्वाला अखेरचा निरोप देतांना उपस्थितांचे डोळे पाणावले होते.



# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विशेष सर्वसाधारण सभेला उच्च न्यायालयाचा अंशतः स्थगिती आदेश

## -प्रस्तावित शेअर मूल्यवाढीच्या निर्णयाला तात्पुरता ब्रेक

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शेअर धारण करणारे वैयक्तिक सभासद व इतर सहकारी संस्था शेअर्सच्या मूल्यवाढीच्या प्रस्तावावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण अंतरिम आदेश दिला आहे. बँकेचे संचालक रवींद्र गायगोले यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभेत वैयक्तिक सभासद व इतर सहकारी संस्था शेअर्सचे मूल्य एक हजार रुपयांवरून दहा हजार रुपये करण्याच्या विषयावर कोणतीही चर्चा अथवा निर्णय घेण्यास बँकेला मनाई केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाचे न्या. अनिल एस. किल्लोर आणि न्या. राज डी. वाकोडे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. सागर लांबट यांनी बाजू मांडली, तर राज्य शासनाच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील मयुरी देशमुख यांनी कामकाज पाहिले.



याचिकेनुसार, यापूर्वी ३० सप्टेंबर २०२३ रोजी बँकेने वैयक्तिक ☞(पान २ वर)

### बँकेने रविवारी होणारी सभा पुढे ढकलली-

दी अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची विशेष साधारण सभा २१ जून रोजी दुपारी १ वा. बँकेच्या मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.

ही सभा रद्द करण्यात आल्याची सूचना बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वृत्तपत्रात जाहिरात देऊन कळविले व सर्व सभासदांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसून येते.

# महिलेचे मंगळसूत्र हिसकावणारा आरोपी ताब्यात

## दीड लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ परिसरात महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून पळालेल्या आरोपीला अमरावती शहर गुन्हे शाखेने अवघ्या चार दिवसांत अटक करून गुन्ह्याचा उलगडा केला. आरोपीकडून सोन्याची लगड आणि गुन्ह्यात वापरलेली मोपेड असा एकूण १ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१७ जून रोजी दुपारी सुमारे १ वाजताच्या सुमारास बालाजी प्लॉट परिसरातील रहिवासी माया गणेश डागा (वय ५०) या पायी जात असताना काळ्या रंगाच्या मोपेडवर आलेल्या अज्ञात इसमाने त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून पलायन केले होते. याप्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेकडून सुरू करण्यात आला. तपासादरम्यान घटनास्थळासह आरोपीच्या संभाव्य मार्गावरील १०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यात आले. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीपर्यंत मजल मारत त्याला ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. अनिल शेषराव लाखपुरकर (वय ५३, रा. शिवपार्वती रेसिडेन्सी, वासनकर वाडी, अमरावती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून ८ ग्रॅम सोन्याची लगड (किंमत १ लाख १२ हजार रुपये) तसेच गुन्ह्यात वापरलेली मोपेड (एमएच-२७-बीएन-७५६१) किंमत ४० हजार रुपये असा एकूण १ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस ☞(पान २ वर)

# कारागृहातच शिपायाकडून गांजा आणि मोबाईल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** कैद्यांवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी असलेल्या कारागृह कर्मचाऱ्याच्याच ताब्यातून गांजासदृश पदार्थ आणि मोबाईल फोन आढळून आल्याने अमरावती मध्यवर्ती कारागृहात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी एका पोलीस शिपायाला अटक करण्यात आली असून कारागृहातील सुरक्षाव्यवस्थेबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

उदय अशोकराव झपाटे (वय ३८) असे अटक करण्यात आलेल्या शिपायाचे नाव आहे. कारागृह प्रशासनाच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला. १८ जून रोजी सायंकाळी कर्तव्यावर रुजू होण्यासाठी आलेल्या अपाटे यांची मुख्य प्रवेशद्वारावर नियमित तपासणी करण्यात आली. यावेळी त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने सुरक्षा कर्मचाऱ्यांनी अधिक सखोल झडती घेतली.

तपासणीत जेवणाचा डबा आणि पिशवीतून प्लास्टिक व कागदात गुंडाळलेला गांजासदृश पदार्थ आढळून ☞(पान २ वर)

# बनावट नंबर प्लेट, खोटी ओळख अन् सोयाबीनची अफरातफर

## १३ लाखांच्या फसवणुकीचा पोलिसांनी लावला छडा

**अमरावती/प्रतिनिधीः-** मालवाहू ट्रकवर बनावट नंबर प्लेट लावून आणि खोटी ओळख सांगत सोयाबीन व्यापाऱ्याची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा गाडगेनगर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. अत्यंत क्लिष्ट आणि दिशाभूल करणाऱ्या या प्रकरणाचा तपास करत पोलिसांनी आरोपींपर्यंत मजल मारली असून २० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी ट्रक मालक रमेश मिठू राठोड (शिवाजीनगर बंजारातांडा, लोहा,जि. नांदेड )याला ताब्यात घेतले आहे तर ट्रकचालक शिवाजी त्र्यंबक राठोड (बंजारातांडा,माळकोडी, जि. नांदेड ) अजून फरार आहे.



धामणगाव रेल्वे येथील सोयाबीन व्यापारी मनीष भट्टड यांनी जूनच्या पहिल्या आठवड्यात २०१ क्विंटल सोयाबीन सोलापूर येथील व्यापाऱ्याला विक्रीसाठी पाठविले होते. वाहतुकीसाठी एका ट्रकची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र माल नियोजित ठिकाणी पोहोचत नसल्याने व्यापाऱ्याला संशय आला. चौकशी सुरू होताच संपूर्ण व्यवहारात फसवणुकीचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाची सूत्रे हाती घेतली. सुरुवातीला ट्रकचा क्रमांक आणि ☞(पान २ वर)

# दसरा मैदान परिसरात दुचाकीसह मद्यसाठा जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अवैध मद्यविक्री आणि वाहतुकीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेदरम्यान राजापेठ पोलिसांनी एका युवकाला रंगेहात पकडत मोठी कारवाई केली. ॲक्टिव्हा दुचाकीवरून मद्याची वाहतूक करणाऱ्या युवकाकडून दारूसाठ्यासह वाहन जप्त करण्यात आले असून एकूण ५४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

शनिवारी सकाळी पोलिसांचे डीबी पथक परिसरात गस्त घालत असताना बडनेरा रोडवरील दसरा मैदानाजवळून एक युवक दुचाकीवरून अवैधरित्या मद्य घेऊन जाणार असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीची खातरजमा करून पोलिसांनी परिसरात सापळा रचला.

काही वेळातच संशयित युवक दुचाकीवरून येताना दिसताच पोलिसांनी त्याला थांबवून चौकशी केली. त्याने स्वतःचे नाव आकाश गौतम तंतरपाळे (वय २६, रा. गोपाल नगर, अमरावती) असे सांगितले. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये ९० एमएल ☞(पान २ वर)

# पावसाची प्रतिक्षा, शेतकऱ्यांची नजर आभाळाकडे

## -पाऊस नसल्याने खरीप पेरण्या रखडल्या

**खल्लार/प्रतिनिधीः-** जून महिना संपत आला असतानाही समाधानकारक पाऊस झाला नसल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. कोरडवाहू शेतीवर अवलंबून असलेल्या अनेक गावांमध्ये पावसाअभावी खरीप हंगामातील पेरण्या रखडल्या असून शेतकऱ्यांची नजर आता आकाशाकडे लागली आहे.

यावर्षी मान्सून वेळेवर दाखल होईल आणि शेतीची कामे सुरळीत सुरू होतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांची होती. मात्र अद्यापही पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. काही शेतकऱ्यांनी पावसाच्या आशेवर शेतीची मशागतीची कामे पूर्ण केली असली तरी पेरणीसाठी आवश्यक ओलावा नसल्याने ते प्रतिक्षेत आहेत.



दर्यापूर तालुका हा प्रामुख्याने कोरडवाहू व खारपाण पट्टा म्हणून ओळखला जातो. प्रत्येक दिवस शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरतो. पावसाने दडी मारल्याने बियाणे, खत आणि मशागतीवर झालेला खर्च वाया ☞(पान २ वर)

# इन्स्टाग्रामवरून पळवलेल्या १६ वर्षीय मुलीची सुटका

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** इन्स्टाग्रामवरून प्रेमाच्या जाळ्यात ओढून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला फसवून पळवून नेल्याप्रकरणी अंजनगाव सुर्जी पोलिसांनी तातडीने कारवाई करत मुलीची सुखरूप सुटका केली आहे. सदर मुलीला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले.





स्थानिक अजित पुरा भागातील राहणारी ११ वीतील ही मुलगी १४ जून रोजी घरातून बेपत्ता झाली होती. मुलीच्या आईने अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात दिनांक १५ जून २०२६ रोजी तक्रार दाखल केली. तपासात समोर आले की, मुलीची ४ महिन्यांपूर्वी इन्स्टाग्रामवर एका १९ वर्षीय तरुणाशी ओळख झाली होती. सदर तरुणाने मुलीशी जवळीक साधली व तिला लग्नाचे आमिष दाखवून पळून जाण्यास प्रवृत्त केले.अंजनगाव सुर्जी पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंजनगाव सुर्जी पोलिसांनी मुलीच्या इन्स्टाग्राम चॅट व मोबाईल लोकेशनचा तांत्रिक तपास केला. लोकेशनच्या आधारे ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल चांदोरे सहाय्यक पोलीस निरीक्षक, सागर दुतोंडे पो.कॉ., राधिका गाताडे महिला पो. कॉन्स्टेबल यांच्या एका विशेष पथकाने बुलढाणा जिल्ह्यातील श्रीधर नगर येथून एका दिवसात दिनांक १७ जून रोजी मुलीची सुटका केली. आरोपी तरुणाला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी याप्रकरणी अक्षय पंजाब चव्हाण (वय १९ राहणार श्रीधर नगर जिल्हा बुलढाणा) याच्याविरुद्ध भादवि कलम १३७ (२) BNS किडनॅपिंग गुन्हा दाखल केला ☞(पान २ वर)

# असोरिया पेट्रोल पंपाजवळ हवेत गोळीबार

## युवकावर चाकूहल्ला, जुन्या वादातून रक्तरंजित संघर्ष

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वलगाव रोडवरील असोरिया पेट्रोल पंप परिसरात शनिवारी सायंकाळी झालेल्या गोळीबार आणि चाकूहल्ल्याच्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली. जुन्या वादातून झालेल्या या संघर्षात एका युवकावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला, तर घटनास्थळी गोळी झाडल्याची पुष्टी झाली आहे. पोलिसांना घटनास्थळावरून एक जिवंत काडतूस आणि एक रिकामे काडतूस आढळून आले असून तपासाला वेग आला आहे.





या घटनेत शोएब अहमद एजाज अहमद (वय ३४, रा. आजाद कॉलनी) हा युवक गंभीर जखमी झाला. त्याच्यावर प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्याला खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

माहितीनुसार, शोएब हा शनिवारी सायंकाळी असोरिया पेट्रोल पंप परिसरात असताना काही जण तेथे आले. जुन्या वादातून झालेल्या शाब्दिक बाचाबाचीचे रूपांतर हाणामारीत झाले. त्यानंतर हल्लेखोरांनी शोएबवर चाकूने वार केले. याच दरम्यान गोळीबारही करण्यात आल्याचे समोर आले आहे. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच नागपुरी गेट पोलिसांसह गुन्हे शाखेचे अधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करत एक रिकामे ☞(पान २ वर)



# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

❑ रविवार, २१ जुन २०२६ ❑ E-paper - www.janmadhyam.com




**गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू असलेली 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा ही अफवा नव्हती तर, एक वास्तव होते हे सिद्ध झाले.**

## टायगर रिटर्न्स

गेल्या काही दिवसापासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू असलेली 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा ही अफवा नव्हती तर, एक वास्तव होते हे बुधवारी सिद्ध झाले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील ९ पैकी ६ खासदारांनी लोकसभेमध्ये स्वतंत्र गट स्थापन केला आहे. या गटाला लोकसभेच्या अध्यक्षांनी मान्यता दिली आहे.

येत्या दोन दिवसांच्या कालावधीत म्हणजे शिवसेनेच्या वर्धापनदिनी हे सहा खासदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेमध्ये सहभागी होतील आणि 'ऑपरेशन टायगर'ला (ध्र्जूँग्दह ऊगी) पूर्णत्व प्राप्त होईल. गेल्या काही दिवसांपासून जरी याबाबत सर्वजण उलटसुलट चर्चा करत होते आणि अशा प्रकारचे कोणतेही ऑपरेशन सुरू नाही अशा प्रकारचा दावा जरी केला जात असला तरी अंतर्गत पातळीवर सर्व काही सुरू होते. त्याचा परिणाम म्हणूनच आता शिवसेनेत आणखी एक फूट पडली आहे.

एकनाथ शिंदे जेव्हा ५० आमदारांसह शिवसेनेतून बाहेर पडले होते तेव्हा त्यांनी मूळ शिवसेनेवर दावा सांगितला होता. यावेळी मात्र उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतील खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करून नंतर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे न्यायालयीन पातळीवरची ही लढाईही आता वेगळी होणार आहे.

या घडामोडीनंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने जरी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचे ठरवले असले तरी सर्व संदर्भ आता बदलून गेले आहेत. शिवसेनेत पडलेल्या या आणखी एका फुटीनंतर महाराष्ट्रातील व देशातील राजकीय चित्रही काहीसे बदलणार आहे.

एक तर केंद्रातील मोदी सरकारला असलेला खासदारांचा पाठिंबा सहाने वाढणार आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या खासदारांच्या संख्येमध्ये एकनाथ शिंदे यांच्या नावासमोर आता १३ हा आकडा असणार आहे. भाजपापेक्षा जास्त जागा आपल्याकडे असल्याचा दावा आता एकनाथ शिंदे महाराष्ट्रात करू शकतात. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे राष्ट्रीय पातळीवरील राजकारणातही शिंदे यांचे महत्त्व अधिक वाढणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार शिंदे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात ) आणखी दोन मंत्री पदे दिली जाणार आहेत.

म्हणूनच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नेते आता याला ऑपरेशन टायगर न म्हणता 'ऑपरेशन प्रगती' म्हणत आहेत.

याच पार्श्वभूमीवर आता उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत आणि नेत्यांनी आपले काय चुकत आहे याचा विचार करायला हवा.

आपल्या पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेले आमदार व खासदारही काही कालावधीनंतर जेव्हा संघटितपणे अन्य कोणत्या पक्षामध्ये जातात तेव्हा त्यामागील अर्थ त्यांनी लक्षात घ्यायला हवा. बुधवारी सकाळी संजय राऊत यांनी जी पत्रकार परिषद घेतली होती, त्यामध्ये त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वामुळे आणि चेहऱ्यामुळे हे सर्व खासदार निवडून आल्याचा दावा केला होता. पण उद्धव ठाकरे यांचे हे नेतृत्व आणि हाच चेहरा या खासदारांना आपल्या पक्षांमध्ये कायम ठेवू शकला नाही हे वास्तवसुद्धा नाकारता येत नाही.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या कार्यपद्धतीत बदल करण्याची हीच वेळ आहे. कारण शिवसेनेतील या आणखी एका फुटीनंतर एकनाथ शिंदे यांचा आत्मविश्वास आणखी वाढला आहे आणि जेथे जेथे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे संघटन कमकुवत करण्याची संधी त्यांना मिळणार आहे तेथे त्या संधीचा लाभ ते घेतील हे उघड आहे.

शिवसेनेत आजवर पडलेल्या फुटीनंतर किंवा चार वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्या निमित्ताने झालेल्या सर्वात मोठ्या फुटीनंतर उद्धव ठाकरे यांच्याबाबत जरी सहानुभूतीची परिस्थिती निर्माण झाली असली तरी अशा सहानुभूतीचा कोणताही व्यावहारिक आणि व्यावसायिक फायदा होत नाही हे समजून घेण्याची गरज आहे. खासदार गेले तर जाऊ दे शिवसैनिक आमच्या पाठीशी आहेत हा नेहमीचा युक्तिवाद तोंडदेखला ठरू शकतो.

कारण एखादा खासदार किमान पाच ते सहा लाख मतदारांचे प्रतिनिधित्व करत असतो हेसुद्धा विसरता येत नाही. भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाही देशामध्ये अशा प्रकारच्या घडामोडी योग्य आहेत की अयोग्य याबाबत चर्चा कायमच सुरू राहील. पण शेवटी आपली पक्ष संघटना आणि आपल्या पक्षाचे नेते, आमदार, खासदार, कार्यकर्ते यांना जपण्याचे आणि आपल्याजवळ ठेवण्याचे काम शेवटी त्या पक्षाच्या नेतृत्वालाच करावे लागते.

सहा खासदारांच्या या फुटीनंतर संजय राऊत यांच्यासारख्या प्रवक्त्यांनी नेहमीप्रमाणे खोक्यांचा मंत्र जपायला सुरुवात केली आहे. पंधरा कोटी रुपये ॲडव्हान्स दिले असून लवकरच उरलेले ३५ कोटी रुपये संबंधितांना दिले जातील असा दावा त्यांनी पत्रकार परिषदेमध्येच केला आहे.

यापूर्वी एकनाथ शिंदे यांच्या फुटीनंतर जो खोक्याचा विषय सातत्याने लावून धरला होता, त्यामुळे काहीही साध्य झाले नाही हे लक्षात घ्यायला हवे.

पश्चिम बंगालमधील निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसमध्ये ज्या प्रकारे फूट पडली आणि फुटीर खासदारांचा गट एका साध्या छोट्या पक्षामध्ये सामील झाला, त्यानंतर देशातील फुटीर राजकारणाला हा अशा प्रकारचा एक नवीन पर्याय उपलब्ध झाला आहे.

**सनदी अधिकारी तुकाराम मुंढे ज्या-ज्या विभागांमध्ये गेले तेथील भ्रष्टाचार, अनियमितता आणि बेशिस्त यांविरुद्ध त्यांनी नेहमीच आसूड ओढला. त्यामुळे मुंढे हे अल्पावधीत त्या-त्या विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि एकूणच ते ज्या विभागात जातील त्या विभागातील संबंधित खात्याशी असणाऱ्या मंत्र्याबाबत खलनायक ठरले. अर्थात त्यांना २१ वर्षांच्या कारकीर्दीत २५ बदल्यांना सामोरे जावे? लागले आहेत.**

## तुकाराम मुंढे 'इन ॲक्शन मोड'



सनदी अधिकारी तुकाराम मुंढे ज्या-ज्या विभागांमध्ये गेले तेथील भ्रष्टाचार, अनियमितता आणि बेशिस्त यांविरुद्ध त्यांनी नेहमीच आसूड ओढला. त्यामुळे मुंढे हे अल्पावधीत त्या-त्या विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि एकूणच ते ज्या विभागात जातील त्या विभागातील संबंधित खात्याशी असणाऱ्या मंत्र्याबाबत खलनायक ठरले. अर्थात त्यांना २१ वर्षांच्या कारकीर्दीत २५ बदल्यांना सामोरे जावे? लागले आहेत.

प्रशासनातील काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, की त्यांच्या कार्यपद्धतीमुळे केवळ चर्चा घडत नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर आणि प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. सनदी अधिकारी तुकाराम मुंढे हे त्यापैकीच एक. ज्या ज्या ठिकाणी त्यांनी जबाबदारी स्वीकारली, तेथे त्यांनी कामकाजाची पद्धतच बदलण्याचा प्रयत्न केला आणि याच प्रयत्नांमुळे ते वारंवार वादाच्या केंद्रस्थानी आले. परिणामी, त्यांच्या बाबतीत एक विरोधाभासी स्थिती निर्माण झाली आहे ती अशी, सामान्य नागरिकांसाठी ते 'आशेचा किरण', तर सत्ताधारी व्यवस्थेसाठी 'अस्वस्थ करणारा घटक'. म्हणूनच प्रश्न निर्माण होतो, सरकारला तुकाराम मुंढे 'आपत्ती' का वाटतात?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी त्यांच्या कार्यशैलीचा आणि प्रशासनाच्या रचनेचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. मुंढे यांच्या कारकीर्दीत एक गोष्ट ठळकपणे दिसून येते.

त्यांनी कधीही तडजोडीचा मार्ग स्वीकारला नाही. नियमांचे काटेकोर पालन, आर्थिक पारदर्शकतेवर भर, वेळेचे काटेकोर नियोजन आणि जबाबदारीची स्पष्ट जाणीव या चौकटीत त्यांनी काम केले. प्रशासनात ही तत्त्वे आदर्श मानली जातात, पण प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी करणे अनेकांना अस्वस्थ करणारे ठरते. सद्यस्थितीतील नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन विभागातील त्यांची नियुक्ती हे याचे उत्तम उदाहरण आहे. कुंभमेळा हा केवळ धार्मिक उत्सव नसून, तो व्यवस्थापन, नियोजन आणि निधीच्या पारदर्शक वापराची मोठी परीक्षा असतो.

अशा वेळी निधीचे वाटप, ठेके देणे, पायाभूत सुविधा उभारणे यामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होतात. या व्यवहारांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्यास भ्रष्टाचाराची शक्यता वाढते. मुंढे यांनी याच ठिकाणी हस्तक्षेप करत प्रत्येक निर्णय प्रक्रियेला नियमांच्या चौकटीत आणण्याचा प्रयत्न केला.

यामुळे अनेकांचे हितसंबंध धोक्यात आले. ठेकेदार, काही प्रशासकीय अधिकारी आणि स्थानिक राजकीय मंडळी या सर्वांमध्ये असलेली 'सिस्टम' विस्कळीत होण्याची भीती निर्माण झाली. परिणामी, त्यांच्या विरोधात तक्रारी, आरोप आणि राजकीय दबाव वाढू लागला. हा अनुभव त्यांच्या कारकीर्दीत नवीन नव्हता. उलट, हीच त्यांची ओळख बनली. जिथे ते जातात, तिथे बदल घडवतात आणि त्यानंतर बदली होते.

यावरून एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो, तो असा की, प्रामाणिक अधिकारी व्यवस्थेत टिकू का शकत नाहीत? याचे उत्तर व्यवस्थेच्या मूळ रचनेत दडलेले आहे.

## वाढत्या कर्जाचा फास!

**"महाराष्ट्रासह देशातील सर्व २८ राज्ये कशी कर्जाच्या विळख्यात अडकली आहेत, यावर 'कॅग'ने आपल्या ताज्या अहवालात जो प्रकाश टाकला आहे तो धक्कादायक आहे. गेल्या दहा वर्षांत ३१ लाख कोटींवरून राज्यांचे कर्ज ९० लाख कोटींवर जाऊन पोहोचले. खुद्द केंद्र सरकारवरही सुमारे दोनशे लाख कोटींचे कर्ज आहे. केंद्राने राज्यांना आर्थिक शिस्त लावण्याऐवजी केंद्र व राज्यांमध्येच अधिक कर्जबाजारी होण्याची जणू चुरस लागल्याचे चित्र आज दिसते आहे. करदात्यांकडून मिळणारा पैसा व्याज फेडण्यातच खर्च होणार असेल तर कसे व्हायचे? वाढते कर्ज देशाच्या अर्थव्यवस्थेला कुठे घेऊन जाणार आहे? कर्जाचा हा फास देशाच्या मुळावर येण्यापूर्वी आपण शहाणे होणार आहोत की नाही?"**



'ऋण काढून सण साजरा करणे,' अशी एक म्हण आहे. देशातील सर्व राज्य सरकारे आणि केंद्रीय सरकारही गेली काही वर्षे याच पद्धतीने ऋण अर्थात भरमसाट कर्जे काढून आपल्या राजवटी साजऱ्या करीत आहेत. 'कॅग'सारख्या जबाबदार संस्थेनेच देशातील सर्व राज्यांवर कर्जाचा कसा डोंगर चढला आहे, याची जी आकडेवारी जाहीर केली आहे ती धक्कादायक आहे. गेल्या दहा वर्षांत देशातील सर्व २८ राज्यांवरील कर्ज तब्बल १९० टक्क्यांनी वाढले. २०१५-१६ मध्ये राज्यांवर ३१.२० लाख कोटींचे कर्ज होते. ते आता ९०.५१ लाख कोटी रुपये इतके झाले. अर्थशास्त्राची बाराखडी कळणाऱ्या कुणाचेही डोळे पांढरे व्हावेत, असे हे आकडे आहेत. आर्थिक बेशिस्त आणि निवडणुका जिंकण्यासाठी लोकप्रिय घोषणांवर राज्याची तिजोरी उधळून टाकण्याच्या वृत्तीमुळे राज्य सरकारे दिवसेंदिवस कर्जबाजारी होत चालली आहेत, हे कटु सत्य थेटपणे नमूद करण्यास 'कॅग' कचरली असली तरी या अहवालातून राज्यांच्या आर्थिक स्थितीचे व कर्जाच्या डोंगराचे वास्तवदर्शी चित्र देशासमोर आले हेदेखील कमी नाही. महालेखापरीक्षकांच्या 'वित्त-२०२४-२५'च्या अहवालानुसार देशातील सर्व राज्यांचा एकत्रित अर्थसंकल्पीय खर्च ५१.२० लाख कोटी रुपये इतका आहे आणि कर्ज मात्र शंभर लाख कोटींच्या घरात! उत्पन्न कमी, भरमसाट खर्च, मोफत योजनांसाठी लागणारा प्रचंड निधी, आर्थिक प्रगतीचा घसरता आलेख आणि व्याज फेडण्यासाठीही घ्यावे लागणारे

यामुळे महाराष्ट्रासह सर्वच राज्यांचे अर्थचक्र कोलमडले आहे. देशातील जवळपास सर्वच राज्यांना आर्थिक तुटीचा सामना करावा लागत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, बिहार, आसाम, हरयाणा, हिमाचल प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड आदी १५ राज्यांतील महसुली तूट तर ३.४६ लाख कोटींवर जाऊन पोहोचली आहे. कर्जाच्या विळख्यामुळेच राज्यांची आर्थिक स्थिती गेल्या दहा वर्षांत झपाट्याने खालावत असल्याची ही आकडेवारी सांगते. विद्यमान काळात देशातील एकही केंद्रीय संस्था स्वायत्तपणे काम करताना दिसत नसतानाही कॅगसारख्या संस्थेने देशातील राज्यांचे आर्थिक चित्र मांडणारा जो अहवाल सादर केला, त्याबद्दल 'कॅग'चे आभारच मानले पाहिजेत. राज्यांच्या महसुली उत्पन्नातील बहुतांश रक्कम कर्मचाऱ्यांचे वेतन, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन आणि व्याज व कर्जाचे हप्ते यातच खर्च होत आहे. २०२४-२५ या एकाच वर्षात राज्यांच्या तिजोरीतील ४३ टक्क्यांहून अधिक खर्च या तीन बाबींवरच झाला. कर्जाचा विळखा आणि त्याचे भरावे लागणारे हप्ते यामुळे विकासकामांसाठी राज्यांकडे पुरेसा निधीच शिल्लक राहत नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर येत्या आर्थिक वर्षापर्यंत महाराष्ट्राच्या डोक्यावरील कर्ज अकरा लाख कोटींहून अधिक होणार आहे. गेल्या वर्षभरातच महाराष्ट्राच्या कर्जामध्ये तब्बल पावणेदोन लाख कोटींनी वाढ झाली आहे. महाराष्ट्राचे स्थूल उत्पन्न ५१ लाख कोटींच्या घरात असले तरी दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत पडला आहे. दरडोई उत्पन्नात तेलंगणा पहिल्या क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ कर्नाटक, तामीळनाडू व गुजरात आणि पाचव्या क्रमांकावर महाराष्ट्र आहे.

कर्मचाऱ्यांचे पगार, निवृत्तीवेतन यावर महाराष्ट्र सरकारचे सुमारे अडीच लाख कोटी रुपये खर्च होतात .

## ३०० अब्ज डॉलर्सची मदत, ६० दिवसांचा कालावधी

अमेरिकेने इराणसोबत केलेल्या सामंजस्य कराराचा मसुदा प्रसिद्ध केला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी दोन्ही देशांमधील महिन्याभरापासून सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी एका सामंजस्य करारावर औपचारिकपणे स्वाक्षरी केली आहे. यानंतर आता हा करार तात्काळ अंमलात आला आहे. अमेरिकेने इराणसोबत केलेल्या सामंजस्य कराराचा मसुदा प्रसिद्ध केला आहे.




अमेरिकेच्या एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने सांगितले की, या १४-कलमी मसुदा करारामध्ये होर्मुझ पुन्हा सुरू करणे आणि इराणला आर्थिक निर्बंधांमधून दिलासा देणे यासह अनेक महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश आहे.

या सामंजस्य करारातील पहिल्या मुद्द्यानुसार, या करारावर स्वाक्षरी करून अमेरिका आणि इराण सर्व आघाड्यांवरील लष्करी कारवाया तात्काळ आणि कायमस्वरूपी थांबवण्याची घोषणा करत आहेत. दोन्ही पक्ष खात्री देत ??आहेत की, ते यापुढे एकमेकांविरुद्ध कोणतेही युद्ध किंवा लष्करी सराव सुरू करणार नाहीत. तसेच लेबनॉनच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर केला जाईल.सामंजस्य करारातील दुसऱ्या मुद्द्यानुसार, अमेरिका आणि इराण एकमेकांच्या सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर करतील आणि एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाहीत. दोन्ही देश वाटाघाटींद्वारे अंतिम करार करण्यास आणि तो ६० दिवसांच्या आत पूर्ण करण्यास वचनबद्ध आहेत. दोन्ही पक्षांची संमती असल्यास हा कालावधी वाढवला जाऊ शकतो.या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर अमेरिका इराणवरील आपली नौदल नाकेबंदी आणि इतर निर्बंध उठवण्यास सुरुवात करेल. ३० दिवसांच्या आत ही नाकेबंदी पूर्णपणे उठवली जाईल. या कालावधीत, इराण हळूहळू सागरी वाहतूक युद्धपूर्व पातळीवर परत आणेल. अमेरिकेने म्हटले आहे की, अंतिम करार झाल्या पासून ३० दिवसांच्या आत ते इराणला लागून असलेल्या भागांमधून आपले लष्करी सैन्य मागे घेईल. इराण पर्शियन आखातातून ओमानच्या समुद्राकडे आणि परत येणाऱ्या व्यापारी जहाजांना ६० दिवसांसाठी मुक्त आणि सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देईल. व्यापारी जहाजवाहतूक तात्काळ पुन्हा सुरू होईल.

## रेव्ह पार्टींचे जाळे

'विद्येचे माहेरघर' आणि 'महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी' अशी ओळख असलेले पुणे शहर तुळापूर येथे झालेल्या रेव्ह पार्टीच्या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेत आले. शहराच्या वर्दळीपासून दूर, निसर्गरम्य आणि निर्जन ठिकाणी रात्रीच्या वेळी रंगणाऱ्या अशा रेव्ह पार्ट्यांचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय ठरत आहे. या प्रकारांमुळे पुण्याच्या सांस्कृतिक वैभवाला तडा जाण्याची भीती व्यक्त होत असून, तरुणाईवर होणाऱ्या परिणामांबाबतही प्रश्न उपस्थित होत आहे.

पुणे हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. देशभरातील लाखो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी येथे येतात. आधुनिक जीवनशैली, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील वाढत्या रोजगाराच्या संधी आणि तरुणांच्या वाढत्या आर्थिक क्षमतेमुळे उच्चभ्रू मनोरंजनाच्या विविध प्रकारांना मागणी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर काही आयोजकांकडून फार्महाऊस, रिसॉर्ट्स किंवा शहराबाहेरील दुर्गम ठिकाणी रेव्ह पार्टींचे आयोजन केले जात असल्याचे विविध घटनांमधून समोर आले आहे. अशा कार्यक्रमांचे आयोजन प्रामुख्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून गुप्तपणे केले जाते. निमंत्रणे केवळ निवडक व्यक्तींनाच दिली जातात आणि अनेक ठिकाणी प्रवेशासाठी शुल्कही आकारले जाते. त्यामुळे अशा कार्यक्रमांची माहिती मिळवणे, त्यांचा माग काढणे आणि त्यांच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे हे प्रशासनासमोरचे एक गंभीर आणि आव्हानात्मक कार्य बनले आहे. 'रेव्ह पार्टी' ही केवळ मनोरंजनाची साधी पद्धत नसून, तरुणाईला विनाशाच्या दिशेने नेणारा एक छुपा सापळा ठरू शकते. या संस्कृतीचे तरुणांवर होणारे परिणाम गंभीर आणि दीर्घकालीन असतात. अशा पार्ट्यांमध्ये अनेकदा कोकेन, एमडीएमए (एक्स्टसी) यांसारख्या सिंथेटिक अमली पदार्थांचा वापर केला जातो. हे पदार्थ मेंदूच्या मज्जासंस्थेवर प्रतिकूल परिणाम करतात. त्यांच्या सेवनामुळे काही काळासाठी बेधुंद आनंदाची अनुभूती मिळत असली, तरी त्यानंतर नैराश्य, मानसिक अस्थिरता, स्मरणशक्ती कमी होणे आणि इतर मानसिक विकार उद्भवू शकतात. अमली पदार्थांच्या अतिसेवनामुळे अनेक तरुणांचा मृत्यू झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. पुणे हे शिक्षणाचे केंद्र असल्याने देशभरातून तरुण येथे येतात. मात्र काही जण क्षणिक आनंदाच्या मोहात पडून अभ्यास, करिअर आणि विकासाकडे दुर्लक्ष करतात. अमली पदार्थ, दारू किंवा हुक्क्याला 'कूल' समजणे हा चुकीचा समज आहे. अशा पार्ट्या गुप्त नेटवर्कद्वारे आयोजित केल्या जातात आणि त्यातून कायदेशीर, मानसिक व आर्थिक समस्या निर्माण होऊ शकतात. व्यसनामुळे काही तरुण गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता असते. त्यामुळे पालक, शैक्षणिक संस्था आणि समाजाने एकत्र येऊन तरुणांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे.

पुण्यात रेव्ह पार्ट्यांचा इतिहास नवा नाही. यापूर्वी डोणजे, खराडी, लोणावळा, पिरंगुट आणि मुळशी परिसरातही अशा प्रकारच्या पार्ट्यांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. गेल्या दोन दशकांमध्ये पुण्याच्या ग्रामीण तसेच शहरी भागात वेळोवेळी हाय-प्रोफाइल रेव्ह पार्ट्या उघडकीस आल्या असून, त्यांच्यावर पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. पुण्याच्या इतिहासातील सर्वात मोठी आणि खळबळजनक रेव्ह पार्टी सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या डोणजे गावातील आंब्याच्या बागेत झाली होती. या कारवाईदरम्यान एका मोठ्या आंतरराष्ट्रीय ड्रग रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला होता. रेव्ह पार्टी संस्कृतीकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता, त्यातील संभाव्य धोके ओळखणे आणि तरुणांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे.

# अमृता फडणवीसांनी 'या' बॉलीवूड चित्रपटामध्ये गायले गाणे



सिनेविश्वामध्ये 'वेलकम टू द जंगल' या आगामी चित्रपटाची चर्चा रंगली असून येत्या २६ जून रोजी तो प्रदर्शित होणार आहे. यामध्ये अक्षय कुमारसह रवीना टंडन, दिशा पाटनी आणि अनेक कलाकारांच्या प्रमुख भूमिका असणार आहेत. या चित्रपटाच्या ट्रेलरला प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला असून चित्रपटाचे पहिले गाणे 'उँचा लंबा कद' प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले आहे. यानंतर आता 'वेलकम टू द जंगल' चित्रपटातील 'दीवाने है' हे दुसरे गाणे प्रदर्शित झाले आहे. विशेष बाब म्हणजे, 'दीवाने है' हे गाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी आणि गायिका अमृता फडणवीस यांनी गायले आहे, यामुळे चर्चांना उधाण आले आहे.

'दीवाने हैं' या गाण्यात अक्षय कुमार, रवीना टंडन, दिशा पाटनी, जॅकलीन फर्नांडिस, राजपाल यादव, सुनील शेट्टी, जॉनी लिव्हर, दलेर मेहंदी, परेश रावल आणि इतर अनेक बड्या कलाकारांचा समावेश आहे. यामध्ये काश्मीरची संस्कृती दाखवण्यात आली असून गावातील लोकांसह नृत्य करताना दाखवण्यात आले आहे. सोशल मीडियावर या गाण्याची रील व्हायरल होत असून ती प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. 'वेलकम टू द जंगल'मधील दोन्ही गाणी लोकप्रिय झाली आहेत. 'दीवाने हैं' या गाण्यात काश्मिरी लोकसंगीताचे रिमिक्स करण्यात आल्याने तरुणांमध्ये ते प्रचंड लोकप्रिय ठरत आहे.

**अमृता फडणवीस यांचे बॉलीवूड संगीतविश्वात दमदार पदार्पण**

आनंद राज आनंद आणि अमृता फडणवीस यांच्या आवाजातील 'दीवाने हैं' हे गाणे चर्चेत आले आहे.

अमृता फडणवीस यांनी यापूर्वी अनेक हिंदी व मराठी गाणी गायली आहेत.

मात्र, त्यांच्या 'दीवाने हैं' या गाण्यातून त्यांनी बॉलीवूडच्या संगीतविश्वात दमदार पदार्पण केले आहे. अमृता फडणवीस यांनी नुकतेच 'नमन तुला' हे गाणे गायले होते.

त्यांच्या या गाण्यामध्ये अमृता फडणवीस या रितेश देशमुखसह झळकल्या होत्या. हे गाणे छत्रपती शिवाजी महाराज यांना समर्पित करण्यात आले होते.

# 'तारक मेहता' मधील 'बाघा' सेटवरच ढसाढसा रडला

'तारक मेहता का उल्टा चश्मा' मालिकेतील 'बाघा' म्हणजेच अभिनेता तन्मय वेकरियाचा एक भावुक व्हिडिओ समोर आला आहे. शूटिंग सुरू असतानाच तन्मयला सेटवर अचानक रडू कोसळले, ज्यानंतर मालिकेचे निर्माते असित कुमार मोदी यांनी धाव घेत त्याला धीर दिला. हा व्हिडिओ पाहून चाहतेही प्रचंड चिंतेत पडले आहेत. 'तारक मेहता का उल्टा चश्मा' ही मालिका मागील १८ वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. इतकी वर्षे होऊनही ही मालिका टीआरपीच्या यादीत आघाडीवर असते. मालिका इतकी लोकप्रिय आहे की आता त्यातील कलाकारांना लोक त्यांच्या पात्रांच्या नावानेच ओळखतात. या मालिकेत 'बाघा' ही भूमिका करणाऱ्या तन्मय वेकरियाचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे.



तन्मय वेकरिया या व्हिडीओत भावुक झाल्याचं पाहायला मिळतंय. तो रडणं थांबवण्याचा प्रयत्न करतोय, पण तरीही त्याला अश्रू अनावर होतात. 'गडा इलेक्ट्रॉनिक्स'मध्ये मालिकेचं शूटिंग सुरू असताना हे सगळं घडतंय. त्यानंतर तिथे मालिकेचे निर्माते असित कुमार मोदी येतात आणि तन्मयला धीर देतात. त्याला रडू नकोस असं सांगतात. तन्मयचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर त्याला नेमकं काय झालंय, असा प्रश्न चाहत्यांना पडला.

तन्मय वेकरिया का रडत होता, यामागचं कारण आता समोर आलं आहे. तन्मय मालिकेचं शूटिंग करत होता. शूटिंगदरम्यान त्याला त्याच्या आईची आठवण आली आणि तो रडू लागला. तन्मय इतकं रडत होता की असित मोदी यांनी त्याची समजूत घातली आणि त्याला शांत केलं. विरल भयानी या अकाउंटवरून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे.

तन्मय वेकरियाचा हा व्हिडीओ पाहून नेटकरीही भावुक झाले आहेत. 'तन्मय का रडतोय,' 'त्याला नेमकं काय झालंय', 'तन्मयच्या आईला काय झालंय', 'तुझं दुःख समजू शकतो', अशाप्रकारच्या कमेंट्स नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर केल्या आहेत.

दरम्यान, मालिकेबद्दल बोलायचं झाल्यास सध्या बाघा व बावरी यांच्या नात्याची परीक्षा घेणारा ट्रॅक सुरू आहे. 'तारक मेहता'मध्ये बावरीचा बालपणीचा मित्र बालमची एंट्री झाली आहे. त्याचं बावरीवर खूप प्रेम आहे आणि त्याला तिच्याशी लग्न करायचं आहे. त्यामुळे तो बावरीचा बॉयफ्रेंड बाघाला तिच्या आयुष्यातून निघून जाण्यासाठी तब्बल ७ कोटी रुपयांची ऑफर देतो. बाघाला हे सर्व ऐकून धक्का बसला आहे. आता बाघा ७ कोटी रुपये घेऊन बावरीच्या आयुष्यात निघून जाणार की बालमला नकार देणार, ते येत्या भागात पाहायला मिळेल. 'तारक मेहता का उल्टा चश्मा' मालिकेत दिलीप जोशी, अमित भट्ट, मंदार चांदवडकर, सुनयना फोजदार, सोनालिका जोशी, निर्मल सोनी, तनुज महाशब्दे, मुनमुन दत्ता, श्याम पाठक, नितीश भुलानी हे कलाकार आहेत.

टीव्हीवर सर्वाधिक काळ चालणारी हिंदी विनोदी मालिका म्हणून या मालिकेची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये झाली आहे.

# ओरीच्या एका रीलची कमाई ऐकून फुटेल घाम

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मस आता फक्त प्रसिद्धीपुरते मर्यादित राहिलेले नाही. सोशल मीडिया आता पैसे कमवण्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. लोक लाखो रुपये या सोशल मीडियाच्या माध्यमातून कमवत आहे. आणि याचं ताजं उदाहरण म्हणजे सोशल मीडिया सेन्सेशन ओरी. ओरी हा त्याच्या सेलिब्रिटा सोबतच्या फोटोने कायम प्रकाशझोतात असतो. आता पुन्हा एकदा चर्चेत आहे आणि यावेळेस चर्चा फोटोची नाही तर कमाईची आहे.

**एका रीलसाठी घेतले ७६ लाख रुपये**

ओरीने नुकताच एका मुलाखतीत त्याच्या एका रिलच्या कमाईचा खुलासा केला आहे, ज्यामुळे सोशल मीडियावर अक्षरशः खळबळ उडाली आहे. एका ब्रँड डीलसाठी आणि एका रीलसाठी त्याला तब्बल ७६ लाख रुपये मिळाल्याचं ओरीने सांगितलं आहे. एवढी मोठी रक्कम ऐकून अनेकजण थक्क झाले आहेत.

काही सेकंदांच्या रीलमधून लाखोंची कमाई होऊ शकते? हा प्रश्न आता सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनला आहे. अनेकांनी इन्फ्लुएंसर कल्चरवर टीका करत एवढ्या मोठ्या मानधनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. तर दुसरीकडे काहींचं मत आहे की, डिजिटल युगात लोकांचं लक्ष वेधून घेणं हीच खरी ताकद आहे आणि त्याचीच ही किंमत आहे.



**सोशल मीडियावर मीम्सचा पाऊस**

दरम्यान, सोशल मीडियावर या विषयावर मीम्सचाही पाऊस पडत आहे. काही युजर्स मजेशीर अंदाजात म्हणत आहेत, 'ओरीला एका रीलसाठी ७६ लाख मिळतात आणि आम्हाला आमच्या कंटेंटमधून ७,६०० रुपयेही मिळत नाहीत!' अशा प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

विशेष म्हणजे, ओरी कोणताही अभिनेता, उद्योगपती नाही. मात्र बॉलिवूड पार्टीमधील उपस्थिती, स्टार किड्ससोबतचे फोटो आणि सोशल मीडियावरील त्याची वेगळी ओळख यामुळे त्याने स्वतःचा ब्रँड तयार केला आहे. आज जाहिरातींचं स्वरूप झपाट्याने बदलत आहे. पूर्वी टीव्ही, वर्तमानपत्र किंवा होर्डिंग्जवर भर असायचा. पण आता कंपन्या थेट सोशल मीडिया इन्फ्लुएंसर्सच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. कारण लोक जाहिरातींपेक्षा त्यांच्या आवडत्या क्रिएटर्सच्या शिफारशींवर अधिक विश्वास ठेवतात.

**आर्थिक व्यवहारांवर अजूनही पालक लक्ष ठेवतात**

ओरीच्या या ७६ लाखांच्या डीलमुळे पुन्हा एकदा इन्फ्लुएंसर मार्केटिंगची ताकद समोर आली आहे. फॉलोअर्स, एंगेजमेंट आणि व्हायरल होण्याची क्षमता हेच आता डिजिटल जगातील नवीन चलन बनत चाललं आहे. विशेष बाब म्हणजे, एवढी मोठी कमाई करूनही ओरीने एका मुलाखतीत सांगितलं होतं की, त्याच्या आर्थिक व्यवहारांवर अजूनही त्याचे पालक लक्ष ठेवतात. त्यामुळे ही बाबही तितकीच चर्चेत आली आहे. ओरीबद्दल मतं वेगवेगळी असू शकतात. काहींना त्याची लोकप्रियता अतिशयोक्ती वाटू शकते, तर काहींना तो डिजिटल युगातील यशाचं उदाहरण वाटतो.

पण एक गोष्ट मात्र नक्की 'लोक त्याच्याबद्दल बोलत आहेत'. आणि आजच्या सोशल मीडिया युगात, चर्चेत राहणं हीच सर्वात मोठी ताकद मानली जाते.

# जॅकलिन फर्नांडिसची हॉरर दुनियेत पुन्हा एन्ट्री

अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस लवकरच एका नव्या हॉरर चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या काही वर्षांत हॉरर चित्रपटांची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली असून प्रेक्षकांकडून या प्रकारच्या चित्रपटांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

अशा परिस्थितीत जॅकलिनचा हा नवा प्रकल्प सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. जॅकलिन यापूर्वीही हॉरर-कॉमेडी प्रकारातील 'भूत पोलीस' आणि ब्रिटिश चित्रपट 'डेफिनिशन ऑफ फिअर'मध्ये झळकली होती. मात्र, यावेळी ती पूर्णपणे हॉरर प्रकारातील चित्रपटाचा भाग असणार आहे.

त्यामुळे तिच्या चाहत्यांमध्ये या चित्रपटाबाबत उत्सुकता वाढली आहे. माध्यमांमध्ये आलेल्या वृत्तानुसार, जॅकलिन गेल्या अनेक दिवसांपासून अशा एका वेगळ्या आणि दमदार कथानकाच्या शोधात होती, ज्यामुळे तिला हॉरर शैलीत काहीतरी नवीन करण्याची संधी मिळेल. या चित्रपटाची कथा तिला खूप आवडल्याचं सांगितलं जात आहे.

विशेष म्हणजे हा चित्रपट फक्त प्रेक्षकांना घाबरवण्यापुरता मर्यादित राहणार नाही. त्यामध्ये भावनिक कथा, रहस्य आणि दमदार संगीताचाही समावेश असणार आहे.



त्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव देऊ शकतो. सध्या या चित्रपटाचं अधिकृत नाव जाहीर करण्यात आलेलं नाही.

मात्र, या चित्रपटात जॅकलिनसोबत आणखी दोन प्रमुख पुरुष कलाकार दिसणार असल्याची माहिती समोर आली आहे. या कलाकारांची निवड जवळपास पूर्ण झाली असली तरी त्यांच्या नावांची घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही.

या चित्रपटाची निर्मिती ख्याती मदान करत आहेत. मात्र, चित्रपटाचं दिग्दर्शन कोण करणार आणि इतर कलाकार कोण असतील, याबाबत निर्मात्यांनी अजून कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.

या चित्रपटाबाबत आणखी एक विशेष बाब म्हणजे मुख्य चित्रीकरण सुरू होण्यापूर्वीच चित्रपटाचा टीझर शूट करण्यात आला आहे. त्याचबरोबर चित्रपटातील एक गाणंही चित्रित करण्यात आलं आहे. माहितीनुसार, या महिन्याच्या अखेरीस चित्रपटाचं मुख्य चित्रीकरण म्हणजेच प्रिन्सिपल फोटोग्राफी सुरू होणार आहे. त्यानंतर चित्रपटाचं नाव, इतर कलाकार आणि प्रदर्शनाची तारीख यासंबंधीची अधिक माहिती जाहीर केली जाऊ शकते.

दरम्यान, जॅकलिन तिच्या आगामी 'वेलकम टू द जंगल' या मल्टिस्टारर चित्रपटामुळेही चर्चेत आहे. हा लोकप्रिय 'वेलकम' फ्रँचायझीचा तिसरा भाग आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, रवीना टंडन, दिशा पटानी यांच्यासह अनेक कलाकार झळकणार आहेत.

# 'मला रात्रभर झोप आली नाही...'; ८३ वर्षीय अमिताभ बच्चन

करोडो चाहत्यांच्या हृदयावर राज्य करणाऱ्या अमिताभ बच्चन यांच्या नावावर आजही यशाचे नवे विक्रम नोंदवले जातात. परंतु, आश्चर्याची गोष्ट म्हणजे वयाच्या ८३ व्या वर्षीही बिग बींच्या मनात एका गोष्टीची चिंता आहे. यामुळे कधीकधी त्यांची रात्रीची झोपही उडते. नुकताच अमिताभ बच्चन यांनी आपल्या मनातील असा एक विचार शेअर केला आहे, ज्याने त्यांच्या चाहत्यांनाही विचार करण्यास भाग पाडले आहे.

अमिताभ बच्चन वयाच्या ८३ व्या वर्षीही आपल्या कामाबद्दल तितकेच गंभीर आहेत. अनेक दशके चित्रपटसृष्टीवर राज्य करून आणि असंख्य भूमिका साकारूनही, 'बिग बी' आजही आपल्या कामाचे मूल्यमापन करतात. काय चूक? काय बरोबर? हे ठरवतात.

नुकतेच त्यांनी आपल्या ब्लॉगमध्ये खुलासा केला की, एक काम पूर्ण केल्यानंतर त्यांना असे जाणवले की ते हे काम अजून जास्त चांगल्या प्रकारे करू शकले असते. याच विचारामुळे त्यांना रात्रभर झोप येऊ शकली नाही.




**दुसऱ्यांदा प्रयत्न करूनही मनात शंका**

अमिताभ बच्चन यांनी शुक्रवारी सकाळी आपल्या ब्लॉगवर लिहिले की, काम पूर्ण झाल्यावर त्यांना वाटले की यात अजून सुधारणा होऊ शकते. त्यामुळे त्यांनी ते काम पुन्हा करण्याची परवानगी घेतली आणि तोच शॉट स्वतःच्या मनाप्रमाणे पूर्ण केला. मात्र दुसऱ्यांदा शॉट दिल्यानंतरही हा शॉट पहिल्यापेक्षा चांगला होती की नाही, याबद्दल त्यांच्या मनाला खात्री पटू शकली नाही. त्यांनी लिहिले की, 'आता याबद्दलचा अंतिम निर्णय केवळ प्रेक्षकच घेऊ शकतील.'

अशाप्रकारे या चिंतेमुळे त्यांना रात्री झोप आली नाही. विचार करता करता कधी सकाळ झाली, हे त्यांना समजलेच नाही. आपल्या ब्लॉगच्या शेवटी त्यांनी आपल्या चाहत्यांना शुभेच्छा आणि प्रेमही दिले.

**अमिताभ बच्चन यांचा वर्कफ्रंट**

वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर, अमिताभ बच्चन लवकरच दिग्दर्शक नाग अश्विन यांच्या 'कल्कि २८९८ एडी' या चित्रपटाच्या सीक्वलमध्ये दिसणार आहेत. २०२४ मध्ये रिलीज झालेल्या या चित्रपटाच्या पहिल्या भागात त्यांनी साकारलेली 'अश्वत्थामा'ची भूमिका प्रेक्षक आणि समीक्षकांना प्रचंड आवडली होती. आता याच्या पुढील भागातही ते याच दमदार भूमिकेत दिसतील. या चित्रपटात त्यांच्यासोबत प्रभास आणि कमल हासन यांच्याही मुख्य भूमिका आहेत.



# कुमकुम भाग्य फेम अभिनेत्री संचिता उगलेची आत्महत्या

टीव्ही इंडस्ट्रीतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. लोकप्रिय अभिनेत्री संचिता उगले हिनं आत्महत्या केल्याची माहिती समोर येत आहे. संचिता २२ वर्षांची होती आणि मुंबईजवळील नालासोपारा परिसरात आपल्या कुटुंबासोबत राहत होती.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना अचोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुरुवारी सायंकाळी साडेसहा ते साडेसातच्या दरम्यान घडली. घटनेच्या वेळी संचिता घरी एकटी होती. कुटुंबीय घरी परतल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संचिता उगले हिने साडीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनास्थळावरून कोणतीही सुसाईड नोट आढळून आलेली नसून, पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे.

संचिता उगले ही 'कुमकुम भाग्य' आणि 'वागळे की दुनिया' यांसारख्या लोकप्रिय मालिकां मुळे प्रेक्षकांच्या परिचयाची होती.

तसेच तिने अनेक टीव्ही आणि चित्रपट प्रकल्पांमध्ये काम केले होते. विकी कौशल अभिनित 'छावा' चित्रपटात तिने ताराबाईची भूमिका साकारली होती. तिच्या आकस्मिक निधनामुळे मनोरंजन विश्वात हळहळ व्यक्त केली जात असून, सहकलाकार आणि चाहत्यांकडून श्रद्धांजली अर्पण केली जात आहे.

# डोकेदुखी की जीवघेणा ब्रेन ट्यूमर?



ब्रेन ट्यूमर, म्हणजेच मेंदूतील गाठ. हा एक गंभीर आजार आहे, जो वेळेवर ओळखला आणि त्यावर उपचार केला नाही तर जीवघेणा ठरू शकतो. अशा परिस्थितीत ब्रेन ट्यूमरची सुरुवातीची लक्षणे शक्य तितक्या लवकर ओळखणे महत्त्वाचे आहे. डोकेदुखी हे देखील ब्रेन ट्यूमरचे एक लक्षण आहे.

पण, डोकेदुखी ही अशी समस्या आहे, जिचा सामना अनेक लोकांना दररोज करावा लागतो. अशा परिस्थितीत डोकेदुखी हे ब्रेन ट्यूमरचे लक्षण आहे की नाही हे कसे ओळखावे हे जाणून घेऊयात.

**डोकेदुखी हे मेंदूच्या ट्यूमरचे लक्षण आहे का हे कसे ओळखावे?**

मेंदूच्या ट्यूमरची लक्षणे ओळखण्यात लोकांचे अपयश अनेकदा जीवघेणे ठरते. डॉक्टरांच्या मते, मेंदूच्या ट्यूमरची सुरुवातीची लक्षणे रोजच्या डोकेदुखीसारख्या सामान्य समस्यांसारखीच दिसतात. तथापि, डोकेदुखी हे मेंदूच्या ट्यूमरचे लक्षण असेलच असे नाही.

सकाळी तीव्र डोकेदुखी, त्यानंतर उलट्या होणे आणि उलट्या झाल्यावर वेदना कमी होणे, या गंभीर समस्या आहेत. जर एखाद्या निरोगी व्यक्तीला वारंवार डोकेदुखी आणि उलट्या होत असतील तर ते मेंदूच्या ट्यूमरचे लक्षण असू शकते.

**या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका**

डॉक्टर म्हणतात की हे नेहमीच ट्यूमरमुळे होत नाही, पण या वेदनेकडे दुर्लक्ष करू नये. अनेकदा लोक डोकेदुखी झाल्यावर गोळ्या घेतात आणि वेदनेकडे दुर्लक्ष करतात. तथापि, जर असे वारंवार होत असेल, डोकेदुखी सकाळी होत असेल, उलट्या होत असतील आणि उलट्या झाल्यावर डोकेदुखी कमी होत असेल किंवा वेदना होत असताना दृष्टी अंधूक होत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका आणि डॉक्टरांकडून तपासून घ्या.

जेव्हा मेंदूमध्ये किंवा त्याच्या जवळ असामान्य ऊती वाढतात, तेव्हा मेंदूचा ट्यूमर होतो. मेंदूच्या पृष्ठभागाला झाकणाऱ्या नसा, पडदे आणि ग्रंथींमध्येही ट्यूमर विकसित होऊ शकतात. हे ट्यूमर लहान किंवा मोठे असू शकतात. काही ट्यूमर निदान होण्यापूर्वीच खूप मोठे होऊ शकतात.

**प्राथमिक मेंदू ट्यूमर –** जेव्हा मेंदूमध्ये ट्यूमर तयार होतो, तेव्हा त्याला प्राथमिक मेंदू ट्यूमर म्हणतात. काही प्राथमिक मेंदू ट्यूमर कर्करोगजन्य नसतात.

# हवामान बदलाचा 'गोड' साक्षीदार

कडक उन्हाचा तडाखा आता ओसरू लागला असून, पावसाळ्याच्या पहिल्या सरींची चाहूल लागली आहे. ऋतू बदलाच्या या काळात निसर्ग आपल्याला एक खास भेट देतो, ती म्हणजे रसाळ आणि औषधी गुणधर्मांनी युक्त 'जांभूळ'! उन्हाळ्याचा हा शेवटचा मेवा पावसाळा पूर्णपणे स्थिरावण्यापूर्वीच बाजारातून निरोप घेतो, त्यामुळे सध्या या फळावर ताव मारण्याची हीच योग्य वेळ आहे.

अन्न हे केवळ भूक भागवण्याचे साधन नसून ते आपल्या आरोग्याचा मुख्य आधार आहे. निरोगी जीवनासाठी सुरक्षित, पौष्टिक आणि गुणवत्तापूर्ण अन्न मिळणे हा आपला ...



**केवळ चवच नाही, तर आरोग्याचा खजिना**

अनेकदा 'जावा प्लम' किंवा 'इंडियन ब्लॅकबेरी' म्हणून ओळखले जाणारे हे फळ केवळ चवीलाच नाही, तर आरोग्याच्या दृष्टीनेही अतिशय लाभदायी आहे.

यात प्रोटीन, फायबर, व्हिटॅमिन सी आणि पोटॅशियमचा खजिना दडलेला आहे.

भारतीय जेवणात कच्चा कांदा हा केवळ चव वाढवणारा पदार्थ नसून आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर मानला जातो. कच्च्या कांद्यामध्ये क्वेर्सेटिन, सल्फर संयुगे, ...

**जांभळाचे आरोग्यासाठी फायदे:**

**इम्युनिटी बूस्टर:** पावसाळ्याच्या सुरुवातीला होणारे संसर्ग टाळण्यासाठी जांभळातील अँटिऑक्सिडेंट्स आपली रोगप्रतिकारशक्ती बळकट करतात.

**डायबिटीस नियंत्रण:** रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी जांभूळ अत्यंत गुणकारी मानले जाते.

**पाचनशक्ती:** **पचनसंस्था** सुधारण्यासाठी आणि पोट साफ ठेवण्यासाठी हे फळ उत्तम कार्य करते.

**दाहशामक गुणधर्म:** शरीरातील सूज कमी करण्यास मदत करणारे अँटी-इन्फ्लॅमेटरी घटक यात असतात.

# मीठ

आयुर्वेदात मिठाचे अनेक प्रकार वर्णन केले असून प्रत्येक प्रकाराचे वेगळे औषधी गुणधर्म आहेत. त्यामुळे आयुर्वेदात लवणाचा उपयोग केवळ चव वाढवण्यासाठी नसून उपचारात्मक दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा मानला गेला आहे.

आपल्या संस्कृतीत जेवणाचे ताट वाढताना सुरुवात मिठापासून केली जाते. त्याचप्रमाणे आहारविषयक लेखांची सुरुवात मिठापासून केली आहे. आयुर्वेदातील सुश्रुत, चरक, वाग्भट या मूळ ग्रंथांमध्ये विविध प्रकारच्या मिठांचे वर्णन आढळते. त्यांच्या गुणधर्मांची आणि क्रियांची सविस्तर माहिती दिलेली आहे. सैंधव, समुद्र, वीड, सौवर्चल, रोमक, औद्भिद, गुटिका, कटुगट, कृष्ण आणि पांसुज असे अनेक मिठांचे प्रकार वर्णन केलेले आढळतात.



मीठ हा मानवी आहारातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आधुनिक संशोधनानुसार मानवी शरीरात सरासरी १०० ग्रॅम सोडियम असते, जे प्रामुख्याने क्लोराईड आयनांसोबत आढळते. त्यामुळे शरीरातील बहुतेक सोडियम हे सोडियम क्लोराईड म्हणजेच सामान्य मिठाच्या स्वरूपात असते. सरासरी दैनंदिन आहारात ३ ते ६ ग्रॅम सोडियम म्हणजेच सुमारे १० ग्रॅम मीठ असते.

मानवाने आहारात मीठ वापरण्यास सुरुवात नेमकी केव्हा केली याबद्दल निश्चित माहिती नाही. तथापि, मिठाचा वापर अत्यंत प्राचीन काळापासून होत असून तो शिकारी जीवनशैलीतून शेतीप्रधान जीवनशैलीकडे झालेल्या संक्रमणाच्या काळात सुरू झाला असावा. याचे कारण असे की, प्राणिजन्य अन्नामध्ये सोडियम भरपूर आणि पोटॅशियम कमी असते, तर वनस्पतीजन्य अन्नामध्ये सोडियम कमी आणि पोटॅशियम जास्त असते. त्यामुळे शेतीकडे वळलेल्या मानवामध्ये जैवरासायनिक गरजेमुळे सोडियमची भूक निर्माण झाली आणि त्याने मिठाचा वापर सुरू केला.

प्रकृती, ऋतूनुसार आणि देशानुसार मीठ खाण्याचे प्रमाण भिन्न आहेत. जसे की, कोरडय़ा थंड हवेत मीठ अधिक मात्रेत सेवन केले जाते, तर कोकण प्रांतात हवेत आर्द्रता अधिक असल्याने मीठ कमी प्रमाणात लागते. अन्न, मासे, प्राण्यांचे मांस टिकवून ठेवण्याकरिता मिठाचा वापर केला जातो तो त्याच्या जंतू प्रतिबंधक गुणधर्मामुळेच, पण म्हणून माणसाने अति प्रमाणात मीठ सेवन करणे योग्य नाही.

आयुर्वेदामध्ये ग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे काही मिठाच्या प्रकाराचे गुणधर्म थोडक्यात पाहू.

सैंधव (सैंधव मीठ) चरक, सुश्रुत आणि वाग्भट याचे वर्णन डोळ्यांसाठी हितकारक, हृद्य (मनास व शरीरास आनंददायक), रुचिवर्धक, हलके, स्निग्ध, किंचित गोड, विरेचक, शीतल, त्रिदोषशामक (वात, पित्त आणि कफ या तिन्ही दोषांचे शमन करणारे), वृष्य (कामोत्तेजक), सर्व मिठांमध्ये श्रेष्ठ, पचनास चालना देणारे, अविकारी/उपद्रवरहित तसेच किंचित मधुर रसयुक्त आहे.

**समुद्र लवण –** ग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे हे लवण पचनानंतर गोड रस देणारे, फार उष्ण नसलेले, त्रास न देणारे, सौम्य रेचक, किंचित स्निग्ध, पोटदुखी (शूल) कमी करणारे, पित्त फार वाढवत नाही.

**वीड लवण –** हे लवण किंचित क्षारीय, पचनास मदत करणारे, सूक्ष्म मार्गात प्रवेश करणारे, शूल व हृदयरोगात उपयोगी, रुचिवर्धक, तीक्ष्ण, उष्ण, वाताचे नियमन करणारे, पचनशक्ती वाढवणारे, कफ व वाताच्या गतीचे नियमन करणारे, शरीरातील अडथळे दूर करणारे, जडपणा कमी करणारे असे आहे.

सौवर्चल लवण : हे लवण हलके, उष्णवीर्य, स्वच्छ गुणधर्माचे, पचनानंतर तिक्त रस असलेले , गुल्म (गाठ/टयुमर) व शूल कमी करणारे, शरीरातील अडथळे दूर करणारे, हृदयासाठी हितकर, सुगंधी, रुचिवर्धक, सूक्ष्म प्रवेश करणारे आहे.

रोमक लवण – हे लवण तीक्ष्ण, अत्यंत उष्ण, सूक्ष्म प्रवेश करणारे, पचनानंतर कटू रस असलेले, वातशामक, हलके, द्रव करणारे, रेचक, मूत्रल (लघवी वाढवणारे) आहे.

औद्भिद लवण – हे हलके, तीक्ष्ण, उष्ण, द्रव करणारे, सूक्ष्म प्रवेश करणारे, वात नियंत्रित करणारे, किंचित तिखट, किंचित क्षारीय, कफ द्रव करून बाहेर काढणारे असे आहे.

**सुश्रुतांच्या मते तिखट (कटू), छेदी गुणधर्माचे –** 'छेदी' या शब्दाचा अर्थ कापणे, दूर करणे, विभाजन करणे असा असून आयुर्वेदात तो शरीरातील अतिरिक्त मेद किंवा कफ कमी करणा? या गुणांसाठी वापरला जातो. शरीरातील अवांछित वाढ कमी करणारे, कफाचे विघटन करणारे, पचनानंतर तिखट किंवा उष्ण परिणाम देणारे असे अनेक गुणधर्म आढळतात.

**काळे लवण –** चरक आणि वाग्भट यांच्या मते काळ्या मिठाला विशेष वास नसतो. त्याचे गुणधर्म सौवर्चल लवणासारखेच असतात.

आयुर्वेदात मिठाचे अनेक प्रकार वर्णन केले असून प्रत्येक प्रकाराचे वेगळे औषधी गुणधर्म आहेत. काही लवणे पचनशक्ती वाढवतात, काही वात-कफ शमन करतात, काही रेचक किंवा मूत्रल असतात, तर काही शरीरातील अडथळे दूर करून आरोग्य सुधारण्यास मदत करतात.

त्यामुळे आयुर्वेदात लवणाचा उपयोग केवळ चव वाढवण्यासाठी नसून उपचारात्मक दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा मानला गेला आहे.

# रोज सकाळी ५ मिनिटे करा 'हे' आसन ..

पा पाठदुखी, कंबरदुखी आणि अपचन , बद्धकोष्टता तसेच शरीराचा कडकपणा या समस्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. अनेक जण या त्रासांपासून मुक्त होण्यासाठी औषधांचा आधार घेतात, मात्र काही वेळा जीवनशैलीतील साधे बदल आणि नियमित योगाभ्यास यांचाही मोठा फायदा होऊ शकतो. योगशास्त्रामध्ये असे एक आसन आहे जे पचनसंस्थेपासून ते पाठीच्या आरोग्यापर्यंत अनेक बाबींमध्ये उपयुक्त मान उकिडवे बसण्याची स्थिती घेतली जाते. पूर्वीच्या काळात भारतीय घरांमध्ये लोक जेवणे, भाजी निवडणे, घरातील अनेक कामे आणि अगदी शौचविधीसाठीदेखील उकिडवे बसण्याची पद्धत वापरत असत. त्यामुळे शरीराची लवचिकता चांगली राहायची. आज मात्र खुर्चीवर बसण्याचे प्रमाण वाढल्यामुळे शरीरातील अनेक स्नायू निष्क्रिय होत चालले आहेत. मलासन हा त्या नैसर्गिक हालचाली पुन्हा शरीराला शिकवणारा एक प्रभावी योगाभ्यास मानला जातो.

मलासनाचा सर्वात जास्त उल्लेख पचनसंस्थेच्या आरोग्यासाठी केला जातो. या आसनात बसल्यावर पोटाच्या खालच्या भागावर सौम्य दाब निर्माण होतो. त्यामुळे आतड्यांच्या हालचालींना चालना मिळण्यास मदत होऊ शकते. बद्धकोष्ठतेचा त्रास असलेल्या लोकांना सकाळी पोट साफ होण्यासाठी बराच वेळ लागतो.



अशा वेळी योग्य आहार, पुरेसे पाणी आणि नियमित योगाभ्यासासोबत मलासनाचा सराव केल्यास फायदा होऊ शकतो. शरीराची पचनक्रिया सुरळीत राहण्यासाठी आतड्यांचे आरोग्य महत्त्वाचे असते आणि मलासन त्याला नैसर्गिक आधार देऊ शकते.

फक्त पोटासाठीच नव्हे तर पाठदुखी आणि कंबरदुखीवरही मलासन फायदेशीर मानले जाते. दिवसभर एकाच जागी बसून राहिल्याने पाठीच्या खालच्या भागावर अतिरिक्त ताण येतो. यामुळे स्नायूंमध्ये कडकपणा निर्माण होतो आणि वेदना जाणवू लागतात. मलासन करताना कंबर, नितंब, मांडी आणि पाठीच्या खालच्या भागातील स्नायूंना ताण मिळतो. त्यामुळे शरीरातील जडपणा कमी होण्यास मदत होऊ शकते.

नियमित सरावामुळे शरीराची लवचिकता सुधारते आणि हालचाली अधिक सहज होतात. मलासनाचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे नितंब आणि ओटीपोटाजवळील स्नायूंना मिळणारा व्यायाम. दीर्घकाळ खुर्चीवर बसून राहिल्याने हा भाग कमकुवत होऊ शकतो. मलासनामुळे या स्नायूंना बळकटी मिळण्यास मदत होते. तसेच मांडी, गुडघे आणि घोटे यांची हालचालही सुधारू शकते. त्यामुळे खालच्या शरीराचा तोल आणि संतुलन राखण्यासाठी हे आसन उपयुक्त ठरते.

योग हा कोणत्याही आजारावरचा चमत्कारी उपाय नसला तरी तो निरोगी जीवनशैलीचा एक महत्त्वाचा भाग आहे. मलासनासारखे साधे आसन नियमितपणे केल्यास शरीराची लवचिकता टिकून राहण्यास, पचनसंस्था सुरळीत ठेवण्यास आणि पाठ-कंबर भागावरील ताण कमी करण्यास मदत होऊ शकते.

त्यामुळे दिवसाची सुरुवात काही मिनिटांच्या या योगाभ्यासाने करण्याचा प्रयत्न केल्यास शरीर आणि मन दोन्ही ताजेतवाने राहू शकतात.

# चपाती की भात, दुपारच्यावेळी काय खायचं?

उष्णतेच्या वातावरणामुळे लोकांची पचनशक्ती कमकुवत होत आहे आणि खूपच सुस्त वाटतं. अशावेळी लोकांना हलका आहार घेण्याचा सल्ला दिला जातो. हेल्थ एक्सपर्ट्सदेखील हलकं आणि सहज पचणारं अन्न खाण्याचा सल्ला देतात. भारतीय घरांमध्ये भात, चपाती हे दोन पदार्थ आवर्जून खाल्ले जातात. उन्हाळ्याच्या दिवसांत खाल्लेल्या अन्नाचं पचन व्यवस्थित होणं हा मोठा टास्क असतो. मेडीकल रिपोर्ट्सनुसार चपातीच्या तुलनेत भातात कमी फायबर्स असतात. कमी फायबर्समुळे तांदूळ पचायला जड नसतो. ज्या लोकांना ब्लॉटींग, गॅसची समस्या असते त्यांच्यासाठी दुपारच्यावेळी भात पचवणं हे चपाती पचवण्याच्या तुलनेत सोपं असतं.(र्ण्र्ड्रेंड़ त्र्ऱ् ग्म थ्ल्हम्र्ँहरुि)

पाण्यानं परिपूर्ण असे पदार्थ शरीराच्या तापमानाला कंट्रोल करण्यास मदत करतात. तांदूळ शिवजताना योग्य प्रमाणात पाणी घातल्यास भात व्यवस्थित शिजतो. दुपारच्यावेळी भात खाल्ल्यानं शरीराला एस्क्ट्रा हायड्रेशन मिळतं. चपाती सुकी असते. चपाती पचवण्यासाठी शरीराला जास्त पाणी वापरावं लागतं. म्हणून वॉटर कंटेटनुसार भात खाणं उत्तम ठरतं.




भात पचायला कमी वेळ लागत असला तरी पोषक तत्वांच्या बाबतीत भातापेक्षा चपाती जास्त फायदेशीर ठरते. गव्हाच्या चपातीत फायबर्स, प्रोटीन्स आणि आवश्यक मिनरल्स जसं की फॉस्फरस आणि मॅग्नेशियमचे प्रमाण अधिक असते. चपातीचा ग्लायसेमिक इंडेक्स तांदळापेक्षा कमी असतो ज्यामुळे ब्लड शुगर लेव्हल अचानक वाढत नाही. उन्हाळ्याच्या दिवसांत तुम्ही भात खात असाल तर भातासोबत तुरीची डाळ किंवा भाज्या नक्की खा. जेणेकरून पोषक तत्वांची कमतरता भासणार नाही.

दुपारच्या जेवणासाठी काय उत्तम आहे

उन्हाळ्याच्या दिवसांत दुपारच्या जेवणासाठी स्लिपिंग आणि हेल्थ एक्सपर्ट्स तांदूळ उत्तम पर्याय असल्याचं सांगतात. जर तुम्ही वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असाल तर तांदूळ योग्य प्रमाणात खायला हवा. तुम्ही दुपारच्यावेळी ब्राऊन राईस खाऊ शकता. ज्यामुळे फिजिकल एक्टिव्हीटी आणि हेल्थ कंडिशननुसार डाएट ठरवायला हवं. उन्हाळ्याच्या दिवसांत आहार शक्य तितका हलका घ्या. जर तुम्ही वजन कमी करण्याच्या प्रयत्नात असाल तर रात्रीच्यावेळी भात खाणं टाळा. चपातीऐवजी भाकरीचा आहारात समावेश करा.

# कुकरमधील भात चिकट होतो....




कुकरमधील भात चिकट न होता मोकळा व फुललेला व्हावा, यासाठी काही टिप्स लक्षात ठेवा. शिजवण्यापूर्वी तांदूळ २-३ वेळा धुवा आणि १५-२० मिनिटे भिजवून ठेवा. यामुळे भात एकसारखा शिजण्यास मदत होते. प्रेशर कुकरमध्ये भात शिजवताना पाण्याचे प्रमाण योग्य ठेवा. साध्या भातासाठी दुप्पट पाणी घालावे? थोडे तेल किंवा अर्धा चमचा तूप घाला. यामुळे भात चिकटत नाही. लिंबाच्या रसाचे काही थेंब टाकल्याने भात फुलतो.

# कपडे धुताना रंग जातो

कपडे धुताना त्यांचा रंग जाऊ नये, म्हणून काही सोप्या टिप्स लक्षात ठेवाव्या. कपडय़ांचा रंग पक्का करण्यासाठी आणि तो इतर कपडय़ांना लागू नये म्हणून त्यांना थंड पाण्यात धुवावे. तसेच, कपडे धुण्याआधी ते मिठाच्या पाण्यात भिजवून ठेवा.

? मशीनमध्ये किंवा हाताने कपडे धुताना ते नेहमी उलटे करा. नवीन गडद रंगाचे कपडे नेहमी इतर कपडय़ांपासून वेगळे धुवा. नाहीतर त्यांचा रंग दुसऱ्या कपडय़ांना लागू शकतो. कपडे कधीही थेट कडक उन्हात सुकवू नका.



# पिवळे डबे चमकवा

पिवळे डबे चकचकीत करा

अनेकदा भाजी किंवा मसाले ठेवल्यमुळे त्यावर हळदीचे आणि तेलाचे हट्टी डाग पडतात. हे डाग इतके चिकट असतात की, साबणाने ते सहज निघत नाहीत. मात्र काही घरगुती उपाय करून डब्यांवरील डाग आणि दुर्गंधी दूर करू शकता. डब्यात १-२ चमचे बेकिंग सोडा टाका आणि त्यात थोडे व्हिनेगर घाला. हे मिश्रण डब्यात २० मिनिटे तसेच राहू द्या, त्यानंतर डबा नेहमीप्रमाणे घासून धुवा. यामुळे डब्याचा जुनाट पिवळेपणा दूर होतो. एका कापलेल्या लिंबाच्या तुकडय़ावर थोडे मीठ ठेवा आणि ते प्लॅस्टिकच्या डब्यातील पिवळसर भागावर व्यवस्थित चोळा.



# उग्र सौर वादळ!

या वर्षी केरळमध्येच पाऊस उशिरा आला. 'एल निनो'चे प्रताप जाणवायला लागले. उन्हाची काहिली कमालीची वाढली. त्यातच पुन्हा ग्लोबल वॉर्मिंगमध्ये भर टाकणारा युद्धाचा आगडोंब मध्यपूर्वेत उफाळून आला. आता आपल्या 'जनक' ताऱ्यानेही, म्हणजे सूर्यानेही सध्या उग्र रूप धारण केलंय. पृथ्वीवर 'एल निनो'चा उल्हास आणि त्यात सौर वादळांचा फाल्गुन मास असा सगळा 'संतप्त' काळ तर मोठा कठीण आला आहे. अर्थात विराट निसर्गाच्या लहरीपुढे कुणाचंच काही चालणार नाही.

पृथ्वीवर गमजा मारल्या तरी त्या अंतराळात टिकणार नाहीत. निर्हेतुक विराटाकार विश्वासाठी पृथ्वीवरच्या सत्ता नि मत्ता खिजगणतीतही नसतात, असं वाटण्याचं कारणही तसंच आहे.

गेल्या ८ तारखेला सूर्यावरच्या वादळांच्या आवर्तनाने उग्र स्वरूप धारण केले. प्रचंड नैसर्गिक अणुभट्टी गाभ्यात बाळगणाऱ्या सूर्यावर क्षणोक्षणी हायड्रोजनचं रूपांतर हिलियम वायूत होत असतं. त्यातून अफाट उर्जा (नि प्रकाशही) निर्माण होतो. त्याच ऊर्जेवर पृथ्वीवरचं आपलं 'जीवन' फुलतं, परंतु जेव्हा ती ऊर्जा साखळी अचानक उसळी घेते तेव्हा सूर्यावर महाचक्रवात निर्माण होतात. ते अग्निवादळ किंवा अग्नितांडवच असतं.

सूर्याच्या पृष्ठभागाचं तापमान सुमारे सहा हजार अंश सेल्सियस इतकं आहे, तर गाभ्यामधलं दीड कोटी! इथे आपण पारा चाळीस-पंचेचाळीस अंश सेल्सियसपर्यंत गेला तर हैराण होतो.

दीड कोटी किंवा अगदी कमी म्हणजे तीन ते सहा हजार अंश सेल्सियस म्हणजे किती याची केवळ कल्पना केली तरी दाहक वाटेल.

म्हणूनच 'सूर्यावर' कोणतंही यान 'उतरवता' येत नाही. तो 'तेजोनिधी' आहेच, परंतु केवळ लोहगोल नसून अनेक धातूंची निर्मिती करणारा तप्त अग्निमय वायुगोल आहे. त्यावर नेमकं काय चाललंय आणि त्याचा पृथ्वीवर कोणता परिणाम होणार आहे, हे आता आधुनिक विज्ञानाला जाणता येतं. मात्र त्यात 'बदल' करता येत नाही. निसर्ग आहे तसा जाणून त्याच्याशी जुळवून घेण्याचा उपजत शहाणपणा सर्वच सजीवांमध्ये असल्याने ते पृथ्वीवर तग धरून आहेत. माणूस 'प्रगती'च्या नावाखाली निसर्गाची साथ सोडून त्यावर मात करण्याचा प्रयत्न करेल तसतसे त्याचे विपरीत परिणाम भोगावे लागतील याची चुणूक दिसतेच आहे.

हे सर्व सांगण्याचं कारण म्हणजे दर अकरा किंवा एकशे एकवीस वगैरे वर्षचक्रांनी सूर्यावर सौर वादळे येतात तो काळ सध्या सुरू असून गेल्या ८-९ जून रोजी सौर वादळाने इतकं उग्र रूप धारण केलं की, 'नासा'ने पृथ्वीवासीयांना संदेशवहनात व्यत्यय येऊ शकतो, असा इशारा दिला.



सूर्याची 'एम-१.१८' नावाची सौरज्वाला एखाद्या आगीनकमानीसारखी सौरपृष्ठावर उंचच उंच उफाळली.

सूर्यावर अशी वादळं झाली की, उसळलेल्या, लहलहत्या सौरज्वाला सूर्यापासून दूर अंतराळात फेकल्या जातात. सेकंदात १४०० किलोमीटर या वेगाने त्या सर्वत्र पसरल्या तर त्यातील भारित कण किंवा 'चार्ज्ड पार्टिकल्स' पृथ्वीच्या ध्रुव प्रदेशांभोवती असलेल्या चुंबकीय क्षेत्राला धडक देतात. या टकरीचा परिणाम म्हणून उत्तर आणि दक्षिण ध्रुव परिसरात अरोरा किंवा विविधरंगी प्रकाश दिसू लागतो. हे दृश्य मनोहारी असतं.

सौरज्वालांची तीव्रता 'ऑक्टिव्हिटी' जेवढी अधिक तेवढी अरोरांची रंगीत आरास जास्त सुंदर. ८ जूनच्या महासौर वादळातून निर्माण झालेल्या ज्वाला आणि त्यातून उत्पन्न झालेले चार्ज्ड पार्टिकल्स यांचा पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राशी संयोग होऊन या वेळी दूरवर म्हणजे अगदी आपल्या लडाखपर्यंत अरोरा दिसण्याचं भाकित केलं गेलं.

यापूर्वीही लडाख मधून अशा प्रकारचे 'अरोरा' दिसले आहेत.

सूर्याच्या अतितप्त पृष्ठभागातून सेकंदाला ४०० ते ८०० किलोमीटर वेगाने विद्युतभारित कण सर्वत्र प्रसारित होत असतात. उग्र सौर वादळांनी त्यात भर पडते.

हा 'सौरवात' (सोलारविण्ड) जेव्हा पृथ्वीच्या ध्रुवीय भागातील चुंबकीय क्षेत्रात प्रवेश करतो तेव्हा विविध रंगांचा पटच नजरेला जाणवतो.

हा विद्युतभारित रेणूंचा खेळ असतो. तोच उग्र झाला तर उपग्रहीय संदेशवहनात अडथळा आणून सर्व इलेक्ट्रॉनिक व्यवहार ठप्प करू शकतो. ८ जूनला अशाच सौर वादळाने तडाखा दिला. त्याचे नाव 'जी-३ तीव्र सौर वादळ' असं होतं. त्याने फार उत्पात घडवला नाही हे पृथ्वीवासीयांचे सुदैव! ९ जूनच्या सायंकाळी मात्र आकाशात गुरू-शुक्र खूपच जवळ आल्याने झालेली मनोहारी युती पाहायला मिळाली!

# सौर ऊर्जा

जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण जग आता शाश्वत ऊर्जेकडे वळत आहे. भारतानेही अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, यामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रगण्य भूमिका बजावत आहे. महाराष्ट्रात स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने मोठी झेप घेतली जात असून सौर ऊर्जेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागात मोठी ऊर्जा क्रांती घडत आहे. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प, सौर कृषी वाहिनी योजना, तसेच महावितरणच्या विविध उपक्रमांमुळे सांगली, सातारा आणि कोल्हापूर या दक्षिण महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये उल्लेखनीय प्रगती दिसून येत आहे.



राज्यात सौर ऊर्जेची एकूण क्षमता ८,४५० मेगावॅटपर्यंत पोहोचली असून सातारा हा जिल्हा या क्षेत्रात आघाडीवर असल्याचे दिसत. यामुळे केवळ ऊर्जा उत्पादन वाढले नाही, तर पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्वही कमी झाले आहे. या प्रकल्पांच्या अंमलबजावणीत महावितरण या राज्याच्या प्रमुख वितरण कंपनीची महत्त्वाची भूमिका आहे. ही कंपनी राज्यातील हजारो गावांपर्यंत वीज पुरवठा करते. सौर प्रकल्पांना जोडून ऊर्जा वितरण अधिक सक्षम बनवत आहे.

सातारा जिल्हा सौरग्राम संकल्पनेत विशेष अग्रेसर आहे. साताऱ्यातील मान्याचीवाडी हे राज्यातील पहिले 'सौरग्राम' ठरले आहे. येथे संपूर्ण गावाची विजेची गरज सौर ऊर्जेद्वारे पूर्ण केली जाते. या संकल्पनेमुळे ग्रामीण भागात २४ तास वीजपुरवठा शक्य झाला असून शाळा, अंगणवाडी, शेती सिंचन आणि घरगुती वापरासाठी हक्काची वीज उपलब्ध झाली आहे. सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्येही सौर कृषी वाहिनी योजना आणि रूफटॉप सोलर प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर काम सुरू आहे. महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)मार्फत शेतकऱ्यांना सौर पंप आणि सिंचनासाठी सौर प्रणाली उपलब्ध करून दिली जात आहे. सौर पंपांमुळे शेतकऱ्यांचा वीज खर्च शून्यावर आला असून, विजेसाठी पावसावर किंवा रात्रीच्या वीज पुरवठ्यावर अवलंबून राहण्याची गरज उरलेली नाही.

सौर ऊर्जेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कार्बन उत्सर्जनात होणारी घट आणि पर्यावरण संरक्षण. ग्रामीण भागातील वीज खंडित होण्याचे प्रकार कमी होऊन सातत्यपूर्ण पुरवठा मिळत आहे. तसेच, 'प्रधानमंत्री सूर्यघर योजना' आणि राज्य शासनाच्या अनुदानामुळे घरांवर सौर पॅनल बसवणे सर्वसामान्यांना परवडणारे झाले आहे. ३ किलोवॅटपर्यंतच्या सोलर प्रणालीवर ४०ञ् पर्यंत अनुदान मिळत असल्याने मध्यमवर्गीय कुटुंबांना याचा मोठा आर्थिक लाभ होत आहे.

दक्षिण महाराष्ट्रातील या जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळाली आहे. सोलर पॅनल बसवणे, देखभाल आणि तांत्रिक सेवा या क्षेत्रांत नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. उद्योग आणि शेती क्षेत्राला स्वस्त वीज उपलब्ध झाल्याने त्यांची उत्पादनक्षमता वाढली आहे. एकूणच, मुख्यमंत्री सौर ऊर्जा प्रकल्प आणि संबंधित योजनांमुळे दक्षिण महाराष्ट्रात सकारात्मक परिवर्तन होत आहे. येत्या काळात या प्रकल्पांचा विस्तार अधिक वेगाने झाल्यास 'ऊर्जेत आत्मनिर्भर दक्षिण महाराष्ट्र' ही संकल्पना लवकरच वास्तवात येईल.

# पाटी पेन्सिल

टॅबवर शिकण्याच्या, लिहिण्या-वाचण्याच्या आणि किंडल किंवा अन्य 'गॅझेट'वर ग्रंथसंचय करण्याच्या काळात 'पाटी-पेन्सिल' विषय कुठून सुचला? ही कल्पना आता 'आऊटडेटेड' होतेय असं म्हटलं जातं. बदलत्या काळात सगळंच 'चॅटजीपीटी'सारख्या 'गॅझेट'च्या माध्यमातून 'शिकता' येऊ लागलं तर 'शिकवण्या'ची तरी किती गरज उरेल? 'सेल्फ लर्निंग'कडे जग जाईल काय आणि याचे बरे-वाईट परिणाम काय होतील? असे आधुनिक विज्ञानाच्या वापरकर्त्यांना पडलेले प्रश्न कानावर येतात. अनेकदा त्याबाबत पुढच्या पिढयांशी चर्चाही होते. 'एआय'च्या संभाव्य सर्वंकष 'क्रांती'विषयी केव्हातरी माहिती घेऊच.परंतु आजची गोष्ट थोडी आधीची. हल्लीच्या भाषेत 'बेबी बूमर' पिढीची. हा काळ १९४६ ते १९६४ असा ठरवला जातो. हे 'जनरेशन'चे कालावधी हासुद्धा वेगळ्याच लेखाचा विषय आहे, पण आमची पिढी या 'बेबी बूमर' काळातली. खरे तर आमच्या बालपणीचा काळ म्हणजे मध्ययुगातील अनेक प्रथा-परंपरांसकटच्या जीवनपद्धतीचा सरता काळ. त्या वेळी विमानांपर्यंत प्रगती झाली असली तरी महावेगवान 'स्पेस' युग अवतरायचं होतं. एखादा स्पुटनिक अवकाशात गेल्याचा अचंबा होता, परंतु 'कॉम्प्युटर क्रांती' खूप दूर होती. 'कॉन्कॉर्ड'सारख्या वेगवान विमानाचं कौतुक कॉलेजमधल्या अभ्यासक्रमात वाचायला मिळत होते.

इथल्या इंग्रजी अमदानीत 'स्लेट' किंवा दगडी पाटी शालेय अभ्यासाच्या सुरुवातीला महत्त्वाची ठरली. त्यापूर्वी मुळाक्षरं धूळपाटीवर लिहिली जात. ती धुळाक्षरं होती. मात्र तात्पुरतं लिहिलेलं त्वरित पुसता येईल (डिलिट करता येईल) अशी 'सोय' त्यात होती, पण धूळपाटयांसाठी 'धूळ' गरजेची आणि त्या आकाराने मोठ्या म्हणजे फळ्यासारख्या विद्यार्थ्या'नी सहज 'दफ्तरा'तून नेण्यासारख्या नव्हेत. मग आल्या दगडी, सिंगल आणि 'डबल' पाटय़ा! आम्ही इयत्ता चौथीपर्यंत त्याच वापरल्या. सर्व विषय त्यावर शिकायचे, लक्षात ठेवायचे आणि पुसायचे. आवश्यक तिथे पाठांतर. ही परंपरा तर अक्षर शोधाचाही पूर्वीची. साहित्यातल्या कविता, वैज्ञानिक, गणिती सूत्रे, व्याकरणाचे नियम पाठ करून घेतले जायचे. या घोकमपट्टीवरही नंतर खूप वाद-चर्चा झाल्या. निव्वळ पाठांतरापेक्षा 'आकलन' महत्त्वाचं हे खरंच, पण पाठांतराने काही 'डेटा' मेंदूत 'स्टोअर' करून अर्थघटनासाठी कुणालाही विचारता यायचं हेसुद्धा खरं.

तर या पाटी-पेन्सिलीचा आरंभ कधी झाला? नावाप्रमाणेच 'स्लेट' पाटी ही स्लेट दगडापासून बनवली जायची. आजही बनवली जात असेल. हा 'पाटी'चा दगड पृथ्वीवर हजारो वर्षांच्या प्रक्रियेतून नैसर्गिकरीत्या तयार होतो. चिकट चिखल आणि गाळाच्या (सेडिमेंटरी) खडकापासून या 'स्लेट' दगडाची निर्मिती होते. त्यामध्ये ज्वालामुखीजन्य राखेचाही (व्हॉल्पॅनिक अ?श) समावेश असतो.

हा गुळगुळीत पापुद्रेदार दगड (किंवा फॉलिएशन) एकावर एक अशा पातळ थरांमध्ये घट्ट होतो. मात्र हे थर 'क्लिव्हेज' किंवा विदलन' पद्धतीने परस्परांपासून वेगळे होऊ शकतात. त्याचे मोठमोठे पापुद्रे आणखी पातळ (थिन) करून त्याचे लिखाणाच्या 'पाटी' साठी योग्य तुकडे बनवून लाकडी चौकटीत अडकवले जातात. त्यावर घट्ट चुनखडीच्या 'पेन्सिल'ने लिहिता, वाचता, पुसता येतं. सध्या एखादी गोष्ट मोबाईलच्या 'मेमरी'त नोंदवण्याची 'सोप्पी' पद्धत आहे. आम्ही पाटीवरची अक्षरं अर्थासह मेंदूच्या 'मेमरी'त स्टोअर करून पाटी कोरी करायचो. असाच अभ्यास पुनः पुन्हा चालायचा. वही, पेन वगैरे गोष्टी चौथीपासून असायच्या.

# खेला होबे

खेला होबे' हा घोष एकेकाळी बंगालच्या राजकारणातील संघर्षाचे प्रतीक होता. आज तोच घोष वेगळ्या अर्थाने ऐकू येत आहे. बंगालमधील सध्याचा संघर्ष केवळ तृणमूल आणि भाजप यांच्यातील नाही. ती भारतीय लोकशाहीच्या मूल्याचीही परीक्षा आहे.

भारतीय राजकारणात सत्तांतर, पक्षांतर आणि राजकीय बंडखोरी या गोष्टी काही नवीन नाहीत. परंतु गेल्या काही वर्षांत या घटनांचा वेग, स्वरूप आणि परिणाम पाहता एक गंभीर प्रश्न उपस्थित होतो, लोकशाहीतील राजकीय स्पर्धा आता केवळ निवडणुकांपुरती मर्यादित न राहता संस्थांच्या नियंत्रणापर्यंत पोहोचलीय का?

महाराष्ट्रात २०२२ मध्ये घडलेल्या शिवसेना फुटीपासून सुरू झालेला घटनाक्रम आता देशातील इतर राज्यांतही दिसू लागला आहे. बंगालमधील अलीकडच्या राजकीय घडामोडींनंतर हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पात्रे बदलली, राज्य बदलले, भाषा बदलली, परंतु राजकीय पटकथा मात्र तीच आहे. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसमध्ये निर्माण झालेल्या अंतर्गत संघर्षाने बंगालच्या राजकारणाला मोठे वळण दिले आहे. या घडामोडी केवळ एका पक्षापुरत्या मर्यादित नाहीत, त्या भारतीय लोकशाहीच्या आरोग्याबाबतही अनेक प्रश्न निर्माण करतात.

महाराष्ट्र राजकीय मॉडेलची सुरुवात? जून २०२२ मध्ये महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत मोठी फूट पडली.

त्यानंतर पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह आणि संघटनात्मक वैधता यांबाबतचा संघर्ष देशभर चर्चेचा विषय ठरला. उद्धव ठाकरे यांची मूळ शिवसेना आणि शिंदे गट यांच्यातील लढाई न्यायालय निवडणूक आयोग आणि जनतेसमोर अनेक महिने सुरू राहिली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही अशीच फूट पडली.

# चौकटीपलीकडचा पाउस

श्रीमंतीच्या चौकटीतून बाहेर पडून निसर्गाच्या कुशीत खऱ्या बालपणाचा आनंद शोधणाऱ्या एका लहानग्याची आणि त्याच्या संवेदनशील आईची ही भावस्पर्शी कथा.

अकराव्या मजल्याची ती चकचकीत गॅलरी, हातात महागडं गेमिंग गॅझेट आणि डोळ्यांत मात्र समोरच्या मैदानातली धूळ... आठ वर्षांच्या विनीतची ही रोजचीच दुपार होती. विनीतला लाडाने विनू म्हणायचे. विनू, त्याचे आई-बाबा एका मोठ्या, आलिशान सोसायटीमध्ये अलीकडेच राहायला आले होते. विनू श्रीमंत आई-बाबांचा एकुलता एक मुलगा. घरात खेळायला जागा होती, महागडी खेळणी होती, पण त्या खेळण्यांना विनूचा एकटेपणा काही दूर करता येत नव्हता.

विनू आठ वर्षांचा होता. विनूला अनेकदा वाटायचं की, आपणही इतर मुलांसारखं मातीत खेळावं, बागडावं. गाडीतून जाता-येता रस्त्यावर खेळणारी मुलं दिसली की तो आईचा हात ओढून सांगायचा, 'आई, मला पण असं खेळायचंय गं!' पण आई लगेच म्हणायची, 'अरे विनू, तिथे किती घाण असते, इन्फेक्शन होईल ना बाळा! आपण संध्याकाळी मस्त मॉलमधल्या 'प्ले झोन'मध्ये जाऊ, तिथे खेळ छान.' त्या वातानुकूलित, कृत्रिम जगात विनीत जायचा खरा, पण तिथल्या रबरी खेळण्यांमध्ये त्याला तो खराखुरा आनंद कधी सापडलाच नाही.



त्यांच्या या टोलेजंग सोसायटीच्या थोडं पुढे जुन्या चाळी होत्या. अकराव्या मजल्यावरून विनूला त्या चाळीतली आणि आजूबाजूची मुलं स्पष्ट दिसायची. त्या चाळीसमोरच एक छोटं, उघडं-बोडकं मैदान होतं. तिथे रोज संध्याकाळी मुलांचा नुसता दंगा असायचा. गोट्या, लगोरी, पकडापकडी... काय काय खेळायचे ते सगळे! त्यात भर म्हणजे दोन छोटी, गोंडस कुत्र्याची पिल्लं त्या मुलांच्या मागे-मागे शेपूट हलवत बागडायची. विनीतचे आई-बाबा दोघंही मोठ्या हुद्द्यावर कामाला होते. त्यामुळे ते सकाळीच ऑफिसला निघून जायचे. मग सुट्टीच्या दिवशी विनू गॅलरीत उभा राहून तासनतास हेच दृश्य पाहत राहायचा.

घरात त्याला सांभाळायला उमा मावशी होती. विनू रोज उमा मावशीकडे हट्ट करायचा, 'मावशी, प्लीज गं... मला फक्त अर्ध्या तासासाठी त्या समोरच्या मैदानात ने ना खेळायला! बघ ना, ती पिल्लं किती गोड आहेत.' पण उमा मावशी घाबरायची. ती म्हणायची, 'नको रे विनू, आई-बाबांना समजलं तर ते मला कामावरून काढून टाकतील. आपण घरातच लपाछपी खेळू या हवं तर.' विनू मान खाली घालून निघून जायचा.

त्या दिवशी हवेत सकाळपासूनच एक वेगळा गारवा होता. आभाळ गच्च भरून आलं होतं आणि बघता बघता वर्षातला पहिला कडकडणारा पाऊस सुरू झाला. पावसाचा तो पहिला सुवास हवेत दरवळला आणि विनीतच्या गॅलरीतून एक वेगळंच दृश्य दिसलं. समोरच्या मैदानातली ती सगळी मुलं पावसात चिंब भिजत नाचत होती. एकमेकांवर चिखल उडवणं, साचलेल्या पाण्यात उड्या मारणं सुरू होतं. ती कुत्र्याची पिल्लंही अंगावरचं पाणी झटकत मुलांच्या अंगावर उड्या मारत होती. मुलांचा तो खळखळून हसण्याचा आवाज अकराव्या मजल्यापर्यंत पोहोचत होता.

आता मात्र विनूला स्वतःवर ताबा ठेवणं अशक्य झालं. त्याच्या डोळ्यांत पाणी आलं. तो धावत उमा मावशीकडे गेला आणि तिचा हात धरून रडू लागला, 'मावशी, आज मला अडवू नकोस. मला फक्त एकदा त्या पावसात भिजायचंय. आईला नाही सांगणार मी, प्लीज मला घेऊन चल.'

विनूचा तो रडवेला चेहरा आणि डोळ्यांतली आर्तता पाहून उमा मावशीचं काळीज वितळलं. तिने आजूबाजूला पाहिलं, एक सुस्कारा सोडला आणि म्हणाली, 'चल, पण लवकर यायचं हं!' विनू धावतच खाली गेला. पाय मैदानात पडताच, पहिल्यांदाच त्याच्या पायाला मऊ, ओल्या मातीचा स्पर्श झाला. तो स्पर्श इतका सुखावणारा होता की, विनीतचे डोळे आनंदाने चमकले. मैदानातल्या मुलांनी आधी या चकचकीत कपड्यातल्या मुलाला पाहिलं, पण मुलांमध्ये कसला आलाय भेदभाव? एका मुलाने विनूच्या अंगावर पाणी उडवलं आणि विनूही हसत हसत त्यांच्यात सामील झाला.

विनू चिखलात पडला, उठला, पावसाच्या पाण्यात, चिखलात उड्या मारल्या. त्या छोट्या पिल्लाला त्याने कडेवर घेतलं, त्या पिल्लाने त्याच्या गालाचा पापा घेतला. विनू आयुष्यात पहिल्यांदाच मनापासून पोट धरून हसत होता. त्याचा तो आवाज, तो आनंद गगनात मावेनासा झाला होता.

नेमकी याच वेळी विनूची आई काही फाईल्स विसरल्यामुळे ऑफिसमधून अचानक घरी परत आली. घरात पाऊल ठेवताच तिला शांतता जाणवली. विनू आणि उमा मावशी दोघंही घरात नव्हते. घाबरून तिने गॅलरीकडे धाव घेतली आणि खाली पाहिलं.

खालचं दृश्य पाहून ती थबकली आणि विचारात पडली. तिचा विनू, जो नेहमी स्वच्छ, टापटीप राहायचा, तो आज डोक्यापासून पायापर्यंत चिखलाने माखला होता. पण त्याच्या चेहऱ्यावर जे हास्य होतं, ते तिने आजवर कधीच पाहिलं नव्हतं. तो त्या मुलांशी गप्पा मारत होता, पावसात चिंब भिजत नाचत होता. विनू नेहमीपेक्षा कितीतरी पटीने जास्त आनंदी दिसत होता.

ते दृश्य पाहता पाहता आई भूतकाळात हरवून गेली. तिला तिचं स्वतःचं बालपण आठवलं. ती गावी कशी पावसात भिजायची, विहिरीत उड्या मारायची, होड्या सोडायची, पावसाचं पाणी जमा करायची. किती समृद्ध होतं ते बालपण! आईच्या डोळ्यांत सुखाचे आणि एका अपराधी भावनेचे अश्रू दाटून आले. तिने स्वतःशीच विचार केला, 'श्रीमंतीच्या आणि हायजिनच्या या खोट्या चौकटीत आपण विनीतला कोंडून ठेवलं. आपण त्याला भौतिक सुखं खूप दिली, पण जे खरं बालपण असतं, जी निसर्गाची मजा असते, ती तर आपण त्याच्याकडून हिरावूनच घेतली ना! पैशाने सगळंच विकत घेता येतं, पण हा निखळ, निरागस आनंद नाही.'

काही वेळाने विनू आणि उमा मावशी घरी परत आले. दारातच मॅडमला उभं पाहून उमा मावशी घाबरल्या, आता काही खरं नाही. विनीतनेही घाबरून मान खाली घातली, त्याला वाटलं आता आईचा मोठा ओरडा पडणार.

पण तिथे काही वेगळंच घडलं. आईने विनीतला ओरडण्याऐवजी तिच्या चेहऱ्यावर एक गोड हसू आलं. ती उमा मावशींकडे बघून म्हणाली, 'उमाताई घाबरू नकोस. चांगलं केलंस त्याला खाली घेऊन गेलीस.'

मग आई विनूच्या जवळ गुडघ्यावर बसली आणि म्हणाली, 'खूप मजा आली ना बाळा? कधी कधी खेळत जा हा त्या मुलांसोबत!'

विनूला आपल्या कानांवर विश्वासच बसेना. उमा मावशी आणि विनीत दोघेही एकमेकांकडे अचंबित होऊन बघत राहिले. विनीतच्या चेहऱ्यावरचा अविश्वास क्षणात नाहीसा झाला आणि त्याने धावत जाऊन आईला घट्ट मिठी मारली.

नेहमी कपड्यांवर डाग पडल्यावर ओरडणारी, सॅनिटायझर घेऊन मागे फिरणारी आई आज स्वतःच्या महागड्या सिल्कच्या साडीचा विचार न करता, त्या चिखलात माखलेल्या, ओल्याचिंब विनूला स्वतःच्या काळजाशी घट्ट कवटाळून होती. बाहेर पाऊस पडतच होता आणि घरात मात्र एका आईच्या मनातील वात्सल्याचा आणि समजुतीचा नवा पाऊस सुरू झाला होता.